# मॉड्युल - I

# १

# स्थूल अर्थशास्त्राची ओळख

**घटक रचना :**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ स्थूल अर्थशास्त्राचा अर्थ
१.२ स्थूल अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये
१.३ स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती
१.४ स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व आणि मर्यादा
१.५ सारांश
१.६ प्रश्न

## १.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- स्थूल अर्थशास्त्राचा अर्थ समजून घेणे.
- स्थूल अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये अभ्यासणे.
- स्थूल अर्थशास्त्राच्या व्याप्तीचा अभ्यास करणे.
- स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व समजून घेवून मर्यादांचा अभ्यास करणे.

## १.१ स्थूल अर्थशास्त्राचा अर्थ (MEANING OF MACRO ECONOMICS)

Macro ह्या शब्दाची उत्पत्ती Makros या ग्रीक शब्दापासून झालेली आहे. Macro म्हणजे मोठा किंवा व्यापक होय. या अर्थशास्त्रात सूक्ष्म अर्थशास्त्रा प्रमाणे एक एककाचा बारकाईने अभ्यास न करता संपूर्ण/एकूण सर्वच एककांचा एकत्रित अभ्यास केला जातो.

अर्थशास्त्रात समग्रलक्षी या संज्ञेचा वापर प्रथम १९३३ मध्ये प्रा. रॅग्नर फ्रिश यांनी केला १९ व्या शतकात त्याचा विकास माल्थस, सिस्मोन्दी, कार्लमार्क्स इ. अर्थशास्त्रज्ञांनी केला तर आधुनिक काळात केन्सच्या पूर्वी वालरस, विक्रसेल, फिशर, कॅसल, रॉबर्टसन, हायके, हॉट्रे इ. नी केला. परंतु खऱ्या अर्थाने समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या विकासाचे श्रेय लॉर्ड केन्स यांना दिले जाते. १९३६ मध्ये केन्स यांनी The General theory of Employment Interest and Money हा ग्रंथ प्रकाशित केला व समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या विकासाला प्रोत्साहन दिले.



munotes.in

समग्रलक्षी अर्थशास्त्रात संपूर्ण आर्थिक व्यवस्थेचा एकत्रित अभ्यास केला जातो. एकूण रोजगार, एकूण उत्पादन, एकूण उत्पन्न, एकूण खर्च, एकूण उपभोग, राहणीमान, देशाचे मौद्रीक धोरण, राजकोषीय धोरण, एकूण आंतरराष्ट्रीय व्यापार हा समग्रलक्षी अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे.

समग्रलक्षी अर्थशास्त्राचा अर्थ अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट होण्यासाठी त्याच्या काही व्याख्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**व्याख्या :**

**प्रो. बोल्डींग** - ''स्थूल अर्थशास्त्र हे वैयक्तिक खरेदी परिमाणा ऐवजी एकूण खरेदी परिमाणाची बेरीज, वैयक्तिक उत्पन्ना ऐवजी राष्ट्रीय उत्पन्नाचा, वैयक्तिक किंमती ऐवजी सामान्य मूल्य स्तराचा वैयक्तिक उत्पनाऐवजी राष्ट्रीय उत्पादनाचा अभ्यास करते.

**प्रा. जे. एल. हॅनसन** - ''समग्रलक्षी अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची अशी शाखा आहे की, जी रोजगाराचे परिणाम एकूण बचत आणि गुंतवणूक, राष्ट्राय उत्पन्न अशा मोठ्या समुच्चयातील संबंधाचा विचार करते.

**प्रा. ॲक्ले** - ''समग्रलक्षी अर्थशास्त्र हे आर्थिक परिमाणांचा समग्र पातळीवर विचार करते तसेच ते आर्थिक जीवनाच्या समग्र पैलूंशी संबंधीत असते.''

एकूणच समग्रलक्षी अर्थशास्त्र हे संपूर्ण अर्थव्यवस्थेचा एकत्रितरित्या अभ्यास करते.

## १.२ स्थूल अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये (FEATURES OF MACRO ECONOMICS)

**१. सर्व एककांचा अभ्यास:**

समग्रलक्षी अर्थशास्त्रात एका एककाचा वैयक्तित पातळीवर अभ्यास न करता सर्वच एककाच्या आर्थिक व्यवहारांचा एकत्रितरित्या अभ्यास करते. यात वैयक्तिक उत्पन्ना ऐवजी राष्ट्रीय उत्पन्नाचा, वैयक्तिक किंमती ऐवजी संपूर्ण किंमत पातळीचा, एका उद्योगा ऐवजी संपूर्ण औद्योगिक संरचनेचा अभ्यास केला जातो.

**२. सामान्य संतुलन पद्धती:**

समग्रलक्षी अर्थशास्त्र आर्थिक विश्लेषणाकरीता सामान्य संतुलन पद्धतीचा उपयोग करते.

**३. व्यापक अर्थशास्त्र:**

समग्रलक्षी अर्थशास्त्र हे व्यापक स्वरुपाचे अर्थशास्त्र आहे. कारण ह्यात अनेक एककांचा एकत्रितरित्या अभ्यास केला जातो. अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासास एकाचवेळी प्राधान्य दिले जाते.

munotes.in

### ४. आंतरराष्ट्रीय संकल्पनांना महत्त्वः

समग्रलक्षी अर्थशास्त्रात आंतरराष्ट्रीय व्यापार, परकीय मदत, व्यवहारतोल या सारख्या संकल्पना महत्त्वपूर्ण ठरतात.

### ५. उत्पन्न विश्लेषणः

समग्रलक्षी अर्थशास्त्र हे उत्पन्न आणि रोजगार सिद्धांत किंवा उत्पन्न विश्लेषण म्हणून देखील ओळखले जाते.

### ६. रोजगार निर्धारकांचा अभ्यासः

समग्रलक्षी अर्थशास्त्र हे बेकारीची कारणे आणि रोजगाराचे विविध निर्धारक यांचा अभ्यास करते.


### ७. विविध सिद्धांताचा अभ्यासः

समग्रलक्षी अर्थशास्त्रात उत्पन्न व रोजगार सिद्धांत सामान्य मुल्य स्तर व चलवाढीचे सिद्धांत तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांताचा अभ्यास केला जातो.

## १.३ स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती (SCOPE OF MACRO ECONOMICS)

व्याप्तीच्या दृष्टीने सुद्धा सुक्ष्म अर्थशास्त्र व समग्र अर्थशास्त्र यात मुलभूत फरक आहे. सुक्ष्म अर्थशास्त्रात एका घटकाचा एका व्यक्तीच्या उत्पन्न, उपभोग, राहणीमान, बचत, गुंतवणूक पातळीचा तसेच एका वस्तूचे उत्पादन किंमत इ. विचार व अभ्यास केला जातो तर समग्र लक्षी अर्थशास्त्रात देशाचे एकूण उत्पादन, उत्पन्न, बचत गुंतवणूक किंमत एकूण राजकोषीय धोरण, मौद्रीक धोरण, अंतरराष्ट्रीय व्यापार इ. चा व्यापक स्वरुपात अभ्यास केला जातो. अशा समग्र अर्थशास्त्राची व्याप्ती पुढील तक्त्याद्वारे अधिक स्पष्ट करता येईल.

**समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्ती**




समग्रलक्षी अर्थ शास्त्राच्या व्याप्ताचे सविस्तर स्पष्टीकरण पुढील प्रमाणे देता येईल.

munotes.in

**१. उत्पन्न व रोजगार सिद्धांतः**

समग्रलक्षी अर्थशास्त्रात देशातील उत्पन्न पातळी व रोजगार पातळीचा अभ्यास करतांनी ती कशावर अवलंबून असते व तीच्या मध्ये कशामूळे बदल होतात याचा विचार केला जातो. या शिवाय उपभोग, गुंतवणूक फलन यांचा ही अभ्यास केला जातो. तसेच या अंतर्गत येणारे व्यापारचक्राचे सिद्धांत ही उत्पन्न व रोजगार विषयक सिद्धांताचा भाग ठरतात.

**२. सामान्य मुल्य स्तराचा सिद्धांतः**

ज्यात मुद्रामुल्याचे सिद्धांत तसेच चलनवाढ, चलनघट, इ. चा ही अभ्यास केला जातो.

**३. आर्थिक विकासाचे सिद्धांतः**

साधारणतः दुसऱ्या महायुद्धानंतर विकासाचे अर्थशास्त्र ही एक नवीन शाखा विकसीत झाली. ह्या अंतर्गत विकसनशील देश व विकसीत देशा संदर्भात लागू पडणाऱ्या आर्थिक विकास व अधिक वृद्धीच्या अनेक प्रश्नांचा अभ्यास यात केला जातो.

**४. समष्टी वितरण सिद्धांतः**

राष्ट्रीय उत्पन्नाचे उत्पादनाच्या चारही घटकात म्हणजे भूमी, श्रम, भांडवल व संयोजन यामध्ये खंड, वेतन, व्याज आणि नफा या स्वरुपात कशा प्रकारे विभाजन केले जाते म्हणजे उत्पादन घटकांना मिळणारे मोबदले ठरविण्यासाठी समग्रलक्षी अर्थशास्त्र उपयोगी पडते.

**५. आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतः**

आंतरराष्ट्रीव्यापार सिद्धांतांची चर्चासुद्धा समग्रलक्षी अर्थव्यवस्थेत होत असताना दिसून येते.

या शिवाय व्यवहारतोल व विनिमयदर देशात आर्थिक वृद्धी कोणत्या घटकांमुळे घडून येऊ शकते. या संदर्भात सुद्धा योग्य विश्लेषण समग्रलक्षी अर्थशास्त्रात केले जाते.

**६. व्यवहारतोल आणि विनिमय दरः**

एका विशिष्ट कालखंडात एका देशाने इतर देशांबरोबर केलेल्या दृश्य वस्तू व अदृश्य सेवांच्या आयात निर्यातीचा व्यवहार यांचा समावेश यात होतो. व्यवहारतोल तुटीचा आहे की वाढाव्याचा त्यावरुन त्यांच्या व्यवहाराची दिशा ठरत असते. अर्थात व्यवहारतोलावर विनिमय दराचा प्रभाव पडतो. विनिमय दर म्हणजे दोन देशातील चलनांची ज्या दराने देवाण घेवाण होते. तो दर होय. या सर्व बाबींचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्रात होतो.

**७. आर्थिक वृद्धीः**

आर्थिक वृद्धी आणि वृद्धी विषयक सिद्धांत हा सुद्धा समग्रलक्षी अर्थशास्त्राचा महत्त्वाचा अभ्यास विषय आहे. अर्थात विकसनशील देशांबाबतीत हे सिद्धांत आर्थिक विकासाचे सिद्धांत म्हणून ओळखले जातात. अशा प्रकारे समग्रलक्षी अर्थशास्त्र समग्र पातळीवर अनेक बाबीचा अभ्यास करते. परिणामी ह्या अर्थशास्त्राची व्यापकता खूप अधिक आहे.

munotes.in

## १.४ स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व आणि मर्यादा (SIGNIFICANCE & LIMITATIONS OF MACRO ECONOMICS)

**समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्त्व (Significance of Macro Economics) :**

**१. सरकारला उपयुक्तः**

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाला अनेक प्रकारची धोरणे राबवावी लागतात. सरकारला आर्थिक धोरण निश्चित करतांना एका विशिष्ट एककाचा विचार न करता एकूण समूहाचा विचार करावा लागतो. समग्रलक्षी अर्थशास्त्रात सर्व एककांचा सामुहीक विचार व अभ्यास केला जात असल्यामुळे आर्थिक धोरण ठरवितांना सरकारला त्याचा उपयोग होतो.

**२. संचालन समजून घेणेः**

सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक पातळीवर एक एक घटकांचा अभ्यास केला जात असल्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेचे स्वरुप समजू शकत नाही. परंतु समग्रलक्षी अर्थशास्त्रात सर्वच एककांचा एकत्रित अभ्यास केला जात असल्याने अर्थव्यवस्थेचे संचालन संपूर्णपणे समजून घेण्यासाठी मदत होते.

**३. सूक्ष्म अर्थशास्त्रास उपयुक्तः**

सूक्ष्म अर्थशास्त्रात अभ्यासले जाणारे नियम हे समग्रलक्षी अर्थशास्त्रावर आधारित आहेत. उदा. सूक्ष्म अर्थशास्त्रातील मागणीचा नियम मांडताना प्रामुख्याने समाजातील अनेक व्यक्तींच्या मागणीचा अभ्यास करावा लागतो आणि आढळणाऱ्या या सर्वसामान्य प्रवृत्तीवरुन मागणीचा नियम तयार केला गेला. अर्थात नियमाची पडताळणीसुद्धा समुहाच्या अनुभवावरच आधारित असते. अशा प्रकारे समग्रलक्षी अर्थशास्त्र सूक्ष्म अर्थशास्त्रास मदत करते.

**४. विश्लेषण अधिक उपयुक्तः**

सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासातर्गत काही संकल्पनांचे स्पष्टीकरण हे अवास्ताविक गृहीतावर आधारित दिसून येते. उदा.. पूर्ण रोजगार, पूर्ण स्पर्धा इ. परंतु समग्रलक्षी अर्थशास्त्रात संपूर्ण आर्थिक घटकांचा एकत्र अभ्यास केला जात असल्याने त्यांचा पाया अवास्तव गृहीतावर नसल्याने ते विश्लेषण अधिक उपयुक्त ठरते.

**५. राष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठीः**

समग्रलक्षी अर्थशास्त्र देशातील सर्वच बाबींचा एकत्रितपणे अभ्यास करीत असल्यामुळे देशाला भेडसावणारे विविध प्रश्न समस्या उदा. व्यापार चक्र, बेरोजगारी, घटते. राष्ट्रीय उत्पन्न इ. प्रश्न सोडविण्यासाठी विविध उपायात्मक मार्ग सुचविण्याचे कार्य समग्रलक्षी अर्थशास्त्र करते.

**६. अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचे मूल्यमापनः**

समग्रलक्षी अर्थशास्त्रामुळे देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न किती आहे, त्याचे अर्थव्यवस्थेतील विविध उत्पन्न गटातील लोकांमध्ये कशा पद्धतीने विभाजन झालेले आहे हे समजून घेता येत असल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहाय्याने अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचे मूल्यमापन शक्य होते.

munotes.in

**७. विरोधाभासाचे स्पष्टीकरण:**

सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक पातळीवर काढलेले निष्कर्ष हे पूर्णपणे समग्रलक्षी अर्थशास्त्रात जसेच्या तसे लागू पडत नाहीत. उलट यातून विरोधाभास स्पष्ट करण्याचे काम समग्रलक्षी अर्थशास्त्र करते. उदा. सूक्ष्म लक्षी अर्थशास्त्रानुसार एका उद्योगसंस्थेच्या बाबतीत रोजगार वाढ करतांना वेतन कपात करुन जास्तीत जास्त लोकांना रोजगार पुरविणे शक्य असते. परंतु समग्रलक्षी पातळीवर पूर्ण देशातील उद्योगधंद्यातील वेतन कपात केल्याने रोजगार वाढण्याऐवजी घटण्याची शक्यता अधिक असते. अशा प्रकारचा विरोधाभास अधिक चांगल्याप्रकारे स्पष्ट करण्याचे कार्य समग्रलक्षी अर्थशास्त्र करते.

**८. आर्थिक स्थैर्य:**

अर्थव्यवस्थेच्या गतिशील विकासासाठी आर्थिक स्थैर्याची आवश्यकता असते. त्यासाठी आर्थिक समस्या सोडविणे गरजेचे असते. समग्रलक्षी अर्थशास्त्राने जागतिक महामंदीनंतरच्या काळात आर्थिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

**९. व्यावसायिकांना उपयुक्त:**

देशातील एकूण व्यावसायिक पर्यावरणावर देशातील एकूण रोजगार, राष्ट्रीय उत्पन्न, एकूण मागणी, व्यापार चक्रातील तेजी तसेच मंदी, देशाचे मौद्रीक धोरण तसेच राजकोषीय धोरण इ. चा परिणाम होत असतो. अर्थात या सर्वाबाबत पूर्व अंदाज बांधून व्यावसायिक प्रगती साधण्यासाठी समग्रलक्षी अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

**१०. आर्थिक विकास:**

समग्रलक्षी अर्थशास्त्रात देशातील एकूण साधनसामग्रीची उपलब्धता, त्यांची कार्यक्षमता, देशातील एकूण उत्पन्न, उत्पादन, रोजगार यात वाढ करण्याच्या दृष्टीने योजनांची आखणी व अमंलबजावणी विकासात्मक धोरणांच्या प्रकल्पांची आखणी, अंमलबजावणी इ. गोष्टी आर्थिक विकासाची पातळी वाढवितात.

एकूणच समग्रलक्षी अर्थशास्त्रामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण बाबीचे ज्ञान होऊन अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आर्थिक धोरणांची आखणी व अंमल बाजावणी करणे तसेच विविध समस्यांवर उपाय सुचविणे व त्या सोडविणे शक्य होते.

**समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या मर्यादा (Limitations of macro economics) :**

**१. अतिसामान्यीकरण:**

वैयक्तिक पातळीवरील अनुभवांचे अतिसामान्यीकरण केल्यास निघणारे निष्कर्ष हे विरोधाभासात्मक ठरतात. कारण एका व्यक्तीबाबत एखादी बाब योग्य असली तरी ती संपूर्ण समुहाला तशीच फायदेशीर ठरेल असे नाही. उदा. एका उद्योगसंस्थेतील मजुरीचा दर कमी करुन रोजगार वाढविता येईल. परंतु सर्वच उद्योगसंस्थातील म्हणजेच उद्योगधंद्यातील श्रमिकांची मजूरी कमी केल्यास त्याचा उलट परिणाम होऊन उत्पन्न कमी होऊन त्यांची मागणी कमी . परिणामी उत्पादन कमी व बेरोजगारी वाढेल.

**२. समुहाच्या रचनेकडे दुर्लक्ष:**

समुहातील प्रत्येक एकक हा दुसऱ्याहून भिन्न असतो. अशा वेळी समग्रलक्षी अर्थशास्त्राचे निर्णय वैयक्तिक एककाच्या संदर्भात चूकीचे ठरतात. उदा. वैयक्तिक पातळीवर बचत करणे हा

गुण ठरतो. परंतु सामुहीक पातळीवर मोठ्या प्रमाणात बचत केली गेली तर बाजारातील एकूण मागणी कमी होऊन मंदीची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

**३. सारख्याच प्रभावाचा अभाव:**

तेजीच्या काळात वाढत्या किंमतीमुळे उपभोक्त्याला जरी तोटा होत असला तरी उत्पादक व व्यापारी यांना फायदा होतो. म्हणजेच सामुहिक प्रवृत्तीचा सर्वत्र सारखाच प्रभाव पडत नाही.

**४. विवेचनात अडचणी:**

एकातील बदलानुसार संपूर्ण प्रवृत्तीचे मोजमाप करणे अडचणीचे असते. परिणामी समग्रलक्षी पद्धतीचे विवेचन करणे अडचणीचे जाते.

**५. चुकीचे निष्कर्ष:**

काही वेळा सामुहीक अभ्यासातून काढलेले निष्कर्ष हे नवीन धोरण योजनांची आवश्यकता नाही असे दर्शवितात. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांची आवश्यकता असते. उदा. शेतमालाच्या किंमती १०टक्के कमी झाल्या तर उद्योगातील मालाच्या किंमती १०टक्के वाढल्या तर सामान्य मूल्यस्तरावर परिणाम न झाल्यामुळे समग्रलक्षी विश्लेषणानुसार नवीन धोरणाची आवश्यकता भासणार नाही. परंतु प्रत्यक्षात मात्र अशा परीस्थितीत शेतकऱ्याच्या मदतीसाठी शासनाला नवीन धोरण व योजना स्विकारणे आवश्यक ठरते.

**६. सांख्यीकीय अडचणी:**

समग्रलक्षी अर्थशास्त्राचा अभ्यास हा मोठ्या प्रमाणात सांख्यिकीय माहितीदर आधारीत असतो. विशेषतः विकसनशील देशांमध्ये अशा प्रकारची माहिती अचूक व वेळेवर मिळणे खूप अडचणीचे जाते. परिणामी समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या योग्य व कार्यक्षम वापरावर मर्यादा पडतात.

## १.५ सारांश (SUMMARY)

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण स्थूल अर्थशास्त्राची ओळख करुन घेतली आहे. स्थूल अर्थशास्त्र व सूक्ष्म अर्थशास्त्र ह्या अर्थशास्त्राच्या दोन मुख्य शाखा आहेत. सूक्ष्म अर्थशास्त्राची उत्पत्ती ही Mikros या ग्रीक शब्दापासून, तर स्थूल अर्थशास्त्राची उत्पत्ती ही Makros या ग्रीक शब्दापासून झाली आहे. सूक्ष्म अर्थशास्त्र हे विशिष्टांचा म्हणजेच सूक्ष्म बाबींचा अभ्यास करते, स्थूल अर्थशास्त्र हे एकुणाचा किंवा समग्राचा अभ्यास करते. या प्रकरणामध्ये स्थूल अर्थशास्त्राचा अर्थ, स्थूल अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये, स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती, स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व व मर्यादांचा अभ्यास आपण केला आहे.

## १.६ प्रश्न

१) स्थूल अर्थशास्त्राचा अर्थ सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
२) स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती विशद करा.
३) स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व सांगून मर्यादा स्पष्ट करा.

❖❖❖❖

# २

# राष्ट्रिय उत्पन्न

**घटक रचना :**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ राष्ट्रिय उत्पन्नाच्या संकल्पना
२.३ राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन
२.४ राष्ट्रीय उत्पन्न मापनातील अडचणी
२.५ उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
२.५.१ द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
२.५.२ त्रिक्षेत्रीय अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
२.५.३ चतुःक्षेत्रीय खुल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
२.६ सारांश
२.७ प्रश्न

## २.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पनांचा अभ्यास करणे.
- राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापन पद्धतींचा अभ्यास करणे.
- राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्यामध्ये येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
- द्विक्षेत्रीय, त्रिक्षेत्रीय व चतुःक्षेत्रीय अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहाचा अभ्यास करणे.

## २.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

राष्ट्रीय उत्पन्न ही प्रवाही संकल्पना असून स्थूल अर्थशास्त्रात (Macro Economics) राष्ट्रीय उत्पन्नाचे विश्लेषण महत्त्वाचे असते. साधारणतः एका वर्षात तयार होणाऱ्या वस्तू व सेवांचे दुहेरी मोजमाप न होऊ देता केलेले मापन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न असते. भारतात १ एप्रील ते ३१ मार्च पर्यंत आर्थिक वर्ष मोजले जात असून याच कालखंडात देशात विविध क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या सर्व वस्तु व सेवांची मोजणी करुन राष्ट्रीय उत्पन्न काढले जाते. साधारणतः औद्योगिक वस्तु म्हणजे फॅन, टेबल, खुर्ची, T.V., फ्रीज, मोटारगाडी इत्यादींना समजले जाते. तर शेती वस्तु म्हणजे गहुं, ज्वारी, बाजरी, तांदुळ, मका वगैरे असतात आणि सेवा म्हणजे



munotes.in

शिक्षण, दळणवळण वाहतूक, बँका, विमाकंपन्या इत्यादीना म्हटले जाते. या सर्व वस्तु आणि सेवांची एका विशीष्ट कालखंडातील मोजणी म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. म्हणून राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना स्थुल अर्थशास्त्रात महत्त्वपूर्ण मोजली जाते. राष्ट्रीय उत्पन्नावरुन आपल्याला आपल्या देशाची प्रगती व इतर देशांची प्रगती यांची तुलना करता येते. देशांतील एकूण मागणी एकूण पुरवठा, एकूण रोजगार, एकूण उत्पन्न एकूण खर्च व एकूण उत्पादन समजते. राष्ट्रीय उत्पन्न हा आर्थिक विकासाचा एक महत्त्वपूर्ण निकष असतो. त्यावरुन आपल्या देशातील लोकांच्या राहणीमानाची कल्पना येते. शेती, उद्योग व सेवा क्षेत्रातून किती उत्पन्न प्राप्त झाले हे समजते. राष्ट्रीय उत्पन्न व दर डोई उत्पन्नावरच देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो.

स्वातंत्र्य पूर्व काळात दादाभाई नौरोजी, शाह आणि खांबाटा, फिंडले, शिरास, वाडिया आणि जोशी, डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव आणि आर. सी. देसाई इत्यादीनी राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले होते. दादाभाई नौरोजींच्या मते स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात दरडोई उत्पन्न २० रुपये होते. स्वातंत्र्यानंतर १९५०-५१ मध्ये ते २५५ रुपये एवढे झाले. तर २०११-१२ मध्ये ते ६०,००० रुपयापेक्षा अधिक होते. थोडक्यात राष्ट्रीय उत्पन्नावरुन अनेक प्रश्नांची उकल होते. म्हणून राष्ट्रीय उत्पन्न हा समग्रलक्षी अर्थ शास्त्रातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटक होय.

**१) डॉ. मार्शल:**

''प्रतिवर्षी एखाद्या देशातील श्रम व भांडवल या नैसर्गीक साधनसामग्रीच्या सहाय्याने मूर्त आणि अमूर्त अशा वस्तू व सेवांचे जे एकूण उत्पादन केले जाते. ते राष्ट्रीय उत्पन्न होय.''

**२) प्रा. पिगू:**

''देशातील उत्पादनापैकी ज्या उत्पादनाचे मोजमाप पैशाच्या स्वरुपात केले जाते त्याला राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात अर्थात या मध्ये परकीय देशामधून मिळावीलेल्या उत्पन्नाचाही समावेश होतो.''

**३) प्रा फिशर:**

''विशिष्ट काळातील देशातील लोकांनी प्रत्यक्ष उपभोगलेल्या वस्तु आणि सेवा म्हणजे त्या देशाचे त्या वर्षाचे राष्ट्रीय उत्पन्न होय.''

**४) राष्ट्रीय उत्पन्न समीती:**

''एका विशिष्ट कालखंडात देशात तयार होणाऱ्या वस्तु व सेवा यांचे दुहेरी मोजमाप न होऊ देता केलेले मापन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.'' या समितीमध्ये प्रा. पी.सी. महालनोबीस प्रा. गाडगीळ, डॉ. व्ही. के आर. व्ही. राव यांचा समावेश होता.

**५) डॉ. कोलीन क्लार्क:**

''राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका विशिष्ट काळात उत्पादन केल्या जाणाऱ्या वस्तु व सेवा यांचे दुहेरी मापन टाळून पैशात काढलेले मुल्य होय.''

याशिवाय कुझनेट प्रा. सॅम्युएलसन डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव इत्यादीनी देखील राष्ट्रीय उत्पन्नाच्या व्याख्या दिलेल्या आहेत.

## २.२ राष्ट्रिय उत्पन्नाच्या संकल्पना (CONCEPTS OF NATIONAL INCOME)

राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना साठा नसून प्रवाही आहे. त्यामध्ये सातत्याने बदल होत असतो. एका विशीष्ट कालखंडात ते मोजले जाते. देशात तयार होणाऱ्या एकूण वस्तू व सेवांचे मापन केल्यास एकूण उत्पादन प्राप्त होते. त्या एकूण उत्पादनाचे पैशात मूल्य व्यक्त केल्यास ते एकूण राष्ट्रीय उत्पन्न प्राप्त होते. तर देशातील एकाचा खर्च हे दुसऱ्याचे उत्पन्न असते. म्हणून असे म्हटले जाते. एकूण उत्पादन = एकूण उत्पन्न = एकूण खर्च होय. राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पना पुढील प्रमाणे.

१) स्थुल राष्ट्रीय उत्पादन (GNP)
२) निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (NNP)
३) स्थुल देशांतर्गत उत्पादन (GDP)
४) निव्वळ देशातंर्गत उत्पादन (NDP)
५) दरडोई उत्पन्न (PCI)
६) वैयक्तीक उत्पन्न (PI)
७) व्ययशक्य उत्पन्न (DI)

### १) स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Gross National Product) :

एका विशिष्ट कालखंडात किंवा वर्षात देशात तयार झालेल्या वस्तु आणि सेवा यांचे दुहेरी मापन न होऊ देता केलेले मोजमाप म्हणजे स्थुल राष्ट्रीय उत्पादन होय. यालाच एकूण राष्ट्रीय उत्पादन असेही म्हणतात. स्थुल राष्ट्रीय उत्पादनात फक्त अंतीम वस्तु व सेवांचा विचार केला जातो. स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे मोजमाप करतांना घसारा (Depreciation) विचारात घेतला जात नाही. समजा भारतात २०१०-११ मध्ये शेती, उद्योग, व्यापार, दळणवळण, वाहतूक बँका व इतर सर्व क्षेत्रातून २५ लाख कोटी रुपये किंमतीच्या वस्तु व सेवांची निर्मिती झाली असेल तर भारताचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न २५ लाख कोटी रुपये होय. वस्तुच्या किंमतीतील वाढ किंवा घटीमुळे हा आकडा कमी जास्त होत असतो. स्थुल राष्ट्रीय उत्पादनात देशातील वस्तु व सेवांबरोबरच देशाच्या नागरीकांनी देशाच्या बाहेर उत्पादन केलेल्या वस्तु व सेवा यांचाही समावेश केला जातो. याशिवाय परकीय देशात केलेल्या गुंतवणूकीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा आणि परकीय नागरीकांना पुरवीलेल्या सेवा व त्यापासून मिळालेल्या उत्पन्नाचा समावेश एकूण राष्ट्रीय उत्पादनात केला जातो. अर्थात परकीय देशातून मिळालेले उत्पन्न धन किंवा ऋण देखील असू शकते. स्थूल राष्ट्रीय उत्पन्न हे सूत्रारुपाने पुढील प्रमाणे मांडता येईल.

GNP = GDP + Export - Import.

स्थूल राष्ट्रीय उत्पादन = देशांतर्गत उत्पादन + निर्यात - आयात.

### २) निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (Net National Income) :

निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न ही देशात राष्ट्रीय उत्पन्नाची एक महत्त्वपूर्ण संकल्पना होय. देशात एका विशिष्ट कालखंडात तयार होणाऱ्या सर्व वस्तु व सेवांचा समावेश स्थुल राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो. हे या सर्व वस्तु व सेवांची निर्मिती करण्यासाठी विविध प्रकारची

यंत्रसामग्री, इमारती व इतर अनेक भांडवली साधनांचा वापर करावा लागतो. विशिष्ट कालावधीनंतर या भांडवली साधनांची झीज होत असते. ती झीज भरुन काढण्यासाठी विशिष्ट रक्कम बाजूला काढून ठेवावी लागते. तिला घसारा (Depreciaction) असे म्हणतात. हा घसारा स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून वजा केल्यास जे उत्पन्न प्राप्त होते. त्यालाच निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.

उदा. समजा एका विशिष्ट कंपनिच्या झेरॉक्स मशिनचे आयुर्मान १० वर्षाचे आहे आणि त्या मशीनची किंमत १,००,००० रुपये आहे तर दहा वर्षानंतर ती मशीन निकामी होऊन त्या जागी नवीन झेरॉक्स मशीन बसवावे लागेल. तेव्हा त्याच्या खरेदीसाठी प्रत्येक वर्षी रुपये १०,००० घसारा म्हणून बाजूला काढून ठेवावे लागतील. यालाच घसारा असे म्हणतात. अशा प्रकारे प्रत्येक भांडवली साधनांचा घसारा म्हणून जी रक्कम बाजूला काढून ठेवली जाते. ती स्थुल राष्ट्रीय उत्पादनातून वजा केल्यास निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न प्राप्त होते हेच आपण सुत्ररुपाने पुढील प्रमाणे दर्शवू.

निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न = स्थुल राष्ट्रीय उत्पादन - घसारा
NNP = GNP - Depreciation

''एका विशिष्ट कालखंडात देशात उत्पादन होणाऱ्या अंतिम वस्तु व सेवांच्या एकूण उत्पादनातून घसारा वजा केल्यास जे उत्पन्न प्राप्त होते. त्याला निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.''

### ३) स्थुल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product - GDP):

राष्ट्रीय उत्पन्नाची ही संकल्पना अत्यंत समर्पक असून जगातील बहुतेक देशात या संकल्पनेचा वापर केला जातो.

**व्याख्या :**

देशात एका विशिष्ट कालखंडात (आर्थिक वर्षात) देशातील सर्व उत्पादक घटकांच्या साह्याने देशाच्या भौगोलीक सीमारेषेच्या आत उत्पादित केलेल्या वस्तु व सेवा यांचे पैशातील मुल्य म्हणजे स्थुल देशांतर्गत उत्पादन होय.

म्हणजेच देशाच्या भौगोलीक सिमारेषेच्या आत देशातील व परकीय नागरीकांनी निर्माण केलेल्या वस्तु व सेवा यांचे एकूण मुल्य म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादन होय.

हेच आपण सुत्ररुपाने पुढीलप्रमाणे स्पष्ट करु.
स्थूल देशांतर्गत उत्पादन = स्थूल राष्ट्रीय उत्पादन - भारतीय नागरीकांचे
विदेशातील उत्पादन मुल्य + विदेशी नागरिकांचे भारतातील उत्पादन मुल्य होय.

म्हणजेच स्थूल देशांतर्गत उत्पादन म्हणजे स्थुल राष्ट्रीय उत्पादनातून भारतीय नागरीकांनी विदेशातून मिळवीलेले उत्पन्न वजा केले जाते तर विदेशी नागरीकांनी भारतात निर्माण केलेले उत्पन्न जमा केले जाते. उ‍ॐ ही संकल्पना अलीकडील काळात अत्यंत महत्त्वपूर्ण मानाली जात असून अर्थशास्त्रज्ञ, प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, राज्यकर्ते, बँका, व वित्तीय

संस्था या संकल्पनेचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात. या संकल्पनेमुळे देशाच्या वास्तव स्थितीचे दर्शन घडते.

### ४) निव्वळ देशातंर्गत उत्पादन (Net Domestic Product NDP) :

स्थुल राष्ट्रीय उत्पादन GNP असो किंवा स्थुल देशांतर्गत उत्पादन GDP असो या दोन्ही उत्पादनात घसारा हा महत्त्वाचा असतो. ज्या प्रमाणे स्थुलराष्ट्रीय राष्ट्रीय उत्पादनातून घसारा वजा केल्यास निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (NNP) मिळते. अगदी त्याच प्रमाणे स्थुल देशांतर्गत उत्पादनातून (GDP) घसारा वजा केल्यास निव्वळ देशांतर्गत उत्पादन (NDP) मिळते म्हणून सुत्ररूपाने हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

NDP = GDP - D

निव्वळ देशांतर्गत उत्पादन = स्थुल देशांतर्गत उत्पादन - घसारा

घसारा म्हणजे भांडवली साधनांची झीज झाल्यास त्याची पूनर्स्थापना करण्यासाठी सुरवातीपासून केलेली विशिष्ट तरतूद होय. भांडवली साधनाच्या उत्पादनातू विशिष्ट रक्कम दरवर्षी बाजूला काढून ठेवली जाते. तिलाच घसारा म्हटले जाते.

### ५) दरडोई उत्पन्न (Per Capital Income PCI):

राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पनेतील सर्वात लोकप्रीय संकल्पना म्हणजे दरडोई उत्पन्न होय. देशातील एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला देशातील एकूण लोकसंख्येने भाग दिल्यास जे उत्पन्न प्राप्त होते. त्यालाच दरडोई उत्पन्न असे म्हणतात. सुत्र रूपाने हे पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

$$\text{दरडोई उत्पन्न} = \frac{\text{एकूण राष्ट्रीय उत्पन्न (Total National Income)}}{\text{एकूण लोकसंख्या (Total Population)}}$$

$$PCI = \frac{NI}{TP}$$

दरडोई उत्पन्न हे आर्थिक विकासाचे एक मापदंड होय. दरडोई उत्पन्नावरुन देशातील लोकांच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते. आपल्या देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न व इतर देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न यांची तुलना करता येते. ज्याचे उत्पन्न कमी आहे. त्यांचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. भारतात स्वातंत्र्यापुर्वी दादाभाई नौरोजीने भारताचे दरडोई उत्पन्न २० रुपये होते असे दर्शवीले होते, तर स्वातंत्र्यानंतर १९५०-५१ मध्ये दरडोई उत्पन्न २५५रुपये एवढे होते. २०११-१२ मध्ये भारताचे दरडोई उत्पन्न ६०,००० रुपयांपेक्षा जास्त आहे. म्हणजेच भारतात प्रगती होत आहे हे यावरुन स्पष्ट होते.

### ६) वैयक्तीक उत्पन्न (Personal Income PI):

राष्ट्रीय उत्पन्नातील ही देखील एक महत्त्वपूर्ण संकल्पना होय. वैयक्तीक उत्पन्नालाच व्यक्तिगत उत्पन्न असेही म्हणतात.''एका विशिष्ट कालखंडात देशातील व्यक्तिंना सर्व मार्गांनी पैशाच्या स्वरुपात मिळालेले उत्पन्न म्हणजे वैयक्तिक उत्पन्न होय.''

वैयक्तिक उत्पन्नात व्यक्तिंना मिळणारे वेतन, बँकेतील पैशावर मिळणारे व्याज, लाभांश, घर भाड्याने दिल्यास ते भाडे, जमीनीपासून मिळणारा खंड, निवृत्ती वेतन, बेकारी भत्ता व इतर सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश केला जातो.

### ७) व्ययशक्य /खर्च योग्य उत्पन्न (Disposable Income):

व्यक्तीला मिळणारे सर्वच्या सर्व उत्पन्न खर्च करता येण्या जोगे नसते. व्यक्तीला विविध मार्गानी जे उत्पन्न मिळते त्या उत्पन्नावर प्राप्ती कराच्या तरतूदी प्रमाणे कर भरावा लागतो. अर्थात प्राप्ती कराचे दर उत्पन्नाच्या वेगवेगळ्या टप्यांवर वेगवेगळे आकारले जातात. सध्या ते दर १०टक्के, २० टक्के व ३० टक्के असे आहेत. व्यक्तीला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नातून प्राप्ती कर वजा केल्यास जे उत्पन्न शिल्लक राहते त्याला खर्च करता येण्यासारखे किंवा व्ययशक्य उत्पन्न असे म्हणतात. थोडक्यात खर्च योग्य उत्पन्न म्हणजे व्यक्तीकडील असे उत्पन्न की जे त्या व्यक्तीला खर्च करता येते. म्हणजेच व्यक्तीच्या एकूण उत्पन्नातून कराची रक्कम वजा केल्यास जे उत्पन्न शिल्लक राहते. ते व्ययशक्य उत्पन्न होय.

उदा.: समजा अशोक या व्यक्तीचे २०१०-११ या आर्थिक वर्षाचे एकूण उत्पन्न ५,००,००० रुपये आहे आणि शासनाने त्यावर १०टक्के प्राप्तीकर आकारल्यास अशोकला पाच लाख रुपयांवर १०टक्के प्रमाणे ५०,००० रुपये शासनाला प्राप्तीकर भरावा लागेल म्हणजे अशोक जवळ ५,००,०००-५०,००० = ४,५०,००० शिल्लक राहतील यालाच खर्च योग्य उत्पन्न असे संबोधले जाते. हेच आपण सुत्ररुपाने पुढील प्रमाणे स्पष्ट करु.

व्यय शक्य उत्पन्न = एकूण उत्पन्न - प्राप्तीकर

Disposable Income = Total Income - Income Tax

शासनाचा कर भरल्यानंतर जे उत्पन्न शिल्लक राहते. तेवढेच उत्पन्न व्यक्तीला खर्च करता येते.

## २.३ राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन (MEASUREMENT OF NATIONAL INCOME)

विशिष्ट कालखंडात देशात तयार होणाऱ्या सर्व वस्तु व सेवा यांची दुहेरी मोजमाप न होऊ देता केलेले मापन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. अशी राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या करण्यात येते. देशातील विविध घटक उदा. उत्पादक, उपभोक्ते, ग्राहक, विक्रेते, शासन, देशी व विदेशी नागरीक उद्योजक व इतर सर्व लोक सकाळी उठल्यापासून संध्याकाळी झोपेपर्यंत काहींना काही आर्थिक क्रिया करत असतात. वस्तुंचे निर्माते व विक्रेते वस्तु व सेवांची विक्री करतात. तर त्या वस्तू व सेवांच्या उपभोग घेणारे त्या खरेदी करतात. म्हणजे अर्थव्यावस्थेत आर्थिक व्यवहार सातत्याने चालू असतात. या आर्थिक व्यवहाराचे योग्य मापन करणे आवश्यक असते. म्हणजेच देशात निर्माण झालेल्या वस्तु व सेवांचे पैशातील मुल्याचे मापन करणे किंवा उत्पादनाच्या सर्व घटकांना मिळणाऱ्या मोबदल्याचे मापन करणे किंवा देशातील लोकांनी केलेल्या खर्चाचे मापन करणे आवश्यक असते. यातूनच राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पद्धती अस्तीत्वात आल्या.

munotes.in

### २.५.१ राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पद्धती (Methods of Measurements of National Income)

राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या तीन प्रमुख पद्धती आहेत. त्या पुढील प्रमाणे.

१) उत्पादन पद्धत (Production Method)

२) उत्पन्न पद्धत (Income method)

३) खर्च पद्धत (Expenditare Method)

### १) उत्पादन पद्धती (Production Method):

या पद्धतीने देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना देशातील विविध क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या सर्व वस्तु व सेवांचे पैशात मुल्य मोजले जाते. उदा. शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक दळणवळण, सेवा, बँका, खाणकाम इत्यादी विविध क्षेत्रात निर्माण झालेल्या अंतीम वस्तु व सेवांच्या उत्पादनाची बेरीज केली जाते. यातून जे एकूण उत्पन्न प्राप्त होते, त्यातून घसाऱ्याची रक्कम वजा केली जाते. जे उत्पन्न प्राप्त होते. त्यालाच स्थुल राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात. अर्थात स्थुल राष्ट्रीय उत्पादनात विदेशातून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाचा देखील समावेश केला जातो.

थोडक्यात या पद्धतीनुसार मिळणारे राष्ट्रीय उत्पन्न = देशातील सर्व क्षेत्रातील अंतीम वस्तु व सेवांच्या उत्पादनाचे मूल्य + विदेशातून मिळणारे निव्वळ उत्पन्न -घसारा होय.

उदा. भारतात २०११-१२ या आर्थिक वर्षात सर्व क्षेत्रातील अंतीम वस्तु व सेवांच्या उत्पादनाचे पैशातील अंतिम मूल्य हे ११०० कोटी रुपये आहे. तसेच भारताला विदेशातून मिळणारे निव्वळ उत्पन्न ४०० कोटी रुपये आहे आणि घसारा हा ३०० कोटी रुपये असेल तर उत्पादन पद्धतीनुसार येणारे राष्ट्रीय उत्पन्न ११०० + ४०० = १५००-३०० = १२०० कोटी रुपये होय.

थोडक्यात उत्पादन पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अंतीम वस्तू व सेवांचे मूल्य विचारात घ्यावे लागते. दुहेरी मापन टाळावे लागते. तसेच भारतीय नागरीकांनी विदेशातून मिळवीलेले उत्पन्न मिळवावे लागते तर या स्थुल राष्ट्रीय उत्पन्नातून घसाऱ्याची रक्कम वजा करावी लागते. घसारा हा यंत्रसामग्रीचा झीज खर्च असतो.

### २) उत्पन्न पद्धती (Income Method):

राष्ट्रीय उत्पन्न मापनाची ही दुसरी महत्त्वाची पद्धती होय. या पद्धतीनुसार देशातील सर्व व्यक्ती व संस्थाना मिळणाऱ्या उत्पन्नाची बेरीज केली जाते. थोडक्यात ''देशातील उत्पन्नाच्या सर्व घटकांना मिळणारा मोबदला म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.''

देशात उत्पादनाचे भुमी, श्रम, भांडवल व संयोजन हे चार घटक असून यांना अनुक्रमे खंड, वेतन व्याज व नफा या स्वरुपात मोबदला प्राप्त होत असतो. म्हणून उत्पादन घटकांना मिळणाऱ्या मोबदल्याची बेरीज म्हणजे उत्पन्न पद्धतीनुसार येणारे राष्ट्रीय उत्पन्न होय. यालाच घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न असे देखिल म्हणतात. प्रा. आर. जी लिप्से यांच्या मते भुमी + श्रम + भांडवल + संयोजन उत्पादनाच्या या चारही घटकांना मिळणारा मोबदला म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. उदा. समजा उत्पादनाच्या या चारही घटकांना अनुक्रमे ५००० + ४००० + ३००० + २००० कोटी रुपये मोबदला प्राप्त होत असेल तर एकूण राष्ट्रीय उत्पन्न = १४०००

कोटी रुपये असेल. अर्थात हे राष्ट्रीय उत्पन्न विशिष्ट आर्थिक वर्षातील असेल, अर्थात यामध्ये विदेशी स्त्रोतापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश केला जातो. तर हस्तांतरण उत्पन्न वजा केला जातो.

### ३) खर्च पद्धती (Expendliture method):

राष्ट्रीय उत्पन्न मापनाची ही तिसरी पद्धती होय. या पद्धतीनुसार एका विशिष्ट आर्थिक वर्षात देशात होणाऱ्या एकूण खर्चाचे मापन केले जाते. देशातील सर्व ग्राहक, खाजगी व्यक्ती, शासकीय संस्था, उद्योग व व्यावसाय संस्था इत्यादी उपभोग व गुंतवणूकीवर खर्च करत असतात त्या सर्वांचे मापन करुन राष्ट्रीय उत्पन्न मिळते. यामध्ये प्रामुख्याने पुढील चार प्रकाराच्या खर्चाची बेरीज केली जाते.

#### अ) उपभोग खर्च :

यामध्ये वस्तु व सेवा खरेदी करण्यासाठी केलेला खर्च विचारात घेतला जातो.

#### ब) खाजगी गुंतवणूक खर्चः

देशातील उद्योग व व्यावसाय संस्थांनी आपल्या उद्योग वाढीसाठी केलेला भांडवली खर्च विचारात घेतला जातो. उदा. यंत्रासामग्री, तंत्रज्ञान, जागा इत्यादी साठी केलेला खर्च विचारात घेतला जातो.

#### क) परकीय गुंतवणूकः

आयात वस्तूंचे उत्पादन विदेशात होते. तर निर्यात वस्तु व सेवांचे उत्पादन स्वदेशात होते. म्हणून निर्यातीतून आयात वजा केल्यास जे उत्पन्न शिल्लक राहते ते निव्वळ विदेशी गुंतवणूक होय. याचा समावेश खर्च पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना केला जातो.

#### ड) शासकीय खर्चः

शासन विविध वस्तू व सेवांची खरेदी करण्यासाठी खर्च करते. अर्थात हा खर्च उपभोग खर्च तसेच भांडवली खर्च देखील असतो. म्हणून शासकीय खर्चाचा राष्ट्रीय उत्पन्नात समावेश केला जातो. म्हणून खर्च पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न = उपभोग खर्च + गुंतवणुक खर्च + परकीय गुंतवणूक + शासकीय खर्च होय.

## २.४ राष्ट्रीय उत्पन्न मापनातील अडचणी (DIFFICULTIES IN MEASUREMENT OF NATIONAL INCOME)

एका विशिष्ट कालखंडात देशात तयार वस्तु व सेवांचे दुहेरी मापन न होऊ देता केलेले मोजमाप म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. परंतु राष्ट्रीय उत्पन्न प्रत्यक्षात मापन करताना अनेक अडचणी येतात. देशात करोडो लोक लाखो वस्तू व सेवांची निर्मिती करतात. ते लोक साक्षर आणि निरक्षर अशा दोन्ही प्रकारचे असतात. ते आपल्या सर्वच व्यवहाराची नियमित नोंद ठेवतीलच याची शाश्वती नसते. शिवाय कर टाळणे किंवा चुकविण्यासाठी देखील उत्पन्नाची संपूर्ण माहिती दिली जात नाही. यास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अनेक अडचणी येतात त्या पुढील प्रमाणे.

munotes.in

### १) वस्तू विनिमय पद्धतीचे अस्तित्वः

भारतात आजही अनेक आर्थिक व्यवहार करतांना वस्तू विनिमय पद्धतीचा वापर केला जातो. उदा. बलुतेदारी व्यावस्थेमध्ये वस्तू देवून सेवा घेतली जात असते किंवा वस्तू ठेवून वस्तू घेतली जाते. अशा वस्तुविनिमय व्यवहाराचे पैशात मापन केले जात नाही. त्यामुळे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न कमी येण्याची शक्यता असते.

### २) दुहेरी मापनाची समस्या :

याचा अर्थ असा की देशातील सर्व अंतीम वस्तु व सेवांची किंमत राष्ट्रीय उत्पन्नात घेणे आवश्यक असते. परंतु अर्थव्यवस्थेत अशा अनेक वस्तु असतात की ज्यांची दोन किंवा त्यापेक्षा जास्त वेळा मोजमाप होण्याची शक्यता असते. उदा. शेतकरी कापूस व्यापाऱ्याला विकतो. व्यापारी तो कापूस कापड गिरणी मालकाला विकतो. गिरणी मालक कापड तयार करुन ग्राहकाना विकतो. म्हणजे शेतकरी, व्यापारी व गिरणीमालक अशी तीन ठिकाणी कापूस विकला गेल्यामुळे त्याचे दोन तीन वेळा मूल्य विचारात घेतले जाते त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात प्रचंड वाढ झालेले दिसून येते.

### ३) मोठे असंघटित क्षेत्रः

भारतात अनेक लघु, कुटीर व अतिलहान उद्योग संघटीत क्षेत्राकडून चालविले जातात. संघटीत क्षेत्रात चालणाऱ्या उद्योग व्यवसायाच्या उत्पन्नाची नोंद करणे शक्य असते. परंतु असंघटित क्षेत्रातील चालणारे लहान मोठे उद्योजक स्वतः आपल्या व्यवसायाची व उत्पन्नाची नोंद ठेवत नाहीत. शिवाय त्यांनी निर्माण केलेल्या एकूण उत्पादनापैकी फार मोठा भाग ते स्वतःच्या उपभोगासाठी वापरतात. उदा. शेतकरी, लघु व कुटीर उद्योजक यांनी उत्पादन केलेला माल स्वतःच्या उपभोगासाठी देखील वापरतात. म्हणून असंघटित क्षेत्रातील राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करणे अडचणीचे असते.

### ४) व्यवसायानुसार उत्पन्नाचे मापन करणे कठीण :

भारतात एकच व्यक्ती एका वर्षात वेगवेगळ्या उद्योग व्यवसायात काम करते. उदा. भारतीय शेतकरी काही दिवस शेतात काम करतो तर काही दिवस उद्योगात काम करतो तर काही दिवस इतर छोटा मोठा व्यावसाय करतो. अशा परिस्थीतीत त्याच्या उत्पन्नाची विविध व्यवसायात पाहणी करणे कठीण असते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे योग्य मापन होत नाही.

### ५) काळा पैसा :

भारतात काळी व पांढरी अर्थव्यवस्था अस्तीत्वात आहे. काळ्या पैशाची निर्मिती चोऱ्या करणे, तस्कऱ्या करणे, उत्पन्न लपवून ठेवणे, कमी दाखवीणे यातून होते. प्रा. गुप्ता एस. यांच्या अभ्यासाप्रमाणे भारतात काळ्या पैशाचे प्रमाण जवळ जवळ ५०टक्के एवढे आहे. हा सर्व पैसा राष्ट्रीय उत्पन्न मापनात दर्शविला जात नाही. त्यामुळे एकूण राष्ट्रीय उत्पन्न कमी येते.

### ६) विश्वसनिय माहितीचा अभाव :

भारतात राष्ट्रीय उत्पनाच्या मापनाची विश्वसनीय अशी पद्धती अस्तित्वात नाही. भारतीय सांख्यीकीय संघटना ज्या विविध भागाकडून आकडेवारी गोळा करते. त्या विभागांनी दिलेली माहिती विश्वसनीय नसते. उदा. ऊस, कापूस, धान्य या बाबत माहिती असते तर भाजीपाला व फळ प्रक्रिया बाबत माहिती उपलब्ध नसते. अनेक डॉक्टर, वकील, चार्टड

अकौंटंट क्लास चालवीणारे आपल्या उत्पन्नाची योग्य ती माहिती देत नाहीत. या शिवाय छोटे-छोटे व्यावसायीक व उद्योजक आपल्या उत्पन्नाची सर्व माहीती देत नाहीत. परिणामी राष्ट्रीय उत्पन्न मापनात अनेक अडचणी येतात.

**७) बदली उत्पन्नाचा हस्तांतरीत उत्पन्नात समावेश केला जात नाही:**

शासकीय व निमशासकीय निवृत्ती धारकांना मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी व इतर प्रकारचे भत्ते यांचा राष्ट्रीय उत्पन्नात समावेश केला जात नाही. कारण हे निवृत्ती धारकांचे उत्पन्न असले तरी शासनाचा तो खर्च असतो. म्हणून अशा उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही.

**८) अमौद्रिक व्यवहार :**

ज्या वस्तु व सेवांची खरेदी विक्री पैशाच्या साह्याने केली जाते. अशा व्यवहाराचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो. परंतु भारतात अनेक व्यवहार पैशाच्या साह्याने केले जात नाहीत. आजही ग्रामीण भागात अनेक लोक स्वतःचे घर स्वतःच तयार करतात. तर शेतकरी भाजीपाला धान्य, दुध, कुकूटपालन व्यावसाय करतात तेव्हा या सर्व वस्तू स्वतःच्या उपभोगासाठी देखील वापरतात. परंतू त्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही.

या शिवाय राष्ट्रीय उत्पन्नाची नेमकी स्पष्ट व्याख्या कोणती ? मापनाची योग्य पद्धती कोणती ? आणि योग्य व स्पष्ट संकल्पना कोणती अशा संकल्पनात्मक अडचणी देखील येतात.

वरील प्रमाणे विविध अडचणी राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना येतात.

## २.५ उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह (CIRCULAR FLOW OF INCOME)


मानवाच्या अगदी सुरवातीच्या काळात गरजा अत्यंत कमी होत्या आणि आपल्या गरजा तो स्वतःच पूर्ण करत असे. पुढे लोकसंख्या वाढू लागली. त्याच्या गरजा देखील हळूहळू वाढू लागल्या. त्यातूनच वस्तु विनिमय पद्धती अस्तीत्वात आली. या मध्ये देखील अनेक अडचणी येत होत्या. त्यातूनच अग्नी, चाक, मत व पैशाचा शोध लागला पैशाच्या अविष्कारामुळे वस्तु विनीमय पद्धती बंद होऊन पैशाच्या साह्यायाने व्यवहार घेऊ लागले. लोकसंख्या वाढीबरोबर लोकांच्या गरजा देखील प्रचंड प्रमाणात वाढल्या अग्नी व चाकाच्या शोधामुळे वेगवेगळे उद्योग स्थापन होऊन औद्योगिकरणात वाढ झाली. अर्थव्यवस्थेत नेहमी एकाचा खर्च हे दुसऱ्याचे उत्पन्न असते. व्यक्तीने वस्तु व सेवा मिळवीण्यासाठी खर्च केल्यास उद्योगांचे उत्पन्न वाढते. कारण वस्तू व सेवा निर्माण करण्याचे कार्य उद्योग करतात. तर उद्योगाने उत्पादन वाढीसाठी उत्पादन घटकांच्या खरेदीसाठी खर्च केल्यास ते उत्पन्न कुटुंबाना प्राप्त होते. अशा प्रकारे आधुनिक अर्थव्यवस्थेत कुटुंबसंस्था व उद्योगसंस्था असे दोन स्वतंत्र घटक निर्माण झाले.

उद्योगांना वस्तू व सेवाच्या निर्मितीसाठी उत्पादन घटकांची गरज असते. उदा भूमी, श्रम, भांडवल व संयोजन हे सर्व घटक कुटुंब संस्था, उद्योगसंस्थांना पुरवीतात. तर घटकांचा मोबदला म्हणून उद्योगसंस्था, कुटुंबसंस्थांना खंड, वेतन व्याज आणि नफा देतात तसेच कुटुंबाना लागणाऱ्या वस्तु व सेवा उद्योग संस्थानकडून घेतात व त्यांचा मोबदला म्हणजे वस्तु व

सेवेची किंमत म्हणजेच उपभोग खर्च म्हणून उद्योग संस्थाना त्यांची किंमत देतात. अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्न कुटूंब संस्थांकडून उद्योग संस्थांकडे व उद्योगसंस्थांकडून पुन्हा कुटुंबसंस्थाकडे चक्राकारगतिने सतत फिरत असते. यालाच राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्रकार प्रवाह असे म्हणतात. राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह अर्थ व्यवस्थेत सतत सुरु राहतो. तथापि राष्ट्रीय उत्पत्ताचा चक्राकार प्रवाह बंदिस्त अर्थव्यवस्थेत व मुक्त किंवा खुल्या अर्थव्यवस्थेत कशा प्रकारचा असतो हे पुढील दोन प्रकारे स्पष्ट करता येईल.

### २.५.१ द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह. (Circular flow of Income in the Two Sector Economy):

द्विक्षेत्रीय प्रतिमान प्रामुख्याने कुटुंबसंस्था आणि उद्योगसंस्था ही दोन मध्यत्वाचे क्षेत्रे असतात. यांनाच घटक बाजार व वस्तु बाजार असे देखील म्हणतात. या प्रतिमानात कुटुंब संस्था आपल्याकडील भूमी श्रम, भांडवल व संयोजन हे घटक उद्योग संस्थांना पुरवितात तर उद्योगसंस्था त्यांचा मोबदला म्हणून खंड वेतन, व्याज व नफा कुटुंब संस्थाना देतात. त्याच प्रमाणे उद्योग संस्था उत्पादन घटकांच्या साह्यायाने विविध वस्तू व सेवांची निर्मिती करतात. व त्या कुटुंब संस्थांना पुरवीतात. त्या वस्तु व सेवांचा मोबदला म्हणजेच वस्तु व सेवांची किंमत कुटुंब संस्था उद्योग संस्थाना देतात म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्न कुटुंब संस्थांकडून उद्योग, संस्थांकडे आणि उद्योग संस्थांकडून कुटुंब संस्थांकडे सतत फिरत राहते. यालाच द्विक्षेत्रीय राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह असे म्हणतात हे आपण पुढील आकृतीने स्पष्ट करु




**आकृती क्र. २.१**


**द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह**

अर्थव्यवस्थेत १)कुटुंब संस्था २) उद्योग संस्था अशी दोन क्षेत्रे असतात.

वरील आकृतीमध्ये कुटुंबसंस्था आणि उद्योग संस्था ही दोन स्वतंत्र क्षेत्रे असून कुटुंबसंस्था भूमी, श्रम, भांडवल व संयोजन हे उत्पादनाचे घटक उद्योग संस्थांना पुरवीतात तर त्यांचा मोबदला म्हणून उद्योग संस्था खंड, मजूरी, व्याज व नफा कुंटुंब संस्थांना देतात. त्याच प्रमाणे उद्योग संस्था वस्तु व सेवा कुटुंब संस्थाना पुरवीतात तर त्या वस्तू व सेवांची किंमत (उपभोग खर्च) कुटुंबसंस्था उद्योग संस्थाना देतात. अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह कुटुंबसंस्थांकडून उद्योग संस्थांकडे व उद्योग संस्थाकडून कुटुंब संस्थाकडे सतत चालू राहतो.

### **२.५.२ त्रिक्षेत्रीय अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह (Circulcer Flow of Income in Three Sector Economy)**

द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेत फक्त कुटुंब संस्था व उद्योग संस्था असून एकूण बचती बरोबर एकूण गुंतवणूक असते असे गृहित मानले आहे. परंतु प्रस्तुत त्रिक्षेत्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहामध्ये कुटुंबसंस्था उद्योग संस्था या दोन क्षेत्राबरोबरच शासनसंस्था देखील असते असे मानले असून शासन देखील कुटुंबाप्रमाणेच वस्तु व सेवांची खरेदी करतात आणि विक्री देखील करतात. म्हणून या उत्पन्नाच्या प्रवाहामध्ये आपण शासन संस्थेचा विचार करणार आहोत यास्तव पुढील आकृतीमध्ये १) कुटुंबसंस्था २) उद्योगसंस्था, ३) शासन संस्थांचा विचार करुन उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करु.




**आकृती क्र. २.२**

**त्रिक्षेत्रीय अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह**

munotes.in

त्रिक्षेत्रीय अर्थव्यवस्थेत प्रामुख्याने भूमी, श्रम, भांडवल व संयोजक
१) कुटुंबसंस्था, २) उद्योगसंस्था, ३)शासन संस्था या घटकांचा समावेश होतो.

वरील आकृतीमध्ये कुटुंबसंस्था व उद्योग संस्था बरोबर शासन संस्था हे देखील एक महत्त्वाचे क्षेत्र असून ते आकृतीमध्ये दर्शवीले आहे. या घटकांचा सविस्तर उहापोह पुढील प्रमाणे.

**१) कुटुंबसंस्था:**

कुटुंबसंस्था उद्योगसंस्थेला उत्पादनाचे घटक पुरवितात व त्या मोबदल्यात उद्योगसंस्थेकडून खंड, वेतन, व्याज व नफा घेतात. तसेच त्यांनी केलेली बचत भांडवल बाजारात म्हणजे बँका, वित्तीय संस्थांमध्ये गुंतवितात आणि विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्ती च्या उत्पन्नावर शासन संस्थेला कर (Tax) भरतात. त्याच प्रमाणे कुटुंबसंस्थांना शासनाकडून – वेतन मजूरी व हस्तांतरीत उत्पन्न देखील प्राप्त होत असते.

**२) उद्योग संस्था:**

उद्योग संस्था कटुंब संस्थेकडून उत्पादनाचे घटक घेतात त्याचा मोबदला म्हणून कुटुंब संस्थांना खंड, मजुरी, व्याज व नफा देतात. तसेच उद्योग संस्था वस्तू व सेवांची निर्मिती करतात त्या वस्तू व सेवा कुटुंब संस्थांना व शासनाला देखील देतात आणि त्याची किंमत कुटुंब संस्था व शासन संस्थेकडून वसूल करतात. उद्योग संस्थेला उद्योग चालविण्यासाठी जे अल्पकालीन व दिर्घकालीन भांडवलाची गरज असते ते भांववल बँका, वित्तीय संस्था व शेअर्स मार्केट मधून उभारतात. उद्योग संस्थेचे विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त उत्पन्न वाढल्यास ते शासनाला प्रत्यक्ष व वेगवेगळे अप्रत्यक्ष कर भरतात त्याचप्रमाणे शासनदेखील वस्तु व सेवांची विक्री करतात.

**३) शासन संस्था :**

कुटुंब संस्था व उद्योगसंस्थेप्रमाणेच शासन संस्था देखील राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात महत्त्वपूर्ण भूमिका करते. शासन संस्था देशातील कुटूंब संस्था कडील जास्तीच्या उत्पन्नावर कर आकारुन पैसा उभारते. आणि कुटुंबसंस्थेकडील जास्तीच्या उत्पन्नावर कर आकारुन पैसा भारलते आणि कुटुंबसंस्थाकडील उत्पादन घटकांचा वापर करते. त्याचा मोबदला म्हणून कुटुंब संस्थाना वेतन, निवृत्ती वेतन, मजुरी बदली उत्पन्न देत असते. त्याच प्रमाणे शासन संस्था उद्योगसंस्थाकडून देखील विविध प्रकारच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांची वसूली करते. त्याबरोबरच उद्योगसंस्थां कडून विविध वस्तु व सेवांची खरेदी करुन त्याचा मोबदला उद्योग संस्थांना देते.

अशा प्रकारे वरील त्रिक्षेत्रीय प्रतिमान (Three Sector Model) बंद अर्थव्यवस्थेतील (Closed Economy) प्रतिमान आहे. कारण या त्रिक्षेत्रीय प्रतिमानात परकीय देशातील आयात व निर्यातीचा समावेश करण्यात आलेला नाही.


**२.५.३ चतु:क्षेत्रीय (खुल्या) अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह (Circular Flow of Income in the Four Sector Economy:**

या चतु:क्षेत्रीय खुल्या अर्थव्यवस्थेमधील प्रतिमानात प्रामुख्याने १) कुटुंबसंस्था २) उद्योगसंस्था ३) शासन संस्था ४) परकीय देश (क्षेत्र) इत्यादी क्षेत्राचा समावेश होतो.

**व्याख्या:**

जेव्हा उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहामध्ये स्वदेशातील आर्थिक व्यवहारांबरोबरच परकीय देशांबरोबर होणाऱ्या आयात व निर्यातीचा समावेश होतो तेव्हा त्याला खुल्या अर्थव्यवस्थेतील चतु: क्षेत्रिय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह असे म्हणतात.

चतुः क्षेत्रीय खुल्या अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह आपण पुढील आकृतीच्या साह्याने स्पष्ट करु.




**आकृती क्र.२.३**

**चतुः क्षेत्रीय (खुल्या) अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह**

चतु:क्षेत्रीय प्रतिमानामध्ये प्रामुख्याने-

१) कुटुंब संस्था २)उद्योगसंस्था ३) शासनसंस्था, ४) परकीय देश या चार क्षेत्रांचा समावेश होतो.

वरील आकृतीमध्ये कुटुंबसंस्था उद्योगसंस्था व शासन संस्थेबरोबरच परकीय देश हे देखील एक महत्त्वाचे क्षेत्र असून ते वरील आकृतीमध्ये दर्शवीले आहे.

वरील आकृतीमध्ये राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात परकीय क्षेत्राचे अनन्य साधारण महत्त्व असते म्हणून त्याचे सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे.

### १) परकीय क्षेत्र:

मुक्त अर्थव्यवस्थेच्या प्रतिमानात परकीय देशांबरोबर होणाऱ्या आयात व निर्यातीचा राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहावर प्रभाव पडत असतो. यास्तव परकीय क्षेत्र व उद्योग संस्था, कुटुंब संस्था व शासन संस्था यांच्यात होणारी आयात-निर्यात महत्त्वाची मानली जाते.

### २) उद्योगसंस्था व परकीय देश:

परकीय देश स्वदेशातील उद्योग संस्था विविध वस्तू व सेवांची परकीय देशात निर्यात करतात व त्या निर्याती पासून उद्योगसंस्थांना परकीय चलन प्राप्त होते. त्यामुळे राष्ट्रीय

munotes.in

उत्पन्नात वाढ होते. त्याचप्रमाणे उद्योग संस्था परकीय देशातून विविध वस्तु व सेवांची आयात करतात. त्या आयात वस्तूचे मूल्य विदेशांना प्राप्त होते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात घट होते.

**३) कुटुंब संस्था व परकीय देशः**

कुटुंब संस्थाकडून श्रम व भांडवलाची निर्यात होते. त्याचा मोबदला कुटुंब संस्थांना प्राप्त होतो. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. तसेच कुटुंब संस्थाकडून विदेशी वस्तु व सेवांची आयात केल्यास राष्ट्रीय उत्पन्नात घट होते.

**३) शासनसंस्था व परकीय देश :**

शासनाची एकूण निर्यात ही आयाती पेक्षा जास्त असल्यास राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. तर या उलट शासनाची एकूण निर्यात आयातीपेक्षा कमी असल्यास राष्ट्रीय उत्पन्नात घट होते.

थोडक्यात कुटुंबसंख्या उद्योग संस्था व परकीय देशांच्या एकूण आयात- निर्यातीच्या धोरणांचा राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहावर प्रभाव पडतो.

## २.६ सारांश

अर्थव्यवस्थेत अनेक घटक कार्यरत असतात आणि प्रत्येक घटकाचा दुसऱ्या घटकाशी प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष संबंध येत असतो. राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहामध्ये राष्ट्रीय उत्पन्न हे कुटुंब संस्थेकडून उद्योग संस्थेकडे व उद्योगसंस्थे कडून कुटुंबसंस्थेकडे सतत चक्राकार गतिने फिरत असते. परंतु बंदिस्त अर्थव्यवस्थेत हा प्रवाह द्विक्षेत्रीय आढळतो. एकूणच ह्या प्रवाहावर देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय अनेक घटकांचा परिणाम होत असतो.

munotes.in

## २.७ प्रश्न

१) राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या तीन पद्धती स्पष्ट करा.
२) राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना स्पष्ट करा.
३) राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या देवून राष्ट्रीय उत्पन्न मापनातील अडचणी स्पष्ट करा.
४) द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह स्पष्ट करा.
५) त्रिक्षेत्रीय अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करा.
६) चतुःक्षेत्रीय अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह विशद करा.

❖❖❖❖

## मॉड्युल - II

# ३

# उपभोग

**घटक रचना :**

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना
३.२ उपभोगाचा अर्थ
३.३ उपभोग फलन
३.४ 'से' यांचा बाजारपेठेचा नियम
३.५ प्रभावी मागणीचा सिद्धांत
३.६ सारांश
३.७ प्रश्न

## ३.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- उपभोग म्हणजे काय? हे समजून घेणे.
- उपभोग फलन म्हणजे काय? समजून घेणे.
- सीमांत उपभोग प्रवृत्ती व सरासरी उपभोग प्रवृत्ती या संकल्पनांचा अभ्यास करणे.
- से यांचा बाजारपेठेचा नियम व प्रभावी मागणीचा सिद्धांत अभ्यासणे.

## ३.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

प्रस्तुत प्रकरणामध्ये उपभोग म्हणजे काय? उपभोग फलन म्हणजे काय? से यांचा बाजारपेठेचा नियम आणि प्रभावी मागणीचा सिद्धांत आपण अभ्यासणार आहोत.

## ३.२ उपभोगाचा अर्थ (MEANING OF CONSUMPTION)

उपभोग म्हणजे घरगुती क्षेत्राने (Households) किंवा व्यक्तीने आपल्या गरजा भागविण्यासाठी किंवा उपयोगिता मिळविण्यासाठी केलेला वस्तू व सेवांचा उपभोग होय. उपभोग हा व्यक्तीच्या उत्पन्नाचे फलन असते. परंतू एकूण उपभोगाचे दोन भागांत वर्गीकरण केले जाते.



munotes.in

एक म्हणजे स्वायत्त उपभोग (Autonomous Consumption) व दुसरे म्हणजे प्रेरित उपभोग (Induced Consumption).

स्वायत्त उपभोग म्हणजे उत्पन्न कितीही असले म्हणजेच अगदी शून्य असले तरी व्यक्तीला जगण्यासाठी आवश्यक वस्तूंचा करावा लागणारा उपभोग होय. थोडक्यात, स्वायत्त उपभोग हा उत्पन्नावर आधारित नसतो.

प्रेरित उपभोग हा व्यक्तीच्या वाढत्या उत्पन्नासोबत वाढत जातो, तर याउलट व्यक्तीच्या घटत्या उत्पन्नासोबत घटत जातो म्हणजेच प्रेरित उपभोग उत्पन्नावर आधारित असतो.

## ३.३ उपभोग फलन (CONSUMPTION FUNCTION)

उपभोग फलन म्हणजे उत्पनात बदल झाला असता उपभोग खर्चात जो बदल होतो त्यातील गुणोत्तराला उपभोगफलन असे म्हणतात. सुरवातीला उत्पन्न आणि खर्च समान असतो. कारण उत्पन्न अतिशय कमी असते. उत्पन्न जसजसे वाढत जाते तसतशी उपभोगखर्चात वाढ होते. पण एका विशिष्ठ मर्यादेपर्यंत एका विशिष्ठ मर्यादेनंतर उत्पन्नात वाढ होत गेली असता उपभोग खर्चात वाढ होते पण ती घटत्या प्रमाणात असते कारण उत्पन्नाचा काही भाग बचतीकडे वळवला जातो.

प्रभावी मागणीच्या संतुलनात एकूण मागणी किंमत आणि एकूण पुरवठा किंमत यांच्या संतुलनामुळे प्रभावी मागणीचे संतूलन होते. उत्पादकांची एकूण अपेक्षा / एकूण प्राप्तीचा विचार करुन उत्पादन करतात. त्यामुळे उत्पादनावर खर्च करण्याची उपभोक्त्याची क्षमता किवा प्रवृत्ती ही विचारात घ्यावी लागते. रोजगाराच्या माध्यमातून प्राप्त होणारे उत्पन्न किती आणि कोणत्या प्रमाणात खर्च केले जाते त्यावर उपभोग प्रवृत्ती महत्वाची आहे.

प्रभावी मागणी ही उपभोग खर्चावर अवलंबून असते. उपभोग खर्च अधिक तर प्रभावी मागणी अधिक असते. प्रभावी मागणी ही जरी एकूण मागणी किंमत आणि एकूण पुरवठा किंमत यांच्या संतुलनातून होते. प्रभावी मागणीवर उपभोगखर्चाचा प्रभाव पडतो. उपभोग खर्चावर रोजगार पातळीचा प्रभाव पडतो. देशातील सर्वच श्रमिकांना रोजगार प्राप्त झाला की उत्पादकाचे उत्पन्न वाढते, उत्पादन वाढले की उत्पादन विक्रीच्या विक्रिपासूनची अपेक्षित प्राप्ती वाढते. एकूण प्राप्ती वाढली की श्रमीकांचे उत्पन्न वाढते आणि श्रमिकांचा उपभोग वाढतो. त्यामुळे प्रभावी मागणी उपभोगाशी निगडीत आहे.

उपभोग फलन म्हणजे उत्पन्न आणि उपभोगामध्ये आढळून येणारा संबंध होय. उपभोगप्रवृत्ती आणि उत्पन्नात फलनात्मक संबंध असतो कारण उत्पन्न वाढले की उपभोग वाढतो. उत्पन्न कमी झाल्यास उपभोग कमी होतो. उपभोग प्रवृत्ती दोन घटकांशी संबंधीत असते १) उत्पन्न (Y) २) उपभोग (C) आणि फलनासाठी (F) सूत्ररुपात

C = F(Y)
C = उपभोग

F = कार्यात्मक संबंध

Y = उत्पन्न

उपभोगफलनाची संकल्पना अर्थतज्ञ जे. एम केन्स यांनी १९३६ मध्ये रोजगार, व्याज आणि पैसा विषयक सर्वसाधारण सिद्धांन्त हा ग्रंथ लिहला.

केन्सने उपभोग हा उपभोगखर्च या अर्थाने वापरला आहे. समाजास प्राप्त होणाऱ्या उत्पनातून समाज उपभोगावर खर्च करतो. त्यामुळे संबंधित समाजाच्या उत्पन्नातून समाजाचा उपभोग खर्च होतो. खर्च व उत्पन्न यांचा संबंध असतो. उपभोग प्रवृत्तीच्या व्याख्या -

१) ''उपभोग प्रवृत्ती ही व्यक्तीचे उत्पन्न आणि खर्च करण्याचे प्रमाण दर्शविणारे प्रमाण होय.''
२) ''उपभोग प्रवृत्ती म्हणजे विशिष्ट उत्पन्नाच्या स्तराला ते उत्पन्न व त्या उत्पन्नातून होणारा उपभोग खर्च ह्याच्यातील सहसंबंध होय.'' केन्स
३) ''उपभोग प्रवृत्ती म्हणजे उत्पन्न आणि खर्च यांचा संबंध सागणारे प्रमाण होय.''


**उपभोगफलन पत्रक :**

निरनिराळ्या उत्पनाच्या पातळ्या असताना लोक उत्पनातील किती भाग उपभोगावर खर्च करण्यास तयार असतात हे उपभोगफलन पत्रकाच्या सहाय्याने दर्शविले आहे.

**उपभोग फलन कोष्टक**

| उत्पन्न (कोटी रु.)(Y) | उपभोग (कोटी रु.) (C) | बचत (S) कोटीत (S) |
|---|---|---|
| ० | १५ | -१५ |
| ५० | ५० | ०० |
| ७५ | ६० | १० |
| १०० | ७५ | १५ |
| १२५ | ९५ | २० |
| १५० | १२० | २५ |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की उत्पन्न शून्य असताना उपभोग २५ कोटी होता याचा अर्थ शिल्लक बचत उपभोगासाठी वापरली जाते. उत्पन्न २५ कोटी रु. उपभोग ५० कोटी रु. मात्र जसजशी उत्पन्नात वाढ होत जाते तसतसे उपभोगावरील खर्च वाढत जातो मात्र तो घटत्या दराने वाढतो. उत्पन्नात होणाऱ्या वाढी बरोबर बचत वाढत जाते जेव्हा उत्पन्न १५० कोटी रुपये होते तेव्हा उपभोगावरील खर्च १२० कोटी रुपये होते बचत २५ कोटी रुपयाची होते. उपभोगातील वाढ उत्पन्नातील वाढीपेक्षा कमी असते म्हणून जसजसे उत्पन्न वाढत जाते तसतशी उत्पन्नातील वाढ व उपभोग खर्चातील वाढ यातील तफावत वाढत जाते यालाच बचत म्हणता येईल.




आकृतीत दाखवल्याप्रमाणे OX अक्षावर उत्पन्न व OY अक्षावर उपभोग दाखवला आहे OS ही रेषा ४५ अंशाचा कोन करुन काढली आहे. K बिंदूत उत्पन्न आणि उपभोग समान आहे. याचाच अर्थ K बिंदूत बचत शून्य आहे. पूढे जसजसे उत्पन्नात वाढ होत जाते. तसतसे उपभोग खर्चात देखील वाढ होते मात्र ती वाढ घटत्या प्रवृत्तीची दिसून येते. उत्पन्न OM झाले असता उपभोग N1M एवढा घेतला जातो व बचत NN1 एवढी केली जाते. उत्पन्न OM वरून OM1 एवढे झाले असते बचत DD1 एवढी होते अशा तऱ्हेने उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर उपभोग + बचत या दोन्हीत वाढ होताना दिसून येते. अल्पकाळात उपभोग प्रवृत्ती स्थिर असते असे केन्सचे मत आहे.

### ३.३.१ उपभोग फलनाचे प्रकार :

उपभोग फलनाचे पूढीलप्रमाणे दोन प्रकार आहेत अ) सरासरी उपभोग प्रवृत्ती व (ब) सीमांत उपभोग प्रवृत्ती

### अ) सरासरी उपभोग प्रवृत्ती (Average propensity to consume):

एका विशिष्ट कालावधीत एकूण उपभोग खर्चाचे एकूण उत्पन्नाशी जे प्रमाण असते ते म्हणजे सरासरी उपभोग प्रवृत्ती होय. यासाठी एकूण उपभोग खर्चाला एकूण उत्पन्नाने भागले असता सरासरी उपभोग प्रवृत्ती मिळते.

सूत्ररुपाने,

$$\text{सरासरी उपभोग प्रवृत्ती} = \frac{\text{एकूण उपभोग खर्च}}{\text{एकूण उत्पन्न}}$$

$$APC = \frac{C}{Y} \frac{\text{Consumption Expenditure}}{\text{Income}}$$

समजा एका विशिष्ट वेळी राष्ट्रीय उत्पन्न ८०० कोटी रुपये असून उपभोग खर्च ७०० कोटी रु असेल तर सरासरी उपभोग प्रवृत्ती

$$\frac{७००}{८००} = ०.८७ \text{ राहील}$$

**सरासरी उपभोग प्रवृत्तीचे महत्व:**

सरासरी उपभोग प्रवृत्तीवरून सरासरी बचत प्रवृत्तीची कल्पना येते. कारण एकूण उत्पन्न हे उपभोग व बचत यांच्या बेरजेबरोबर असते. याशिवाय उपभोग वस्तूंसाठी समाजाची मागणी किती आहे. याची कल्पना सरासरी उपभोग प्रवृत्तीवरून येते.

**ब) सीमांत उपभोग प्रवृत्ती (Marginal Propensity to Consume):**

एकूण उपभोगात होणाऱ्या बदलाचे एकूण उत्पन्नात होणाऱ्या बदलाशी असणारे प्रमाण म्हणजे सीमांत उपभोगप्रवृत्ती होय. उपभोगात होणाऱ्या बदलाला उत्पन्नात होणाऱ्या बदलाने भागिले असता सीमांत उपभोग प्रवृत्ती (MPC) मिळते.

$$\text{सीमांत उपभोग प्रवृत्ती} = \frac{\text{एकूण उपभोगात होणारा बदल}}{\text{एकूण उत्पन्नात होणारा बदल}}$$

$$MPC = \frac{\Delta C}{\Delta Y}$$

समजा एकूण उत्पन्न ८०० कोटी रु. असताना ७०० कोटी रु उपभोग खर्च होता. एकूण उत्पन्न वाढीस ९०० कोटी रु. झाले असताना एकूण उपभोग वाढून ७८० कोटी रु. झाला. एकूण उत्पन्नात पूर्वीपेक्षा १०० कोटी रुपयांनी वाढ झाली व त्यामुळे एकूण उपभोगात पूर्वीपेक्षा ८० कोटी रुपयांनी वाढ झाली. याकरीता पूढीलसुत्राचा वापर करता येईल.

$$\text{सीमांत उपभोग प्रवृत्ती} = \frac{\Delta C}{\Delta Y} = \frac{\text{एकूण उपभोगात होणारा बदल}}{\text{एकूण खर्चात होणारा बदल}}$$

अशा प्रकारे येथे सीमांत उपभोग प्रवृत्ती ही एकूण उत्पन्नातील अतिरिक्त वाढ व एकूण उपभोगातील अतिरिक्त वाढ यातील संबंध व प्रमाण दर्शविते.

**३.३.२ सीमांत उपभोग प्रवृत्तीची वैशिष्ट्ये:**

१) सीमान्त उपभोग प्रवृत्ती ही नेहमीच धनात्मक असते. कारण एकूण उत्पन्नात वाढ होत असताना एकूण उपभोग खर्चातही वाढ होत असते.

२) सीमांत उपभोग प्रवृत्ती नेहमी ० पेक्षा अधिक १ पेक्षा कमी राहील कारण एकूण उत्पन्नात होणाऱ्या वाढीच्या मानाने एकूण उपभोग खर्चात होणारी वाढ ही कमी असते. एकूण उपभोग खर्चात होणारी वाढ ही कमी कमी होत असल्याने सीमांत उपभोग प्रवृत्ती घटत जाते. या कारणामुळे उपभोग-प्रवृत्ती दर्शन वक्र खालून वर जाताना व OX अक्षाकडे झूकत जातो. उत्पन्नात झालेली संपूर्ण वाढ उपभोगावर खर्च झाली असती तर सीमांत उपभोग प्रवृत्ती एक आली असती. अशा वेळी उत्पन्नातील वाढ उपभोगातील वाढ असे समीकरण तयार झाले असते.

३) गरीबवर्गाची सीमांत उपभोगप्रवृत्ती ही श्रीमंत वर्गाच्या सीमांत उपभोग प्रवृत्तीपेक्षा जास्त असते. श्रीमंत वर्गाच्या मूलभूत गरजा पूर्ण झालेल्या असतात व त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात झालेल्या वाढीचा कमी भाग उपभोगावर खर्च होतो. म्हणून श्रीमंताचे उत्पन्न वाढत असताना

उपभोगाचे प्रमाण कमी होते. म्हणून श्रीमंतांचे उत्पन्न वाढत असताना उपभोगाचे प्रमाण कमी होते व बचतीचे प्रमाण वाढते. उलट गरीब वर्गाच्या मूलभूत गरजासूद्धा पूर्ण होत नाहीत कारण त्याचे उत्पन्न कमी असते म्हणून जेव्हा त्याच्या उत्पन्नात वाढ होते तेव्हा त्या उत्पन्नाचा मोठा भाग उपभोगावर खर्च होतो. म्हणून सीमांत उपभोग प्रवृत्ती ही जास्त असते.

४) श्रीमंत देशापेक्षा आर्थिकदृष्ट्या गरीब देशांची उपभोग प्रवृत्ती जास्त असते.

५) उत्पन्नातील वाढीबरोबर सरासरी व सीमांत उपभोग प्रवृत्ती दोन्ही ऱ्हास पावतात. परंतु सीमांत उपभोग प्रवृत्ती तीव्रगतीने ऱ्हास पावते.

### ३.३.३ सीमांत उपभोगप्रवृत्तीचे महत्व:

१) उत्पन्न व उपभोगातील अंतर सीमांत उपभोग प्रवृतत्तीने समजते. जर उपभोग खर्च व उत्पन्न यातील अंतर जर गुंतवणूक खर्चामुळे भरुन काढता आले तर रोजगाराची पातळी कायम ठेवता येते.

२) अर्थव्यवस्थेचे संतूलन अपूर्ण रोजगारीच्या पातळीला का होते याची कल्पना येण्यासाठी सीमांत उपभोग प्रवृत्ती उपयुक्त ठरते.

३) सरकारला आर्थिक धोरण ठरविण्यासाठी सीमांत उपभोग प्रवृत्ती उपयूक्त ठरते. एकूण उत्पन्नाच्या वाढीचे, उपभोग आणि गुंतवणूक यामध्ये कसे विभाजन होते हे समजते.

४) विकसीत देशांच्या अर्थव्यवस्थेचे सापेक्ष स्थैर्य याविषयी सापेक्ष विवेचन करण्यास सीमांत उपभोग प्रवृत्ती कल्पना उपयुक्त ठरते.

### ३.३.४ केन्सच्या उपभोगाफलनाची गृहीतके (Assumptions of Keynes Consumption Function):

**१) सामान्य स्थितीचे अस्तित्व:**

हा नियम सामान्य स्थितीत अस्तित्वात असतो या गृहीतावर आधारीत आहे. सामान्य स्थितीत हा नियम अनुभवास येतो. युद्ध, चलनवाढ अशा असामान्य स्थितीत हा नियम अनूभवास येत नाही.

**२) खूली भांडवली अर्थव्यवस्था:**

जेथे सरकारी हस्तक्षेप नाही अशा भांडवलशाही अर्थव्यवस्थेत या नियमाचा प्रत्यय येतो.

**३) मानसशास्त्रीय व संस्थात्मक घटक स्थिर:**

उत्पन्नाचे वाटप, आवड-निवड, सवयी, सामाजिक चालीरीती, लोकसंख्या वाढ हे घटक अल्पकाळात स्थिर असतात. उपभोग केवळ उत्पन्नावर अवलंबून असतो.

### ३.३.५ उपभोग फलनावर परिणाम करणारे घटक (Factors Affecting Consumption Function):

**अ) व्यक्तीनिष्ठ घटक (Subjective Factor):**

व्यक्तीची उपभोग प्रवृत्ती ही त्याच्या मनोवृत्तीवर अवलंबून असते. अनूवंशिकता व सभोतालची परिस्थीती यामधून व्यक्तीची मनोरचना बनत असते. व्यक्तिनिष्ठ घटक व्यक्तीला आपल्या उत्पन्नातून अधिक खर्च करण्यास परावृत्त करतात.उपभोग फलनावर परिणाम करणारे व्यक्तीनिष्ठ घटक पुढीलप्रमाणे आहेत -

**१) अपत्यप्रेम :**

आपल्या मृत्यूनंतर आपल्या मूलांना संपत्ती मिळावी मुलांचे जीवन सूखी व्हावे या प्रेमापोटी व्यक्ती काटकसर करून बचत करीत असतात.

**२) व्यवसायिक हेतू :**

एखादा उद्योग किंवा व्यवसाय सूरू करण्यासाठी भांडवलाची गरज असते. त्यासाठी व्यक्ती आपल्या उत्पन्नाचा अधिक भाग बचत करुन भांडवल जमवतात. त्यामुळे उपभोग प्रवृत्तीत घट होते.

**३) प्रगतीची इच्छा:**

प्रत्येक व्यक्तीला आपली आर्थिक व सामाजिक प्रगती व्हावी अशी त्याची इच्छा असते. प्रगतीच्या त्याच्या तीव्र इच्छेने व्यक्ती आपल्या उत्पन्नातून बचत करीत असतो त्यामुळे उपभोगप्रवृत्ती कमी होते.

**४) व्याज मिळविण्याचा हेतू :**

व्याजरुपाने उत्पन्न मिळावे व आपल्या उत्पन्नात वाढ व्हावी या हेतूने आपले सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च करण्याऐवजी त्यातून बचत केली जाते उपभोग खर्च कमी केला जातो.

**५) सामाजिक प्रतिष्ठा हेतू :**

समाजामध्ये श्रीमंत व्यक्तीला प्रतिष्ठा अधिक मिळावी म्हणून अधिक पैशाची बचत करुन श्रीमंत होण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे बचत वाढल्यामूळे खर्च कमी होतो.

**६) राहणीमान हेतू :**

आपल्या राहणीमानात वाढ घडवून आणण्यासाठी जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याचा व्यक्तीचा प्रयत्न असतो त्यासाठी व्यक्ती अधिक बचत करुन गुंतवणूक करते त्यामुळे उपभोग घटतो.

**७) कंजूसपणाचा हेतू :**

समाजामध्ये काही व्यक्ती कंजूस असतात. आपल्या उपभोगावर कमीत कमी पैसा खर्च करुन बचत अधिक करतात संपत्ती संचय करण्यातच त्यांना अधिक आनंद मिळतो त्यामुळे उपभोग कमी होतो.

**८) लोकसंख्या:**

देशातील लोकसंख्येची रचना, आकारमान, कूटूंबातील व्यक्ती इ. उपभोगावर परिणाम होतो लोकसंख्येचे शहरीकरण झाल्यास ग्रामीण भागातील लोकांपेक्षा त्याचा उपभोग जास्त राहतो कारण शेतीत मिळणाऱ्या अनिश्चित उत्पन्नापेक्षा शहरीभागात निश्चित पगार मिळतो. त्यामुळे त्याचा उपभोग जास्त राहतो.

**९) कर्जाचा भार:**

व्यक्तीवर कर्जाचा भार हा समाजाच्या उपभोग प्रवृत्तीवर प्रभाव पाडतो. जर व्यक्तीवर कर्जाचा भार जास्त असेल तर मूद्दल व व्याज याची परतफेड करण्यासाठी उत्पन्नाचा सर्वाधिक भाग खर्च होतो साहजिकच उपभोग प्रवृत्ती अल्प राहते.

munotes.in

**१०) रोकड प्राधान्यप्रवृत्ती:**

दैनंदीन हेतू, व्यापार हेतू, दक्षता हेतूने स्वत:जवळ रोख रक्कम अधिक ठेवतो. अशावेळी उपभोग प्रवृत्ती जास्त राहते उलट रोकड प्राधान्य जेवढी कमी तेवढा उपभोग कमी राहतो.

**११) टिकाऊ वस्तूचा साठा :**

लोकांजवळ टिकाऊ वस्तू भरपूर प्रमाणात असल्यास त्या वस्तू पून्ह पून्हा घेतल्या जात नाहीत. त्यामुळे उपभोग कमी राहतो. परंतु अल्पकाळ टिकणाऱ्या वस्तूचा उपभोग जास्त राहतो.

**१२) सामाजिक विम्याच्या सोयी:**

देशात जीवनविमा, भविष्यसूरक्षा विमा किंवा सामाजिक विम्याच्या सोयी उपलब्ध असतील तर विम्याचे हप्ते भरण्यासाठी लोकांच्या उत्पन्नाचा अधिक भाग वापरला जातो त्यामुळे उपभोग प्रवृत्ती घटते.

**१३) दूरदृष्टी :**

भविष्यकालीन खर्चाविषयी अंदाज बांधून व्यक्ती आपल्या उत्पन्नाचा बराच भाग भविष्यासाठी शिल्लक ठेवतात. म्हातारपणाच्या काळातील खर्च, मूलांचे संगोपन शिक्षण, लग्ने इ. खर्चासाठी उत्पन्नाचा काही भाग राखून ठेवला जातो. त्यामुळे उपभोग खर्च कमी होतो.

**१४) तरतूदीचा हेतू :**

भविष्यात अचानक उद्‌भवणाऱ्या अडचणींना तोंड देता यावे या हेतूने व्यक्ती आपल्या उत्पन्नाचा काही भाग शिल्लक ठेवतो आजारपणा, अपघात, बेकारी अशा स्वरुपाच्या अडचणी आकस्मितरित्या उद्‌भवतात त्याना तोंड देण्यासाठी लोक आपल्या उत्पन्नाचा काही भाग राखून ठेवतात त्यामुळे उपभोगप्रवृत्ती घटते.

**१५) स्वातंत्र्याचा हेतू :**

व्यक्तीच्या जवळ भरपूर उत्पन्न झाले असता तिची आर्थिक विवंचनेतून सूटका होते. आर्थिक स्वातंत्र्याचा लाभ होतो.

**१६) अभिमान हेतू:**

आपल्या कर्तृत्वाचा व संपत्तीचा हेतू दर्शविण्याच्या हेतूने व्यक्ती अधिक काम करतात बचतीच्या लोभापायी खर्च कमी होऊन उपभोग प्रवृत्ती घटते.

**ब) उपभोग फलनावर परिणाम करणारे वस्तूनिष्ठ घटक (Objective Factors):**

वस्तूनिष्ठ घटकाचा उपभोग प्रवृत्तीवर अधिक परिणाम दिसून येतो हे घटक पुढील प्रमाणे -

**१) किंमतपातळी:**

लोकांचे उत्पन्न स्थिर असताना किंमत पातळी वाढल्यास उपभोग प्रवृत्ती घटते. उलट किंमत पातळीत घट झाली असता उपभोग प्रवृत्ती वाढते.

munotes.in

### २) उत्पन्नपातळी:

उत्पन्नाच्या पातळीमध्ये जसे बदल होतात तसे उपभोग प्रवृत्तीवर परिणाम होतो. उत्पन्न पातळीत वाढ झाली उपभोग वाढतो. उलट उत्पन्न कमी झाले असता उपभोग कमी होतो.

### ३) उत्पन्नाचे वाटप:

उत्पन्नाचे वाटप समाजात कसे झाले आहे यावर उपभोग प्रवृत्ती अवलंबून असते. समाजात उत्पन्नाचे वाटप समान झाले असेल तर उपभोग जास्त राहतो. उलट उत्पन्नाची वाटणी असमान झाली असेल तर गरिबांच्या वाट्याला कमी हिस्सा मिळतो. त्यामुळे उपभोग कमी होतो.

### ४) राज्य वित्तीय धोरण:

राज्यवित्तीय धोरणाचा अधिक परिणाम उपभोग प्रवृत्तीवर दिसून येतो कारण जर सरकारने जनतेवर फार मोठ्या प्रमाणावर विविध कर लादले, तसेच देशांतर्गत मोठ्या प्रमाणावर कर्ज उभारले तर लोकांच्या हातातील पैसा कमी होऊन उपभोगावरील खर्च कमी होतो. त्यामुळे उपभोग प्रवृत्ती घटते.

### ५) महामंडळाचे वित्तीय धोरण:

देशात विविध उद्योगधंदे चालवणाऱ्या महामंडळाच्या वित्तीय धोरणावर उपभोग प्रवृत्ती अवलंबून असते. उद्योगधंदे चालवणाऱ्या महामंडळाची घसारा व राखीव निधी म्हणून जास्त रक्कम बाजूला काढून ठेवली जात असेल तर भागधारकांना लाभांश कमी मिळेल. त्यामुळे त्याच्या मागणीवर परिणाम म्हणजेच उपभोग प्रवृत्ती कमी होईल.

## ३.४ 'से' यांचा बाजारपेठेचा नियम (SAY'S MARKET LAW)

### रोजगार विषयक सनातनी विचार:

सनातनवादांच्या मते अर्थव्यवस्थेत नेहमी पूर्ण रोजगाराची परिस्थिती असतेच कदाचीत अर्थव्यवस्थेतील पूर्ण रोजगाराची परिस्थीती घडून जरी बेकारी निर्माण झाली तरी निर्माण झालेली अशी बेकारी फार अल्पकाळ टिकते व पुन्हा अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगाराची परिस्थिती प्रस्थापित होते. त्यामुळे सनातनवाद्यांच्या मते अर्थव्यवस्थेत कायमपणे बेकारीची परिस्थीती कधीच नसते. नेहमी असते ती पूर्ण रोजगारीची परिस्थितीच होय. त्यामुळे अर्थव्यवस्थेत बेकारी असणे ही गोष्ट संभवनीय नाही. याच विचारसरणीला सनातनवाद्यांच्या रोजगारविषयक सिद्धांत असे म्हणतात.

१९ व्या शतकातील फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ जे. बी. से यांनी आपल्या Treatise on Political Economic या ग्रंथात बाजारपेठेचा सिद्धांत मांडला. त्याच्यामते "प्रत्येक पुरवठा आपली मागणी निर्माण करीत असतो." (Supply creates its own demand) सामान्यता एकूण पुरवठ्याएवढी एकूण मागणी असते याचाच अर्थ अर्थव्यवस्थेत जेवढ्या वस्तूचे उत्पादन होते व बाजारात वस्तूचा पुरवठा होतो. त्यासर्व वस्तूला मागणी येवून मागणी व पुरवठा याचा आपोआप समतोल साधला जातो. याचाच अर्थ मागणी व पुरवठा या दोन्ही शक्ती समान असतात असे 'से' यांनी गृहीत धरले आहे. वस्तूचा उत्पादनामुळे उत्पादन घटकांना व्याज, नफा, खंड व वेतन या रुपाने उत्पन्न मिळत आणि हे उत्पन्न उत्पादित वेळेवर वस्तूची खरेदी करायला पुरेशी असते किंवा हे उत्पन्न वस्तूच्या किंमती एवढे असते आणि म्हणूनच जेवढे उत्पादन होते तेवढीच मागणी असते. उत्पादन प्रक्रियेमुळे निर्माण होणाऱ्या उत्पादन घटकांच्या प्रवाहामुळे मागणी निर्माण होते असे सनातनवादी अर्थशास्त्रज्ञाना वाटते.

दिर्घकाळात सर्वच वस्तूंच्या मागणी आणि पुरवठ्यात समतोल साधला जात असला तरी अल्पकाळात काही तत्कालीन कारणामुळे असमतोल निर्माण होतो. हा तत्कालीन असमतोल दुर करुन परत समतोल प्रस्थापित करण्याचे कार्य किंमत करते. या तत्कालीन असमतोलाची जाणीव बाजारात किंमतीच्या रुपाने होते व किंमतीतील हा बदल लक्षात घेऊन उत्पादक आपल्या उत्पादनात योग्य तो बदल करतो उदाहरणार्थ काही कारणामुळे तांदळाचा पुरवठा मागणीपेक्षा जास्त झाला की तांदळाच्या किंमती घसरतात व उत्पादकांना सूचना मिळते की तांदळाचा पूरवठा कमी केला पाहिजे. उत्पादक त्यानुसार तांदळाचा पुरवठा कमी करुन आपली चूक सूधारतात व तांदळाच्या मागणी पूरवठ्यात समतोल प्रस्थापित होतो.

वस्तूच्या उत्पादनात दोन क्रिया अंतर्भूत असतात.

१) वस्तूचे उत्पादन करणे

२) उत्पादन घटकांच्या रोजगारीमुळे त्यांना उत्पन्न मिळणे.

या दोन क्रिया अशा प्रकारे घडून येतात की प्रत्येक पुरवठा मागणी निर्माण करतो.

$\Delta O = \Delta Y - \Delta E$

$\Delta O$= उत्पादामधील वाढ

$\Delta Y$= उत्पन्नातील वाढ

$\Delta E$= खर्चातील वाढ

उत्पादनातील वाढीमुळे लोकांच्या उत्पन्न पातळीमध्ये वाढ होते. त्यामुळे उपभोग खर्चात ही वाढ होते. अशा प्रकारे चक्राकार प्रवाहामुळे पूर्ण रोजगार प्रस्थापित होतो.

**तात्पूरते क्षेत्रीय असमानता:**

जे. बी. से यांच्या मतानुसार भांडवलशाही अर्थव्यवस्थेत दीर्घकाळात सर्वसाधारण समतोल निर्माण होत असला तरी काही काळासाठी क्षेत्रीय असमतोल निर्माण होणे शक्य असते काही वेळा उत्पादकानी केलेल्या चुकीच्या अंदाजामुळे काही वस्तूचा पुरवठा काही काळासाठी मागणीपेक्षा जास्तही होऊ शकतो किंवा कमीही होऊ शकतो परंतू पूर्ण रोजगारामुळे निर्माण झालेला असमतोल आपोआप नाहीसा होतो. खालील आकृतीच्या सहाय्याने अधिक स्पष्ट केले आहे.

**तात्पुरते क्षेत्रीय असमतोल:**


जे. बी. से यांच्याप्रमाणे भांडवलशाही अर्थव्यवस्थेत दीर्घकाळात सर्वसाधारण समतोल निर्माण होतो. कारण काही वेळा असमतोल निर्माण होण्याची शक्यता संयोजकानी केलेल्या चुकीच्या अंदाजामुळे एखाद्या वस्तूचा पुरवठा काही वेळा मागणीपेक्षा जास्तही होतो किंवा कमीही होण्याची शक्यता असते. परंतू अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार असल्यामुळे क्षेत्रीय समतोल आपोआप नष्ट होतो. उदा. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत एखाद्या वस्तुचा पुरवठा मागणीपेक्षा जास्त झाला असेल तर त्यावेळी दुसऱ्या एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठी उत्पादन घटक कमी पडून उत्पादन मागणीपेक्षा कमी झालेले असेल. विविध बाजारपेठांपैकी एखाद्या मागणीपेक्षा पुरवठा जास्त झालेला असतो. तर त्याचवेळी दुसऱ्या एखाद्या बाजारपेठेत मागणीपेक्षा पुरवठा कमी असतो अशा प्रकारचे क्षेत्रीय असमतोल तात्पूरत्या स्वरुपाचे असून किंमत यंत्रणेद्वारे ते आपोआप नाहीसे होतात. व दीर्घकाळात समतोल आपोआप साध्य होतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सर्वच बाजारपेठांत सर्वच वस्तूंचा पुरवठा मागणीपेक्षा जास्त झालेला आहे. मागणी कमी असल्यामुळे मालाचा उठाव कमी होऊन सर्वच बाजारपेठांमध्ये न खपलेल्या मालाने भरलेल्या आहेत. अशी परिस्थिती कधीच निर्माण होत नाही. अत्यूत्पादनाची स्थिती अशक्य असते. त्याचा परिणाम

munotes.in

म्हणजे सामान्य बेकरीसुद्धा अशक्य असते. सर्व उत्पादन साधने पूर्ण रोजगारीच्या स्थीतीत असतात.

### बचत गुंतवणूकीमध्ये समानताः

से यांच्या मतानुसार बचत आणि गुंतवणूकीत समानता आणण्याचे काम व्याज करते. व्याजदरातील बदल पैशाची बचत व गुंतवणूक निश्चित करते. यासाठी व्याजाचा दर लवचिक असला पाहिजे व्याज हे बचत करण्याचा मोबदला आहे. जेव्हा बचत ही गुंतवणूकीपेक्षा जास्त होते तेव्हा व्याजदर कमी होतो. परिणामतः भांडवल स्वस्त होते व गुंतवणूक वाढण्याची प्रवृत्ती दिसून येते. गुंतवणूकीला प्रेरणा मिळून त्यात वाढ होऊ लागते आणि बचतीचे प्रमाण कमी होऊ लागते. बचत आणि गुंतवणूक यात समानता प्रस्थापित होऊन व्याजदर स्थिरावते.




munotes.in

आकृतीत दाखवल्याप्रमाणे ox अक्षावर बचत व गुंतवणूक आणि oy अक्षावर व्याजदर दर्शविला आहे. समाजाची बचत व गुंतवणूक ox ही आहे. तर HH या रेषेने बचत व गुंतवणूकीत समानता प्रस्थापित झाल्याने OR हा व्याजदर निश्चित होतो. जेव्हा समाजाच्या बचतीत वाढ होते तेव्हा नवीन बचत वक्र S1S1 असा नवीन वक्र तयार होतो व तो गुंतवणूक वक्रास HH वक्रास E1 मध्ये छेदतो त्यामुळे E1 हा नवीन समतोल बिंदू असून व्याजदर OR,पर्यंत कमी होतो अशा प्रकारे अर्थव्यवस्थेत बचत व गुंतवणूकीत समानता व्याजदरामुळे होते व त्यामुळे अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित होतो.

### किंमत व वेतन यातील बदलः

पैशातील वेतन व वास्तव वेतन यांचा परस्पर प्रत्यक्ष संबंध असतो. पैशातील वेतनात वाढ झाली तर वास्तव वेतनात वाढ होते व जर पैशातील वेतन कमी झाले तर वास्तव वेतन कमी होते म्हणूनच श्रमीक वास्तव वेतनाचा आग्रह धरतात. से यांनी असे गृहीत धरले आहे की वेतनदरातील लवचिकतेमुळे मजूरांच्या मागणी व पुरवठ्यात समतोल साधला जाऊन पूर्ण रोजगाराची परिस्थिती निर्माण होते.

### ३.४.१ से यांच्या सिद्धांताची गृहीतत्वेः

१) बाजारात पूर्ण स्पर्धा आहे.

२) व्याजदर लवचिक असल्यामुळे बचत नेहमी गुंतवणूकीबरोबर असते.

३) वस्तू व सेवांच्या किंमती सरासरी खर्चाबरोबर आणि मजूरीचे दर सीमांत उत्पादकतेबरोबर असतात.

४) पैशाचा प्रवाह सतत चालू असतो. त्यामुळे बचत म्हणजे भांडवली वस्तूसाठी केलेला खर्च असतो.

५) अर्थव्यवस्थेत खूली अर्थव्यवस्था आहे.

६) सरकारचा कूठलाही हस्तक्षेप नाही.

७) मागणी व पुरवठा यातील समतोलाद्वारे उत्पादन घटकाच्या आणि वस्तूच्या किंमती ठरतात.

८) अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित झाला आहे.

९) किंमत, वेतन आणि व्याज यांच्यात लवचिकता असते.

१०) दिर्घकाल विचारात घेतला आहे.

### ३.४.२ से यांच्या सिद्धांन्तावरील टिका:

**१) अवास्त गृहीतके :**

से यांनी बाजारात पूर्ण स्पर्धा असते असे गृहीत धरले आहे पण ते चूकीचे आहे. प्रत्यक्षात बाजारात अपूर्ण स्पर्धा किंवा मक्तेदारी आढळून येते.

**२) अल्पकाळ महत्वाचा :**

से यांनी आपल्या सिद्धांन्तात दिर्घकाळाचा विचार केला आहे. परंतू केन्स यांच्या मते अल्पकाळ महत्वाचा आहे. कारण अल्पकाळ शाश्वत आहे.

**३) व्याजदर लवचिक नसतो :**

सनातनी अर्थशास्त्रज्ञाच्यामते व्याजाचे दर लवचिक असल्यामुळे बचत व गुंतवणूक यामध्ये समतोल साधला जातो. केन्स यांच्यामते प्रत्यक्षात व्याजाचे दर लवचिक नसतात आणि व्याजाच्या दरावर बचती व गुंतवणूका अवलंबून नसतात.

**४) पुर्ण रोजगार ही अपवादात्मक परिस्थीती आहे:**

केन्स यांच्यामते पूर्ण रोजगाराची परिस्थिती अपवादात्मक असते केन्स आपल्या सिद्धांतात सर्वसाधारणपणे समतोल पूर्ण रोजगारापेक्षा कमी रोजगार असताना साधला जातो.

**५) पैशाच्या मुल्य संग्रहणाकडे दूलर्क्ष:**

सनातनी अर्थशास्त्रज्ञांनी पैशाच्या विनिमय माध्यमाच्या कार्यावर भर दिया आहे. त्यांनी पैशाच्या मुल्य संग्रहणाच्या कार्याकडे दुर्लक्ष केले आहे. पैसा केवळ खर्च करण्याकरीता नसून भविष्याची तरतूद म्हणून केली जाते.

**६) अर्थव्यवस्था आपोआप चालणारी नसते:**

सनातनी अर्थशास्त्रज्ञांनी निर्हस्तक्षेप नितीचा आवलंब केला आहे. परंतू अर्थव्यवस्था आपोआप चालणारी नसते आपोआप चालणारी स्वंयनिर्भर अर्थव्यवस्था हे तत्व केन्सला मान्य नाही. त्याच्यामते भांडवलशाही अर्थव्यवस्थेची समाजरचनाच अशी असते की त्यात गरीब व श्रिमंत असे दोन वर्ग असतात. श्रीमंताकडे भरपूर संपत्ती असल्याने संपत्तीचा सर्वभाग उपभोगावर खर्च करतात. गरिबांना उत्पदना अभावि किमान गरजाही भागवता येत नाहीत अशा वेळी सरकारी हस्तक्षेप महत्वाचा असतो. त्यामूळे संपत्तीचे वितरण योग्य प्रकारे केले जाते.

### ७) मंदीची परिस्थीती ही वास्तवता आहे:

अर्थव्यवस्थेत मंदीची परिस्थिती निर्माण होणार नाही हे से यांचे मत अवास्तव असल्याने जागतिक महामंदीने सिद्ध केले. १९२९-३० च्या महामंदीच्या काळात मागणी घटत जाऊन किंमती घटत गेल्या व बेकारी वाढली म्हणजेच मंदी ही वास्तव घटना आहे.

### ८) एकूण मागणीच्या कमतरतेची शक्यता:

सनातनी अर्थशास्त्रज्ञांच्या मते मजूरीच्या दरात कपात केल्यास उत्पादनखर्च कमी होऊन वस्तूच्या किंमती कमी होतील परंतू केन्सच्या मते समग्रलक्षी दृष्टीकोनातून पाहिल्यास मजूरीच्या दरात कपात केल्यास समाजातील फार मोठ्या वर्गाचे उत्पन्न घटेल. त्यामुळे खरेदीशक्ती कमी होऊन एकूण मागणीत घट होते.

### ३.४.३ सेच्या सिद्धांताचा ध्वन्यार्थ:


१) पूरवठा मागणीला जन्म देतो अर्थव्यवस्थेचे कार्य चालू असताना प्रत्येक घटकाचे समायोजन होते.

२) उत्पादनात वाढ होत जाते तसतसे उत्पादन घटकाचे उत्पन्न वाढते व नवीन मागणी निर्माण होऊन वाढीव उत्पादन विकले जाते.

३) बेकारी निर्माण होत नाही बेकारी निर्माण झाली तर ती तात्पूरत्या स्वरूपाची असते व काही काळानंतर ती आपोआप नष्ट होते.

४) अर्थव्यवस्था कोणत्याही बाह्य प्रोत्साहनाशिवाय कार्यरत असते.

## ३.५ प्रभावी मागणीचा सिद्धांत




munotes.in

### ३.५.१ केन्सच्या सिद्धान्तावरील टीका (Limitations of Keynesian Theory):

**१) अवास्तव गृहीतके:**

पूर्ण स्पर्धा आढळत नाही, घटत्या उत्पादन फलाची प्रवृत्ती अभावाने आढळते. अर्थव्यवस्था बंदिस्त नसते, कूठलाही देश परकीय व्यापारापासून अलिप्त राहू शकत नाही. अल्पकालापेक्षा दिर्घकाळ महत्वाचा असतो. उत्पादन व उद्योगविद्या संघटन कौशल्य, श्रमाची कार्यक्षमता, इ. घटक स्थिर नसतात. केन्सचा सिद्धांत चूकीच्या गृहीतावर आधारलेला आहे.

**२) सर्वसाधारण सिद्धांन्त नव्हे:**

हा सिद्धांन्त सर्व देशांना लागू पडत नाही समाजवादी व साम्यवादी देशांसाठी हा सिद्धांत निरोपयोगी आहे.

**३) दिर्घकाळ विचारात घेतला नाही:**

केन्सच्या रोजगार सिद्धांत केवळ अल्पकाळाचा विचार करतो. दिर्घकाळात घडणाऱ्या घटनांचा व परिवर्तनाचा यात विचार केला नाही.

**४) सरकारी खर्च विचारात घेतला नाही:**

प्रभावी मागणी ही उपभोग खर्च आणि गुंतवणूक खर्च यावर अवलंबून असते. या दोन्ही खर्चाचा विचार त्यांनी खाजगी संदर्भात केला आहे.

**५) आधुनिक काळात कल्याणकारी पुरवठा फलनाकडे दूलर्क्ष:**

केन्स यांनी आपल्या सिद्धान्तात पुरवठा फलनाकडे दुलर्क्ष करुन मागणी फलनाकडे जास्त लक्ष केंद्रित केले त्यामुळे त्याचे विश्लेषण एकांगी वाटते.

**६) अपूर्ण रोजगाराची कल्पना अयोग्य:**

हॅझलिट यांच्यामते अपूर्ण रोजगाराची कल्पना अयोग्य आहे. बेकारी राहून अर्थव्यवस्थेत समतोल निर्माण होणे शक्य नाही बेकारी असते तेव्हा अर्थव्यवस्थेत कोठेतरी असमतोल असलाच पाहिजे.

**७) इतर घटक दुर्लक्षित:**

केन्सने आपला सिद्धांत प्रामुख्याने पैशाच्या संदर्भात मांडल्याने तो अवास्तव वाटतो कारण पैशा व्यतिरिक्त रोजगारावर परिणाम करणारे इतर अनेक घटक महत्वाचे असतात.

## ३.६ सारांश (SUMMARY)

प्रभावी मागणी ही एकुण मागणी किंमत व एकुण पुरवठा किंमत या प्रमुख घटकांमुळे निर्वारीत होते. यापैकी एकूण मागणी किंमत उपभोग खर्च, गुंतवणूक खर्च व सरकारी खर्च यावर अवलंबून असते. उपभोग खर्च उत्पन्न व उपभोग प्रवृत्तीवर आधारित असतो. उपभोग प्रवृत्ती ही सीमांत उपभोग प्रवृत्ती व सरासरी उपभोग प्रवृत्ती अशा प्रकारची असते. गुंतवणूक खर्च, व्याजारा दर व भांडवलाची सीमांत लाभक्षमता यावर अवलंबून असते. व्याजाचा दर हा मुद्रेची मागणी व मुद्रेचा पुरवठा निर्धारीत करते. मुद्रेची मागणी ही व्यवहार हेतू, दक्षता हेतू व सट्टेबाजीचा हेतू या

तीन हेतूंसाठी असते. भांडवलाची सीमांत लाभक्षमता ही भांडवलाची पुरवठा किंमत व भांडवला पासून अपेक्षित मागणी यामुळे निर्धारीत होते. अशाप्रकारे प्रभावी मागणी निर्धारीत होते.

## ३.७ प्रश्न (QUESTIONS)

१) उपभोग फलनाची व्याख्या देवून उपभोग फलनाचे प्रकार स्पष्ट करा.
२) 'से' यांचा बाजारपेठेचा नियम स्पष्ट करा.
३) प्रभावी मागणीचा सिद्धांत विशद करा.

❖❖❖❖

munotes.in

# ४

# गुंतवणूक

**घटक रचना :**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ गुंतवणूकीचा अर्थ

४.२ गुंतवणुकीचे प्रकार

४.३ भांडवलाची सीमांत लाभक्षमता

४.४ गुणक संकल्पना

४.५ सारांश

४.६ प्रश्न

## ४.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- गुंतवणूकीचा अर्थ समजून घेणे.
- गुंतवणूकीचे विविध प्रकार अभ्यासणे.
- भांडवलाची सीमांत उत्पादकतेचा अर्थ व निर्धारक घटकांचा अभ्यास करणे.
- गुणक संकल्पना अभ्यासणे.

## ४.१ गुंतवणूकीचा अर्थ (MEANING OF INVESTMENT)

नेहमीच्या व्यवहारात आपण सोने चांदी खरेदी करणे. जमीन घर खरेदी करणे यासाठी वापरलेला पैसा म्हणजे गुंतवणूक असे समजतो. अनेकदा कर्जरोखे भागभांडवल तारणभाग खरेदीसाठी वापरलेला पैसा यालाही गुंतवणूक असे समजतो. परंतु केन्सच्या मते ही खरी किंवा वास्तव गुंतवणूक नव्हे तर ही वित्तीय गुंतवणूक होय. वास्तव गुंतवणूक यालाच केन्स गुंतवणूक म्हणतो. केन्सच्या मते ज्या गुंतवणूकीमूळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते व अधिक लोकांना रोजगार मिळतो अशी कोणतेही गुंतवणूक ही वास्तव गुंतवणूक होय.

जोन रॉबिन्सनच्या मते गुंतवणूक म्हणजे भांडवलात वाढ होणे होय. अशी वाढ नवीन घर बांधल्याने अथवा नवीन कारखाना उभारल्याने होते. अस्तित्वात असलेल्या भांडवली वस्तूच्या साठयात प्रत्येक वर्षी जेवढी वाढ होईल ती वाढ म्हणजे गुंतवणूक होय. नवीन यंत्रसामूग्री, रस्ते, पूल, रेल्वे मार्ग, कारखान्यांची उभारणी, इत्यादीसाठी जी गुंतवणूक होते ती वास्तव गुंतवणूक होय.



munotes.in

अशी प्रभावी गुंतवणूक देशातील खाजगी व्यक्ती विविध संस्था बँका व सरकार यांच्याकडून केली जाते खाजगी क्षेत्रातील गुंतवणुक ही भांडवलाची सीमांत लाभक्षमता आणि व्याजदर या दोन घटकावर अवलंबून असते. सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक ही मात्र या दोन घटकांच्या प्रभावाशिवाय निर्धारित होत असते.

## ४.३ गुंतवणूकीचे प्रकार (TYPES OF INVESTMENT)

### १) निव्वळ गुंतवणूक (Net Investment):


ज्या गुंतवणूकांमुळे नक्त भांडवलामध्ये वाढ होते त्या गुंतवणूका निव्वळ गुंतवणूका म्हणून ओळखल्या जातात. निव्वळ गुंतवणूक - एकूण गुंतवणूका - घसारा

### २) स्वायत्त गुंतवणूक (Autonomous Investment):

जी गुंतवणूक खाजगी उपभोगामुळे प्रभावित न होता स्वतंत्रपणे होते तिला स्वायत्त गुंतवणूक असे म्हणतात. सार्वजनिक क्षेत्रात केली जाणारी ही स्वायत्त गुंतवणूक होय. कारण अशी गुंतवणूक नफ्याच्या प्रेरणेने होत नसून ती सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून केली जाते. रेल्वे, शस्त्रास्त्रे, दारुगोळा इ. साहित्याचे कारखाने आर्थिक विकासाच्या व समाजकल्याणाच्या योजना, सार्वजनिक गरजा भागविण्यासाठीच्या योजना इत्यादीसाठी केली जाणारी गुंतवणुक ही स्वायत्त गुंतवणूक होय. या गुंतवणूकीचा उत्पन्नाशी काही संबंध नसतो.

### ३) प्रेरित गुंतवणूक (Induced Investment):

ही गुंतवणूक नफ्याच्या प्रेरणेमुळे होते तिला प्रेरित गुंतवणुक म्हणता येईल. अशी गुंतवणुक खाजगी उपभोगाने प्रेरित होते. उपभोगात वाढ झाली असता प्रेरित गुंतवणूकीत वाढ होते. उपभोग घटला प्रेरित गुंतवणूक घटते. उपभोग हा उत्पन्नावर अवलंबून असतो. खाजगी भांडवलदार नफ्याच्या अपेक्षेने गुंतवणूक करत असतो.




### ४) स्थूल गुंतवणूक (Gross Investment):

एका विशिष्ट कालावधीत (एका वर्षात) निश्चित भांडवली साठ्यात व कच्च्या मालात होणारी एकूण गुंतवणूक म्हणजे स्थूल गुंतवणूक होय.

munotes.in

### ५) वित्तीय गुंतवणूक (Financial Investment):

अशा प्रकारच्या गुंतवणूकीमूळे भांडवली साठ्यात काहीही बदल होत नाहीत. असा गुंतवणूकीत देशात सध्या अस्तित्वात असणाऱ्या वस्तूंचीच नव्याने खरेदी केली जाते. उदा. जून्या कंपन्याचे भाग विकत घेणे इ. ही केवळ वित्तीय गुंतवणूक ठरते.

### ६) सार्वजनिक गुंतवणूक:

सार्वजनिक क्षेत्रात किंवा सरकारी उपक्रमात केली जाणारी गुंतवणूक सरकार समाजाच्या गरजा भागविण्यासाठी उदा. वीज, पाणी, रस्ते, दळणवळण वाहतूक, दूरसंचार, आरोग्याच्या सुविधा अशा कारणासाठी झालेली गुंतवणूक ही सार्वजनिक गुंतवणूक होय.

### ७) नियोजित गुंतवणूक:

सरकार काही निश्चित उद्दिष्टे समोर ठेवून गुंतवणूकीचे नियोजन करुन केलेली गुंतवणूक म्हणजे नियोजित गुंतवणूक होय. साक्षरतेचे प्रमाण विशिष्ट टक्क्यांनी वाढविण्यासाठी दरवर्षी स्थूल देशान्तर्गत उत्पादनाच्या किती टक्के गुंतवणूक शिक्षणावर खर्च करायची याबाबतचे नियोजन असते शिवाय भविष्यकालीन अंदाज बांधून उद्योजक गुंतवणूकीचे नियोजन करतात.

### गुंतवणूकीवर परिणाम करणारे घटक:

खाजगी क्षेत्रातील गुंतवणुक नफ्याच्या प्रेरणेने केली जाते नफा हा

१) भांडवलाची सीमांत कार्यक्षमता व

२) व्याजाचा दर या दोन घटकावर अवलंबून असतो. सामान्यता व्याजाच्या दरात फार मोठे बदल होत नसल्याने भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेला महत्व प्राप्त होते.

विशिष्ट वेळी किती भांडवल गुंतवणूक केली जाईल. हे भांडवलाची सीमान्त कार्यक्षमता व व्याजदर यावर अवलंबून असते जेव्हा व्याजदरापेक्षा भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त असते तेव्हा गुंतवणूक फायदेशीर होत असल्याने गुंतवणूकीने वाढ होते.

### गुंतवणूकीचे महत्व:

केन्सच्या रोजगारविषयक सिद्धांतात गुंतवणूक फलनाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे कारण देशातील रोजगार पातळी ठरविणारी प्रभावी मागणी ही उपभोग खर्च व गुंतवणूक खर्च यावरुन ठरते. अल्पकाळात उपभोग खर्च स्थिर असतो. त्यामुळे प्रभावी मागणी व रोजगारीची पातळी गुंतवणूकीत होणाऱ्या बदलानुसार ठरतात. देशातील रोजगार पातळीत वाढ होण्यासाठी, प्रभावी मागणीत वाढ होण्यासाठी गुंतवणूकीत वाढ झाली पाहिजे तरच राष्ट्रीय उत्पन्नाची व रोजगाराची पातळी टिकून राहील. म्हणूनच केन्सच्या रोजगार विषयक सिद्धान्तात गुंतवणूक फलनाचे महत्वाचे स्थान आहे.

## ४.४ भांडवलाची सीमांत लाभक्षमता (MARGINAL EFFICIENCY OF CAPITAL)

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता म्हणजे नवीन भांडवली साधनांपासून अपेक्षित असणारा लाभप्रदतेचा दर होय. हा भांडवली साधनांच्या सीमांत नगापासून उत्पादन खर्च वजा जाता

अपेक्षिलेला सर्वोच्च फलाचा दर होय. भांडवलीची सीमांत कार्यक्षमता ही जादा किंवा सीमांत भांडवलीची सीमांत कार्यक्षमता ही जादा किंवा सीमांत भांडवली मालमत्तेपासून मिळणारे संभाव्य उत्पन्न आणि भांडवली मालमत्तेची पुरवठा किंमत या दोन घटकांवर अवलंबून असते.

**भांडवलाच्या सीमान्त कार्यक्षमतेचा अर्थ:**

वास्तव गुंतवणूकीपासून अपेक्षिलेला संभाव्य प्राप्तीचा दर असे म्हणता येईल. जेव्हा एखाद्या उत्पादक भांडवलाची एक जास्तीचा माल आपल्या उत्पादनात वापरतो. तेव्हा त्यासाठी त्याला व्याजरुपाने काही खर्च सोसावा लागतो. अशा वेळी तो उत्पादक या जास्तीच्या मात्रेपासून काही प्राप्ती किंवा लाभ अपेक्षित धरतो. थोडक्यात नव्याने गुंतविलेल्या भांडवलापासूनचा अपेक्षित प्राप्तीचा दर म्हणजे भांडवलाची सीमांत कार्यक्षमता होय.

प्रा. कुरिहारा यांच्या मते अतिरिक्त भांडवली संपत्तीची अपेक्षित प्राप्ती व त्याची पुरवठा किंमत याचे गुणोत्तर म्हणजे भांडवलाची सीमांत लाभक्षमता होय.

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ही खालील दोन घटकांवर अवलंबून असते.
१) भांडवली साधनाचे अपेक्षित उत्पन्न. २) भांडवली साधनाची पुरवठा किंमत.

**१) भांडवली साधनांची अपेक्षित उत्पन्न:**

भांडवली साधने ही टिकाउ असतात. जितका काळ ही साधने टिकतात तेवढ्या काळात या साधनाच्या सहाय्याने उत्पादन करता येते. या उत्पादनाची विक्री करुन उत्पन्न मिळवता येते. संयोजक जेव्हा जेव्हा नवीन भांडवली साधनाची निर्मिती अथवा खरेदी करतो. तेव्हा त्या साधनाच्या सहाय्याने किती निव्वळ उत्पन्न मिळते याचा विचार करतो. स्थूल उत्पन्नातून देखभालीचा खर्च व झीज खर्च वजा जाता उरलेले उत्पन्न म्हणजे निव्वळ उत्पन्न होय. अर्थात प्रत्येक वर्षाचे निव्वळ उत्पन्न सारखे नसते कारण अर्थव्यवस्थेत सतत बदल होत असतात. ह्या सर्व वर्षातील निव्वळ उत्पन्नांची बेरीज केली जाते. त्यालाच भांडवली साधनांचे अपेक्षित उत्पन्न म्हणता येईल.

**२) भांडवलाची पुरवठा किंमत:**

नवीन यंत्र खरेदी करताना संयोजकाला केवळ उत्पन्नाचा विचार करुन चालत नाही. तर त्याचबरोबर त्या यंत्राची पुरवठा किंमत विचारात घ्यावी लागते. नवीन भांडवली साधनाची निर्मिती अथवा खरेदी करण्यासाठी संयोजकाला जो खर्च येतो त्याला भांडवलाची पूरवठा किंमत असे म्हणतात.

उदा. समजा एका कारखानदारास नवीन यंत्र खरेदी करावयाचे आहे त्या यंत्राची बाजारातील किंमत १,००,००० रुपये आहे. समजा त्या यंत्राचे आयुष्य १० वर्षाचे आहे. या काळात त्या यंत्राचा वापर केला असता घसारा व इतर खर्च वजा केल्यानंतर निव्वळ उत्पन्न १०,००० रुपये मिळेल. अशी अपेक्षा धरल्यास भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेवर सूत्रानुसार याचे गुणोत्तर पुढीलप्रमाणे येईल.

$$\text{भांडवलाची सीमांत कार्यक्षमता}\,(E) = \frac{\text{भांडवलापासूनचे अपेक्षित उत्पन्न}\,(Q)}{\text{भांडवलाची पुरवठा किंमत}\,(P)} \times १००$$

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ही पूर्ण टक्क्यात काढण्यासाठी १०० ने गुणले जाते.

$$\text{भांडवलाची सीमांत कार्यक्षमता} = \frac{१०,०००}{१,००,०००} \times १००$$

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता = १०%

भांडवली साधनाची पुरवठा किंमत त्याच्या संभाव्य उत्पन्नापेक्षा अधिक असेल तर संयोजक अशा प्रकारची गुंतवणूक करणार नाही निव्वळ संभाव्य उत्पन्न हे पुरवठा किंमतीपेक्षा जास्त असेल तर नवीन गुंतवणूकीचा निर्णय घेतला जाईल. केन्सच्या मते भांडवलाची सीमांत कार्यक्षमता म्हणजे वटावाचा दर की ज्या दराने भांडवली साधनाच्या अपेक्षित प्राप्तीचे वर्तमान मूल्य त्या भांडवली साधनाच्या पुरवठा किंमतीशी समान होते.

### ४.४.१ भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर परिणाम करणारे घटक (Factor Influencing MEC):

भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर अनेक अल्पकालीन व दीर्घकालीन घटकांचा परिणाम होतो.

**अ) अल्पकालीन घटक (Short run Factors):**

**१) उपभोग प्रवृत्ती:**

उपभोगात होणाऱ्या बदलांचा भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर परिणाम होतो. जर अल्पकाळात उपभोग प्रवृत्तीत वाढ झाल्यास भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढेल कारण उपभोग प्रवृत्तीतील वाढीमुळे वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ होऊन अपेक्षित लाभाचे प्रमाण वाढेल याउलट उपभोग प्रवृत्तीत घट झाल्यास अपेक्षित लाभाचे प्रमाण घटून भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी होईल.

**२) अपेक्षित मागणी:**

संयोजकाने उत्पादन केलेल्या वस्तू आणि सेवांना भविष्यकाळात भरपूर मागणी येईल. अशी अपेक्षा असेल तर सीमांत लाभक्षमता जास्त असते. त्यामुळे गुंतवणूक वाढते. याउलट भविष्यात उत्पादीत वस्तू व सेवांची मागणी कमी होईल अशी अपेक्षा असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता घटत जाऊन गुंतवणूक कमी होईल.

**३) करविषयक धोरण:**

सरकारच्या करविषयक धोरणाचा परिणाम भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर होत असतो. सरकार नवीन कर आकारणी करणार असेल जून्या कर दरात वाढ करणार असेल तर संयोजकाला लाभ मिळण्याची शक्यता कमी होते त्यामुळे भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी राहते. याउलट सरकार कर माफी किंवा कर सवलतीच्या धोरणाचा अवलंब करणार असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढून गुंतवणूकीत वाढ होते.

**४) वेतनदर व व्याजदर:**

देशातील कामगाराचे वेतनदर आणि व्याजदर अधिक असतील तर उत्पादन खर्चात वाढ होऊन भांडवलाची सीमांत लाभक्षमता घटते. याउलट वेतनदर व व्याजदर कमी असतील तर उत्पादन खर्च कमी होऊन भांडवलाची सीमांत लाभक्षमता जास्त राहते.



munotes.in

**५) उत्पन्नातील चढउतार:**

जर उत्पन्नात वाढ झाली तर गुंतवणूक क्षमता वाढते. यामुळे भांडवलाची कार्यक्षमता वाढेल या उलट जर उत्पन्नात घट झाली तर व्यक्तीची गुंतवणूक क्षमता कमी होऊन भांडवलाची सीमांत क्षमता कमी होते.

**६) आशावादी व्यावसायिक स्थिती:**

अर्थव्यवस्थेतील आर्थिक वातावरण आशावादी असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहील याउलट वातावरण निराशावादी असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी राहते.

**७) भविष्यकालीन मागणीचा अंदाज:**

आपल्या वस्तूंना भविष्यात भरपूर मागणी येईल असा जर उत्पादकाचा अंदाज असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहील. जर भविष्यात येणारी मागणी कमी असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी राहील.

**८) किमती व उत्पादन खर्च:**

भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर भावी काळातील किंमती व उत्पादन खर्च या बाबतीतील अपेक्षित प्रवृत्तीचाही परिणाम होतो. त्यावेळी वस्तूंच्या किंमती वाढण्याची व उत्पादन खर्च कमी होण्याची शक्यता असते. त्यावेळी भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहते. याउलट किंमती कमी होण्याची व उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता असल्यास भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी राहील.

**ब) दीर्घकालीन घटक (Longrun Factors):**

**१) उत्पादन तंत्रात सुधारणा:**

उत्पादन तंत्रातील सुधारणांचाही भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर परिणाम होतो. उत्पादन तंत्रात सुधारणा झाल्यास कमी खर्चात उत्पादन करणे शक्य होते व नफ्याचे प्रमाण वाढते या परिस्थितीत भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहते.

**२) लोकसंख्या वृद्धी:**

लोकसंख्येत होणाऱ्या वाढीचा व घटीचा परिणाम भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर होतो. जर लोकसंख्या वेगाने वाढत असेल तर वस्तु व सेवांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते उत्पादन मोठ्या प्रमाणावर केले जाते भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहून गुंतवणूकीत वाढ होते. याउलट जर लोकसंख्येत घट होत असेल तर मागणीत घट झाल्याने अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांचे उत्पादन कमी राहून भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी राहते.

**३) संशोधन व विकास:**

देशातील विविध क्षेत्रात संशोधनकार्य जोरात सुरु असेल तर तंत्रज्ञान व तांत्रिक बदल मोठ्या प्रमाणावर घडून येतील त्यामूळे नवीन शोध सतत सुरु राहतील गुंतवणूकीत वाढ होईल त्यामुळे भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढेल.

munotes.in

**४) उपलब्ध भांडवली साधनसंपत्तीचा वापर:**

उपलब्ध असणाऱ्या भांडवली साधनाचा किती प्रमाणात वापर केला जात आहे यावर ही भांडवलाची सीमांत कार्यक्षमता अवलंबून असते.

**५) देशातील वर्तमान स्थिती:**

देशातील वर्तमान स्थिती स्थिर शांततेची सूरक्षिततेचे वातावरण असले तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढते. याउलट राजकीय अस्थिरता नैसर्गिक आपत्ती अंतर्गत अशांतता यामूळे येणारी अस्थिरता जर अधिक असेल तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी असते.

**६) मागासलेल्या प्रदेशाचा विकास:**

मागासलेल्या प्रदेशाच्या विकासासाठी खाजगी भांडवलदार किंवा सरकार यांच्याकडून प्रयत्न होतो तेव्हा त्या प्रदेशात नवीन नवीन संधी उपलब्ध होतात. उद्योगधंदे शेती वाहतूक व दळणवळण पाणीपूरवठा अशा अनेक क्षेत्रात गुंतवणूकीची संधी निर्माण होऊन भांडवलाची सीमांत कार्यक्षमता जास्त राहते.

**७) व्याजदर:**

व्याजाचे दर कमी असतात तेव्हा गुंतवणूकीला प्रेरणा मिळून भांडवलाची सीमांत कार्यक्षमता वाढते याउलट व्याजदर जास्त असतील तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता कमी होते.

**८) तेजी-मंदी:**

जेव्हा देशात तेजीची स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. तेव्हा किंमती वाढत असल्याने सर्वत्र उत्साहवर्धक वातावरण असते. नवीन गुंतवणूक करण्यास सर्व उत्सूक असतात. अशा स्थितीत भांडवलाची सीमांत लाभक्षमता जास्त असते.

**४.४.२ भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेवरील टीका:**

१) केन्सने पूर्ण स्पर्धेची परिस्थिती गृहीत धरली आहे. अपूर्ण स्पर्धा अथवा इतर प्रकारच्या बाजारपेठेचा विचार केलेला नाही.

२) भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ही संकल्पना अनेक अर्थाने वापरली असल्याने तिच्यावरुन निश्चित ज्ञान होत नाही.

३) भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेप्रमाणे व्याजाचा दरही अपेक्षेवर अवलंबून असतो. हे केन्सने लक्षात घेतलेले नाही. भांडवलाची सीमांत कार्यक्षमता ही संकल्पना गतिशील आहे तर व्याजाचा दर ही कल्पना स्थिर आहे. त्यामूळे केन्सच्या भांडवलाची सीमांत कार्यक्षमतेबाबतचा विचार तर्कसंगत नाही. काही टीकाकारांच्या मते केन्सची भांडवलाची सीमांत लाभक्षमता ही संकल्पना अस्पष्ट व संदिग्ध असून त्याचे सहजासहजी आकलन होत नाही.

munotes.in

## ४.५ गुणक संकल्पना (CONCEPT OF MULTIPLIER)

आर्थिक विश्लेषणाचे एक साधन तसेच आर्थिक धोरणाचा मार्गदर्शक म्हणून गुणकाला फार महत्वाचे स्थान आहे. गुणकाची संकल्पना अर्थशास्त्रात सर्वप्रथम आर. एफ. कान्ह यांनी सन १९३१ मध्ये Economic Journal या मासिकात आपल्या 'The Relation of Home Investment to Unemployment' या लेखाद्वारे मांडली. कान्ह यांनी मांडलेल्या गुणकाची संकल्पना 'रोजगार गुणक' या अनुषंगाने वापरली ही संकल्पना केन्स यांनी 'गुंतवणूक गुणक' या नावाने विकसित केली.

**गुणकाची व्याख्या :-**

"सुरुवातीस केलेल्या गुंतवणूकीमूळे अर्थव्यवस्थेच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीच्या प्रमाणास गुणक असे म्हणतात."

"अर्थव्यवस्थेत सुरुवातीस केलेल्या गुंतवणूकीमुळे एकूण रोजगारात होणाऱ्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष वाढीस 'गुणक' असे म्हणतात."

म्हणजेच गुंतवणूकीतील वाढ व राष्ट्रीय उत्पन्नतील वाढ यांच्यातील संख्यात्मक संबंध गुणकाद्वारे स्पष्ट होतो. केन्स यांनी गुणकाची संकल्पना सुत्ररुपाने पुढील प्रमाणे मांडली आहे.

$$K = \frac{\Delta Y}{\Delta I}$$

वरील सुत्रात ;
K = गुणक
$\Delta Y$ = उत्पन्नातील बदल.
$\Delta I$ = गुंतवणूकीतील बदल.

**गुणक सिध्दांताची गृहीते :-**

१) अर्थव्यवस्था बंदिस्त स्वरुपाची आहे.
२) सीमांत उपभोग प्रवृत्ती (MPC) स्थिर आहे.
३) अपूर्ण रोजगार परिस्थिती.
४) गुंतवणूक स्वायत्त असते.
५) गुणक कार्यन्वित असतांना मौद्रीक आणि राजकोषिय धोरण स्थिर असते.
६) उत्पादनवाढीचा उपभोग खर्चावर त्वरीत परिणाम होतो.

**गुणकाचे स्पष्टीकरण :-**

लॉर्ड केन्स यांच्या मते गुणकाची संकल्पना ही सीमांत उपभोग प्रवृत्तीवर आधारीत असतो. राष्ट्रीय उत्पन्नातील बदलांचे उपभोगातील बदलाशी असलेले प्रमाण म्हणजेच सीमांत उपभोग प्रवृत्ती होय. व्यक्तीच्या उत्पन्ना पैकी सर्व भाग हा उपभोगावर खर्च केला जात नाही. म्हणजेच व्यक्तीचा उत्पन्नातील बदलापेक्षा उपभोगात होणारा बदल कमी असतो. म्हणजेच व्यक्तीचे उत्पन्न १०० रु. नी वाढले तर उपभोगात होणारी वाढ ही ५० रु. ने केली जाते. समजा

munotes.in

वरील उदा. प्रमाणे समाजाची उपभोग प्रवृत्ती (१/२) इतकी आहे तर या परिस्थितीत देशाची गुंतवणूक वाढ व उत्पन्नातील वाढीचा सहसंबंध गुणक प्रक्रियेद्वारे पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.


**गुणकाची प्रक्रिया**

| गुणक कालावधी | प्रारंभीची गुंतवणूक | सीमांत उपभोग प्रवृत्ती - (१/२) | एकूण उत्पन्नातील वाढ |
|---|---|---|---|
| ० | १०० कोटी रु. | - | १०० कोटी रु. |
| १ | १०० कोटी रु. | ५० कोटी रु. | ५० कोटी रु. |
| २ | ५० कोटी रु. | २५ कोटी रु. | २५ कोटी रु. |
| ३ | २५ कोटी रु. | १२.५ कोटी रु. | १२.५ कोटी रु. |
| ४ | १२.५ कोटी रु. | ६.२५ कोटी रु. | ६.२५ कोटी रु. |
| ५ | ६.२५ कोटी रु. | ३.१२५ कोटी रु. | ३.१२५ कोटी रु. |
| - | - | १०० कोटी रु. | २०० कोटी रु. |

वरील तक्त्यामध्ये गुणक कसा कार्य करतो हे स्पष्ट करण्यासाठी काल्पनिक तक्त्याचा आधार घेतला आहे. समजा अर्थव्यवस्थेत प्रारंभिच्या गुंतवणूकीच्या स्वरुपात १०० कोटी रु. इतकी गुंतवणूक केलेली असेल तर त्यामुळे उत्पन्न १०० कोटी रु. इतका वाढेल. जर सीमांत उपभोग प्रवृत्ती १/२ इतकी असेल तर पहिल्या कालावधीत १०० कोटी रु. च्या १/२ म्हणजेच सीमांत उपभोग प्रवृत्ती ५० कोटी रु. राहील. त्यामुळे उत्पन्नातील वाढ ५० कोटी रु. वाढेल. ५० कोटी रु. उत्पन्नाच्या १/२ सीमांत उपभोग प्रवृत्ती म्हणजे २५ कोटी रु. अशा पध्दतीने ५ व्या कालखंडापर्यंत ६.२५ कोटी रुपयांनी वाढ होते तर उपभोग प्रवृत्ती ३.१२५ कोटी व उत्पन्न पातळी ३.१२५ कोटीने वाढेल.

अशा प्रकारे गुणकाची प्रक्रीया प्रारंभिच्या अवस्थेत १०० कोटी रु. गुंतवणूकीमूळे अंतिम कालावधी पर्यंत उत्पन्नात २०० कोटी वाढ होईल. तर सीमांत उपभोग प्रवृत्ती १०० कोटी इतकी राहील. म्हणजेच गुणकाचे मूल्य दुप्पट राहील.

गुणकाची प्रवृत्ती पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती क्रमांक २.३**

वरील आकृतीमध्ये OX अक्षावर राष्ट्रीय उत्पन्न (Y) व OY अक्षावर गुंतवणूक (I) आणि उपभोग (C) यातील वाढ दर्शविलेली आहे.

ON ही बचत रेषा असून ती उत्पन्न आणि उपभोगातील समानता दर्शविते. C + I हा एकूण उपभोग वक्र असून ती ON या वक्राास E या बिंदूत छेदतो. या बिंदूला एकूण राष्ट्रीय उत्पन्न पातळी OY अशी निश्चित होते.

समजा अर्थव्यवस्थेतील गुंतवणूकीत वाढ होणार असेल तर C + I हा वक्र वरच्या दीशेने $C + I_1$ असा स्थलांतरीन घेईल. त्यामुळे गुंतवणकीत होणारी वाढ $(\Delta I)AE$ अशी दर्शविण्यात आलेली आहे. ON हा बचत वक्र व नवीन उपभोग वक्र $C + I_1$ परस्परांना $E_1$ बिंदूत छेदत असल्याने नवीन उत्पन्न पातळी वाढून $OY_1$ अशी राहील $(\Delta Y)$.

वरील आकृतीवरुन असे स्पष्ट होते की प्रारंभिच्या गुंतवणकीतील वाढीपेक्षा $(\Delta I)$ उत्पन्नात होणारी वाढ $(\Delta Y)$ दुप्पट आहे. कारण AH पेक्षा $YY_1$ हे अंतर दुप्पट आहे.

## ४.६ सारांश (SUMMARY)

गुणक संकल्पना अर्थशास्त्रात अत्यंत महत्वाची मानली जाते. गुणकाचे महत्व पुढील मुद्दयांद्वारे स्पष्ट होईल.

१) देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी सरकारी गुंतवणूकीत वाढ घडवून आणणे आवश्यक ठरते.

२) देशातील बेरोजगारी, मंदी, अल्प उत्पन्न यासारख्या समस्या सोडविण्यासाठी गुणकाचा वापर प्रभावीपणे करणे आवश्यक ठरते.

३) देशातील सरकारला गुंतवणूक धोरण आखण्यासाठी गुंणक संकल्पना उपयोगी ठरते.

४) देशात रोजगार निर्मीतीसाठी गुणक संकल्पनेचा प्रभावीपणे वापर करता येईल.

५) केन्स यांच्या रोजगाराच्या व उत्पन्नाच्या सिध्दांता मध्ये अर्थव्यवस्थेतील परीणामकारक मागणीला अनन्य साधरण महत्व देण्यात आलेले आहे. प्रभावी मागणीतील वाढीमूळे अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीचे प्रमाण कमी होऊन रोजगार, उत्पादन, उत्पन्न, बचत, गुंतवणूकीत वाढ घडून येते. अर्थव्यवस्थेतील प्रभावी मागणीत वाढ घडवून आणायची असेल तर गुणक ही संकल्पना उपयोगी ठरते.

६) गुंतवणूकीतील बदलाचा एकूण उत्पन्नावर होणारा परिणाम गुणकद्वारे मोजता येतो.

## ४.७ प्रश्न

१) गुंतवणूक म्हणजे काय ? हे सांगून गुंतवणूकीच्या विविध प्रकारांची चर्चा करा.

२) भांडवलाची सीमांत लाभक्षमता म्हणजे काय ? भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

३) गुणकाची व्याख्या देवून गुणकाची संकल्पना तक्ता व आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करा.

❖❖❖❖

मॉड्युल - III

# ५

# पैशाचा पुरवठा

**घटक रचना :**


५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ पैशाचा पुरवठा

५.३ पैशाचा पुरवठा निर्धारीत करणारे घटक

५.४ पैशाचा भ्रमणवेग / प्रवेग

५.५ भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पैशाचा पुरवठा मोजण्याच्या पद्धती

५.६ पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम करणारे घटक

५.७ सारांश

५.८ प्रश्न


## ५.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- पैसा ह्या संकल्पनेचा अर्थ व त्याची काही कार्ये अभ्यासणे
- पैशाचा पुरवठा, पुरवठ्याचे परंपरागत दृष्टीकोन व आधुनिक दृष्टीकोनाचे घटक अभ्यासणे.
- पैशाचा पुरवठा निर्धारित करणाऱ्या घटकांवर प्रकाश टाकणे.
- पैशाचा प्रवेग व त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या घटकांची चर्चा करणे.
- पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचे विवेचन करणे.

## ५.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

'' पैशाचा शोध हा मानवी संस्कृतीच्या विकासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण शोध होय.'' मानवी जीवनात पैशाला अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे. मानवाला आपल्या सर्व गरजा भागविण्यासाठी पैशाची आवश्यकता असते. प्रा. क्रौथर या अर्थशास्त्रज्ञाच्या मते '' ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत एक महत्त्वाचा शोध असतो. उदा. विज्ञानामध्ये अग्नी, राज्य शास्त्रात मत, यंत्रशास्त्रात चाक अगदी त्याच प्रमाणे अर्थशास्त्रात पैसा हा एक महत्त्वपूर्ण शोध होय आणि या शोधावरच अर्थशास्त्राचा विकास अवलंबून आहे.'' मानवाने लावलेल्या या पैशाच्या शोधामुळे ज्ञानाची अनेक दालने खुली होऊन मानवाने आपली प्रगती साध्य केली आहे. मानवाला बहुतेक सर्व प्रकारची सुखे पैशाच्या सहाय्याने उपभोगायला मिळतात. आज प्रत्येक समाजाला देशाला

आणि मानवाला आपला विकास करण्यासाठी पैशाची आवश्यकता असते. म्हणून पैशाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. मानवाला सर्व प्रकारच्या वस्तू व सेवा पैशाच्या साहाय्याने प्राप्त करता येतात. त्याच्या गरजा अमर्यादित असतात. सकाळी उठल्यापासुन संध्याकाळी झोपेपर्यंत पैशाची गरज असते. तो सर्व प्रकारच्या गरजा पैशाच्या सहाय्याने पूर्ण करु शकतो. ज्याच्याकडे पैसा जास्त तो श्रीमंत व ज्याच्याकडे पैसा नाही तो गरीब समजला जातो. श्रीमंत व्यक्ती पैशाच्या साहाय्याने जास्तीत जास्त सुखे उपभोगतो व जीवनात आनंद मिळवितो. या उलट गरीबांकडे पैशाची टंचाई असल्यामुळे तो सर्व प्रकारच्या सुखांपासून परावृत्त होतो. पैशामुळे गाडी, बंगला, मान, किर्ती मिळविता येते. आज सर्वच क्षेत्रात पैशाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

## ५.२ पैशाचा पुरवठा (SUPPLY OF MONEY)

मानवाने लावलेल्या अनेक शोधांमध्ये पैशाचा शोध हा एक मूलभूत व महत्त्वपूर्ण होय. कारण आधुनिक अर्थव्यवस्थेत मानवाचे जवळजवळ सर्व आर्थिक व्यवहार पैशाकडूनच पूर्ण केले जातात. म्हणून मानवाला पैशाची अत्यंत आवश्यकता असते. बहुतेक सर्व वस्तु व सेवांचे मूल्य पैशात मोजले जाते. म्हणून पैशाची मागणी व पैशाचापूरवठा आणि इतर वस्तुची मागणी व पुरवठा यामध्ये फरक करावा लागतो.

सध्या भारतात पैशाच्या पुरवठ्यावर मध्यवर्ती बँकेचे नियंत्रण असते. भारतामध्ये नाणी व नोटा अशा दोन प्रकारात चलनाची निर्मिती केली जाते. एक रुपयाची नोट व सर्व प्रकारची नाणी भारत सरकारच्या अर्थखात्याकडून निर्माण केले जातात व २ रुपये व त्यापुढील सर्व नोटा भारतीय रिझर्व्ह बँक निर्माण करते. एक रुपयाचे नाणे हे निकेल या धातूपासून बनविले जाते. मात्र त्याची दर्शनी किंमतही त्या मध्ये समाविष्ट असलेल्या धातुपेक्षा अधिक असते. एक रुपयाची नोट व एक रुपयाचे नाणे यांचे मूल्य समान असतात.

एक रुपया व पन्नास पैशाची नाणी अमर्यादित कायदेशीर चलन तर उर्वरित सर्व नाणी मर्यादित कायदेशीर चलन समजले जाते. म्हणजेच अमर्यादित कायदेशीर चलन कितीही प्रमाणात दिले तरीते स्विकारावे लागते. उलट परिस्थिती मर्यादित कायदेशीर चलनाबाबत असते. विशिष्ट प्रमाणातच स्वीकारले जाते. सध्या भारतात १,२, ५, १०, २०, ५०, १००, ५०० रुपयांच्या नोटा अस्तित्वात असून १०, २०, २५, ५० पैसे एक रुपया, दोन रुपये व पाच व दहा रुपयांचे नाणे अस्तित्वात आहेत. भारतीय चलनपद्धती ही संपूर्णपणे दशमान पद्धती बनली आहे. १९५७ पूर्वी भारतात एक पैसा एक आणा, दोन आणे, चार आणे, आठ आणे अशी दूय्यम प्रकारची नाणी अस्तीत्वात होती. ती या दशमान पद्धतीमुळे समाप्त झाली. भारतात १९९५ पर्यंत सर्व प्रकारच्या नाण्यांची किंमत २०४० कोटी रुपये होती तर सर्व प्रकारच्या नोटांची किंमत १,०२,९०० कोटी रुपये होती.

### ५.२.१ पैशाचा पुरवठा म्हणजे काय?

**अर्थ :**

१. प्रा. स्टोनिअर व प्रा हेग : ''पैशाचा पुरवठा म्हणजे एक प्रकारे पैशाचा साठाच होय.''
२. प्रा. एल.व्ही. चांडलकर : ''विनिमय माध्यम म्हणून किंवा कर्ज फेडण्याचे साधन म्हणून वापरल्या जाणाऱ्या सर्व वस्तुंचा साठा म्हणजे पैशाचा पुरवठा होय.''

३. ''पैशाच्या पुरवठ्यात लोकांजवळील पैसा व बँकामध्यल्या मागणी ठेवींचा समावेश होतो.''

४. ''एका विशिष्ट कालावधीत अर्थव्यवस्थेत परिचलनात असणारे पैशाचे एकूण परिमाण म्हणजे पैशाचा पुरवठा होय.''

५. सामान्यपणे आपणास असे म्हणता येईल की, ''पैशाचा पुरवठा म्हणजे कायदेशीर पैसा अधिक बँक निर्मित पैसा होय.'' वरील प्रमाणे पैशाच्या पुरवठ्याचा अर्थ आपणास सांगता येईल.

## ५.३ पैशाचा पुरवठा निर्धारीत करणारे घटक (DETERMINANTS OF MONEY SUPPLY)

पैशाचा पुरवठा निर्धारीत करणारे काही नियंत्रणात्मक तर काही इतर घटक पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१) उच्चशक्ती पैसा (High Powered Money) :**

कोणत्याही देशातील पैशाचा पुरवठा निर्धारीत करण्यामध्ये उच्चशक्ती पैशाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. कारण उच्चशक्ती पैशामध्ये पतनिर्मितीला चालना देण्याची क्षमता असते. त्यामुळे देशातील पैशाच्या पुरवठ्यात मोठी वाढ घडून येते.

**२) लोकांची रोख रक्कम जवळ बाळगण्याची प्रवृत्ती :**

जर देशातील लोकांची रोखता पसंती अधिक असेल तर बँकाकडे ठेवींच्या स्वरुपात पैसा कमी राहून पतनिर्मिती कमी होऊन पैशाच्या पुरवठ्यात घट होते.

याऊलट जर लोकांनी पैसा रोख स्वरुपात स्वत:जवळ बाळगण्याऐवजी बँकाकडे ठेवींच्या स्वरुपात ठेवल्यास बँकांची पतनिर्मिती क्षमता वाढून पैशाचा पुरवठा वाढतो.

**३) सरकारी अंदाजपत्रक :**

सरकारच्या अंदाजपत्रकाचे प्रामुख्याने शिलकीचे अंदाजपत्रक, तूटीचे आणि संतूलित अंदाजपत्रक असे तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते. ज्यावेळी सरकार शिलकीचे किंवा वाढव्याचे अंदाजपत्रक मांडते तेव्हा सरकार कर आणि करांच्या व्यतीरीक्त इतर मार्गाने जमा केलेला सर्व पैसा खर्च करते त्यामुळे पैशाचा पुरवठा घटतो. याउटल तूटीच्या अंदाजपत्रकामुळे नवीन चलन छपाई आणि विदेशी कर्जामूळे देशातील पैशाच्या पुरवढ्यात वाढ होते.

**४) पैशाचा भ्रमणवेग :**

जेव्हा पैशाचा भ्रमणवेग अधिक असतो, तेव्हा पैशाच्या पुरवठ्यात वाढ होते. याऊलट कमी असेल तर पैशाच्या एकूण पुरवठ्यात घट होते.

**५) राखिव निधीचे प्रमाण :**

मध्यवर्ती बँक देशातील व्यापारी बँकांना रोख राखिव निधी (CRR) व वैधनिक रोखता निधी (SLR) चे प्रमाण ठरवून देतो. CRR व SLR मध्ये वाढ केल्यास बँकांकडील ठेवीपैंकी अधिक रक्कम मध्यवर्ती बँकेजवळ जमा झाल्याने बँकांची कर्जे देण्याची म्हणजेच पतनिर्मितीची क्षमता घटल्याने पैशाच्या पुरवठ्यात घट होते.

याऊलट CRR व SLR च्या प्रमाणातील घट ही पैशाच्या पुरवठ्यात वाढ घडवून आणते.

**६) खुल्या बाजारातील रोख्यांची खरेदी विक्री :-**

देशातील सरकारने देशांतर्गत कर्ज उभारण्यासाठी मध्यवर्ती बँकेद्वारे सार्वजनिक कर्जरोख्यांची विक्री केल्यास जनतेचा पैसा सरकारी कर्जरोख्यांमध्ये गुंतल्याने पैशाचा पुरवठा घटतो.

याऊलट सरकारी कर्जरोख्यांची परतफेड केल्यास व्याज आणि मुद्दल रक्कम परत मिळाल्याने पैशाच्या पुरवठ्यात वाढ होते.

**७) बँकदरातील बदल :**

ज्या दराने मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना कर्जे देतो त्यास बँकदर म्हणतात. समजा मध्यवर्ती बँकेने बँकदरात वाढ केली तर कर्जावरील व्याजदरात वाढ झाल्याने बँकांची पतनिर्मिती घटते व पैशाचा पुरवठा कमी होतो.

याऊलट बँकदर घटल्यास मध्यवर्ती बँकेची कर्जे स्वस्त झाल्याने बँकांची पतनिर्मिती क्षमता वाढून पैशांचा पुरवढा वाढतो.

## ५.४ पैशाचा भ्रमणवेग /प्रवेग (VELOCITY OF CIRCULATION OF MONEY)

Velocity या इंग्रजी शब्दाचा अर्थ वेग किंवा गती आणि Circulation म्हणजे भ्रमण किंवा परिचलन असून Velocity of Circulation म्हणजे भ्रमणवेग किंवा गतिशीलता तर Money म्हणजे पैसा किंवा मुद्रा होय. म्हणून अर्थशास्त्रात Velocity of circulation of Money याला पैशाचा भ्रमणवेग किंवा पैशाचे परिचलन किंवा पैशाची गतीशीलता असा शब्द प्रयोग वापरला जातो. पैशाचा भ्रमणवेग म्हणजे पैशाच्या हस्तांतरणाची सरासरी होय.

**अर्थ :**

१) ''पैशाचा एखादा एकक एका विशिष्ट काळात सामान्यतः विशिष्ट वेळा हस्तांतरीत होतो त्याला पैशाचा भ्रमणवेग किंवा गतिशीलता असे म्हणतात. ''
२) ''पैशाचा भ्रमणवेग म्हणजे पैशाचे एक परिमाण विशिष्ट कालखंडात जितक्या वेळा वापरले जाते ती संख्या होय.''

एक विशिष्ट नाणे किंवा नोट एका दिवसात अनेक लोकांच्या हातातून हस्तांतरीत होत असल्याने पैशाला भ्रमण वेग निर्माण होतो. या भ्रमणवेगामुळे पैशाच्या पुरवठ्यात वाढ होत असते. उदाहरणार्थ समजा १०० रुपयाची एक नोट एका विशिष्ट दिवसात २० वेगवेगळ्या लोकांकडे हस्तांतरीत होत असेल तर त्या नोटेचा भ्रमण वेग हा २० इतका होईल आणि पैशाचा एकूण पुरवठा हा १०० x २० = २००० रुपये एवढा असेल. प्रा. फिशर यांनी पैशाचा पुरवठा बरोबर MV असे सुत्र मांडले आहे



munotes.in

M = Money पैसा V = Velocity of Money पैशाचा भ्रमणवेग
M x V = MV
१०० x २० = २०००

पैशाच्या एकुण परिमाणाला त्याच्या भ्रमण वेगाने गुणले असता आपणास एकूण पैशाचा पुरवठा मिळतो. प्रा. फिशर यांच्या मते पैशाचा भ्रमणवेग अधिक असल्यास पैशाच्या पुरवठ्यात वाढ होते. तर पैशाचा भ्रमणवेग कमी असल्यास पैशाच्या पुरवठ्यात घट होते. पैशाच्या या भ्रमण वेगावर अनेक घटकांचा परिणाम होत असतो ते घटक पुढील प्रमाणे.

**पैशाच्या भ्रमणवेगावर परिणाम करणारे घटक (Factors affecting velocity of circulation of money) :**

प्रा. चांडालकर यांच्यामते पैशाच्या भ्रमण वेगावर पुढील घटकांचा परिणाम होत असतो.

१. उत्पन्न मिळण्यातील काळ
२. उत्पन्नाचे वितरण
३. उत्पन्नाचा नियमितपणा
४. लोकांच्या सवयी
५. बचत गुंतवणूक व उपभोग प्रवृत्ती
६. राजकोषीय धोरण
७. बँका व वित्तीय संस्था
८. रोखतेची अभिलाषा

### १) उत्पन्न मिळण्यातील काळ:

समाजाला उत्पन्न मिळण्याच्या अंतरावर किंवा कालावधी वर पैशाचा भ्रमणवेग अवलंबून असतो. व्यक्तीला उत्पन्न मिळण्याचा कालावधी कमी असेल तर पैशाचा भ्रमणवेग अधिक असेल तर उत्पन्न मिळवण्याचा कालावधी अधिक असल्यास पैशाचा भ्रमणवेग कमी राहील. उदा. काही व्यक्तींना उत्पन्न रोज मिळते. तर ते रोज खर्च करु शकतात.काही व्यक्तींना आठवड्यातून एकदा उत्पन्न मिळेल, तर काहीना १५ दिवसांने, शासकीय नौकरांना महिना समाप्तीनंतर, ठेकेदाराला ठोका संपल्यावर, तर शेतकऱ्यांना शेतमाल विक्री केल्यानंतर उत्पन्न मिळते. उत्पन्न लवकर मिळाल्यास खर्च वाढून पैशाचा भ्रमणवेग वाढतो. तर उत्पन्न उशीरा मिळाल्यास खर्च कमी होऊन भ्रमणवेग कमी होतो.

### २) उत्पन्नाचे वितरण :

राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण कसे होते त्यावर पैशाचा भ्रमण वेग अवलंबून असतो. उत्पन्नाचे वितरण विषम प्रमाणावर होत असल्यास म्हणजे श्रीमंताना अधिक उत्पन्न मिळत असल्यास त्यांची उपभोग प्रवृत्ती कमी व बचत प्रवृत्ती जास्त असते. परिणामी भ्रमणवेग कमी असतो तर उत्पन्नाचे वाटप समान होत असल्यास गरीबांना अधिक पैसा प्राप्त होतो ते अनेक गरजा भागविण्यासाठी ताबडतोब खर्च करतात परिणामी पैशाचा भ्रमणवेग वाढतो.

munotes.in

### ३) उत्पन्नाचा नियमितपणा:

ज्या लोकांना उत्पन्न नियमित प्राप्त होते त्यांचा खर्च जास्त असतो. त्यामुळे पैशाचा भ्रमणवेग वाढतो या उलट अनियमित उत्पन्न मिळणाऱ्या वर्गांचा दररोजचा खर्च निश्चित नसतो. पैशाची बचत करतात परिणामी पैशाचा भ्रमणवेग कमी होतो.

### ४) लोकांच्या सवयी:

लोकांच्या पैसा खर्च करण्याच्या व बचत करण्याच्या सवयीवर देखील पैशाचा भ्रमणवेग अवलंबून असतो. लोक जास्तीजास्त खर्च करीत असतील तर पैसा परिचलनात येतो. त्याचा भ्रमणवेग वाढतो. याउलट लोक खर्च कमी करुन बचत जास्त करत असतील तर पैसा परिचलनात कमी येतो. परिणामी पैशाचा भ्रमण वेग कमी होतो.

### ५) बचत, गुंतवणूक व उपभोग प्रवृत्ती:

पैशाचा भ्रमणवेग वरील तीनही घटकावर अवलंबून असतो. लोकाच्या बचत करण्याच्या सवयी अधिक असल्यास पैशाचा भ्रमणवेग कमी होतो तर बचत करण्याची सवय कमी व खर्च करण्याची सवय अधिक असल्यास भ्रमणवेग वाढतो. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेत गुंतवणुक वाढल्यास लोकांचे उत्पन्न वाढते. त्याचा खर्च वाढतो व पैशांचा भ्रमणवेग वाढतो. याउलट गुंतवणुककमी असल्यास उत्पन्न कमी प्राप्त होते व खर्च कमी होऊन भ्रमणवेग कमी होतो. शिवाय लोकांची उपभोग प्रवृत्ती अधिक असल्यास त्यांचा खर्च वाढून पैशाचा भ्रमणवेग वाढतो तर लोकांची उपभोग प्रवृत्ती कमी असल्यास त्यांचा खर्च घटून पैशांचा भ्रमणवेग कमी होतो.

### ६) लोकसंख्या:

देशातील लोकसंख्या सातत्याने वाढत असेल तर शासनाचा व समाजाचा खर्च देखील सातत्याने वाढत असतो. त्यामुळे पैशाचा भ्रमणवेग वाढतो. याउलट लोकसंख्या घटत असल्यास शासनाचा खर्च देखील धरतो व भ्रमणवेग कमी होतो.

### ७) राजकोषीय धोरण:

देशात राजकोषीय धोरणाची अमंलबजावणी शासनाकडून केली जाते. यामध्ये प्रामुख्याने कर, कर्ज खर्च व तुटीच्या अर्थभरण्याचा समावेश होतो. शासनाने सामाजिक, कल्याण व आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणवर खर्च वाढविल्यास, देशातील नागरीकांचे उत्पन्न वाढते. परिणामी त्याचा खर्च वाढून पैशाचा भ्रमणवेग वाढतो या उलट शासनाने खर्च घटविण्याचे धोरण राबविल्यास लोकाच्यां उत्पन्नात घट होऊन खर्च कमी होतो व पैशाचा भ्रमणवेग देखील कमी होतो.

### ८) बँका व वित्तीय संस्थाचा विकास:

देशात बँका व वित्तीय स्तरांचा विकास झाल्यास लोक पैसा व प्रति पैसा (Money and Near Money) या मध्ये अधिक व्यवहार करतात. त्यामुळे पैशाचा भ्रमणवेग वाढतो. या उलट बँका व वित्तीय संस्थांचा विकास झाला नसल्यास रोखीच्या व्यवहारावर अनेक मर्यादा पडतात. त्यामुळे पैशाच्या भ्रमण वेग कमी होतो.

### ९) रोखतेची अभिलाषा:

रोखतेची अभिलाषा म्हणजे पैसा जवळ बाळगण्याची इच्छा किंवा रोख पसंती होय. लोकांची पैसा खर्च न करता तो जवळ रोख स्वरुपात बाळगण्याची इच्छा अधिक असल्यास

पैशाचा भ्रमणवेग कमी असेल तर या उलट रोखतेची अभिलाषा कमी असल्यास पैशाचा भ्रमणवेग अधीक असतो.

### १०) पैशाचा पुरवठा:

अर्थव्यवस्थेत लोकांच्या गरजेच्या मानाने पैशाचा पुरवठा कमी असल्यास तेवढ्याच पैशाच्या साहाय्याने लोकांना आपल्या अनेक गरजा पूर्ण कराव्या लागतात. त्यामुळे तोच पैसा पुन्हा व्यवहारात येऊन पैशाचा भ्रमणवेग वाढतो. या उलट पैशाचा पुरवठा अधिक असल्यास पैशाचा भ्रमणवेग कमी होतो.

### ११) तेजी मंदीचे चक्र:

देशात तेजीच्या काळात एकूण उलाढालीचे प्रमाण प्रचंड प्रमाणावर वाढलेले असते. तेजीच्या काळात लोकांची खर्च करण्याची प्रवृत्ती वाढते त्यामुळे पैशाचा भ्रमण वेग वाढतो. तर याउलट मंदीच्या काळात एकूण अर्थव्यवस्थेत मरगळ आलेली असते. लोकांची खर्च करण्याची प्रवृत्ती घटते. त्यामुळे पैशाचा भ्रमणवेग देखील कमी असतो.

### १२) आर्थिक विकास:

देशाचा अर्थिक विकास जलदगतीने होत असल्यास एकूणच अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राचा विकास झालेला असतो. त्यामुळे गुंतवणूकीत मोठ्या प्रमाणावर वाढ होत असते. परिणामी पैशाचा भ्रमणवेग वाटतो. या उलट अविकसित देशात गुंतवणूक प्रमाणात वाढ झालेली नसते. परिणामी पैशाचा भ्रमणवेग कमी असतो. या शिवाय देशातील लोकांच्या रोखीने व्यवहार करण्याच्या सवयी, बँकेचे पतनिर्मिती बाबतीचे धोरण, रोख व उधारीचे व्यवहार इत्यादी घटकांचा पैशाच्या भ्रमणवेगावर परिणाम होत असतो.

## ५.५ भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पैशाचा पुरवठा मोजण्याच्या पद्धती (RBI'S APPROACH TO MEASUREMENT OF MONEY SUPPLY)

भारतीय रिझर्व्ह बँक १९७७ पूर्वी फक्त ३१ या पैशाच्या पुरवठ्याच्या संकल्पनेचा वापर करत होती. त्यानंतर १९७७ च्या रॅडक्लिफ समितीच्या शिफारसीनुसार M1, M2, M3, M4 या चार पैशाच्या पुरवठ्याच्या संकल्पना वापरात आल्या. यानंतर रिझर्व्ह बँकेने १९९७ मध्ये वाय.व्ही.रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्य गट स्थापन केला. या कार्यगटाने आपला अहवाल जुन १९९८ मध्ये रिझर्व्ह बँकेला सोपवून त्यामध्ये M4 ही संकल्पना रद्द करण्यात आली. व फक्त M1,M2,M3 या तीन संकल्पनाचा वापर करावा असे सुचविले. त्याशिवाय या कार्यगटाने नवीन रोखता मापन (Liquidity Measures) पद्धतीच्या संकल्पना सुचविल्या आहेत.

त्यानुसार आपण जुन्या संकल्पना, नवीन संकल्पना आणि रोखता मापन पद्धती पुढील कोष्टकाने स्पष्ट करु.

munotes.in

**कोष्टक क्र. ६.२**

**भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पैशाचा पुरवठा मापनाच्या संकल्पना**

| (Old Concept) **जुनी मापन पद्धती** | (Revised Concept) **नवीन मापन पद्धती** | (Liquidity Measures) **रोखता मापन पद्धती** |
|---|---|---|
| M1 = लोकांजवळीत नाणी व चलनी नोटा + लोकांच्या बँकामधील मागणी ठेवी + रिझर्व्ह बँकेमधील इतर ठेवी. | M1 = लोकांजवळीत नाणी व चलनी नोटा + लोकांच्या बँकामधील मागणी ठेवी + रिझर्व्ह बँकेमधील इतर ठेवी. (थोडक्यात या संकल्पनेत बदल करण्यात आलेला नाही.) | L1 = नवीन M3 + पोस्ट ऑफिस बचत बँकेतील सर्व ठेवी (राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र वगळता NSC) |
| M 2 = M1 + पोस्ट ऑफिस बचत बँकेतील बचत ठेवी. | M 2 = M1 + बँकाकडे असलेल्या बचत ठेवी पैकी मुदत ठेवी + बँकांनी दिलेल्या ठेव पावत्या + एका वर्षातील मुदत ठेवी. | L2 = L1 + वित्तीय संस्थाकडील मुदत ठेवी + वित्तीय संस्थाकडील मुदत कर्ज + वित्तीय संस्थांनी दिलेल्या ठेव पावत्या |
| M3 = M1 + सर्व व्यापारी व सहकारी बँकामधील मुदत ठेवी. | M3 = M2 + एका वर्षापेक्षा अधिक काळाच्या मुदत ठेवी + बँकेचे अल्प व दीर्घ मुदतीचे कर्ज | L3 = L2 + बँकेतर वित्तीय संस्था कडील लोकांच्या ठेवी (L2 + public deposits with NBFCs ) |
| M4 = M3 + पोस्ट ऑफिस मधील सर्व प्रकारच्या ठेवी. | M4 = ही संकल्पना वगळण्यात आलेली आहे. | L = L1 + L2 + L 3<br>L = एकत्रित रोखता<br>(L = Aggregate Liquidity) |

## ५.६ पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम करणारे घटक (FACTORS AFFECTING THE SUPPLY OF MONEY)

अर्थव्यवस्थेत पैशाच्या पुरवठ्यावर अनेक घटकांचा परिणाम होत असतो ते घटक पुढील प्रमाणे.

### १. तुटीचा अर्थभरणा:

सरकारला जेव्हा आपल्या उत्पन्नापेक्षा खर्च जास्त करावा लागतो किंवा उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असतो तेव्हा खर्च भरुन काढण्यासाठी सरकारला तुटीचा अर्थभरणा निर्माण करावा लागतो. साधारणतः भारतात तुटीचा अर्थभरणा निर्माण करणे म्हणजे नवीन चलन निर्माण करणे होय. व त्यामुळेच पैशाचा पुरवठा वाढून अर्थव्यवस्थेत भाववाढ होते.

**२. लोकांच्या सवयी:**

अर्थव्यवस्थेतील लोकांच्या सवयी वरही पैशाचा पुरवठा अवलंबून असतो. लोकांनी मोठ्या प्रमाणावर पैसा बँकेत ठेवला तर त्या ठेवीवर व्यापारी बँका पतनिर्मिती करुन पैशाच्या पुरवठ्यात वाढ करतात या उलट लोकांनी सर्व रोख रक्कम जवळ बाळगल्यास व्यापारी बँकांना पतपैसा निर्मिती वर मर्यादा येऊन पैशाच्या पुरवठ्यात घट होते.

**३. व्यापारी बँकाची पतनिर्मिती:**

अर्थव्यवस्थेतील उत्पादक व उद्योजकांना आपल्या व्यवसायाची वाढ करण्यासाठी व अर्थव्यवस्थेतील सर्वच लोकांना आपल्या आर्थिक विकासासाठी भांडवलाची आवश्यकता असते. त्यासाठी ते बँकेकडून कर्जाची मागणी करतात आणि व्यापारी बँका मोठ्या प्रमाणावर पतनिर्मिती करुन या लोकांची पैशाची गरज भागवितात. त्यामुळे एकूण पैशाच्या पुरवठ्यात वाढ होते. या उलट लोकांकडुन भांडवल गुंतवणीकासाठी पैशाची मागणी होत नसेल तर पत निर्मिती कमी होऊन पैशाचा पुरवठा घटतो.

**४. पैशाचा भ्रमण वेग:**

पैशाचा भ्रमणवेग म्हणजे पैसा एका वर्षाच्या कालावधीत कितीवेळा हस्तातंरीत होतो. एकविशिष्ट काळात पैशाचा पुरवठा किती आहे हे समजण्यासाठी पैशाचा भ्रमण वेग लक्षात घेतला पाहिजे. पैशाच्या एकुण पुरवठ्याला पैशाच्या भ्रमण वेगाने गुणले असता आपणास पैशाचा पुरवठा मिळतो.उदा. एखाद्या अर्थव्यवस्थेत एका विशिष्ट काळात १००० कोटी रु. एवढे चलन आहे आणि रुपयाचा भ्रमण वेग १० इतका आहे. तर पैशाचा एकूण पुरवठा १००० कोटी रु. x १० = १०,००० को. रुपये इतका होईल. पैशाचा भ्रमणवेग जास्त तेवढा पैशाचा पुरवठा जास्त असतो. असे डॉ. चाँडलर यांनी म्हटले आहे.

**५. परकीय विनिमय निधी :**

हा पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे. जेव्हा देशाला परकीय देण्यापेक्षा येणे अधिक असते तेव्हा देशांतर्गत पैशाचा पुरवठा वाढतो. या उलट जेव्हा येण्यापेक्षा देणे अधिक असते तेव्हा तुट निर्माण होते व देशांतर्गत पैशाचा पुरवठा घटतो. भारतात सातत्याने परकीय विनिमय निधी कमी कमी होत आहे.

**६. रोकड राखीव निधी :**

व्यापारी बँकांना आपल्याकडील जमा झालेल्या ठेवी पैकी विशिष्ट रक्कम राखीव निधी म्हणून स्वतःकडे ठेवावी लागते. त्यामुळे बँकांच्या पतनिर्मितीवर मर्यादा पडते. जर या निधीच्या प्रमाणात रिझर्व्ह बँकेने वाढ केल्यास व्यापारी बँकाची पतनिर्मिती कमी होऊन पैशाच्या पुरवठ्यात घट निर्माण होते. याउलट राखीव निधीचे प्रमाण घटविल्यास पतनिर्मितीचे प्रमाण वाढून पैशाचा पुरवठा वाढतो.

**७. लोकांची कर्जाची मागणी आणि तारण देण्याची क्षमता:**

व्यापारी बँकांची पतनिर्मितीही लोकांच्या कर्ज मागणी आणि तारण क्षमतेवर अवलंबून असते. लोकांकडून मोठ्या प्रमाणावर कर्जाची मागणी वाढल्यास पतपैसा वाढून पैशाच्या पुरवठ्यात वाढ होते व लोकांनी कर्जा साठी मागणी कमी केल्यास पतपैसा घटून पैशाचा पुरवठा घटतो.

**८. मध्यवर्ती बँक:**

भारतात भारतीय रिझर्व्ह बँक ही मध्यवर्ती बँकेचे कार्य करते. २ रुपये व त्यापुढील सर्व नोटा छापण्याची मक्तेदारी भारतीय रिझर्व्ह बँकेची आहे. त्यामुळे ही बँक अर्थव्यवस्थेच्या गरजेनुसार पैशाच्या पुरवठ्यातवाढ किंवा घट करत असते.

वरीलप्रमाणे विविध घटक पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम करत असतात.

## ५.७ सारांश (SUMMARY)

गरजांच्या पूर्ततेसाठी प्रभावी साधन म्हणून पैशाचा वापर हा पूर्वीपासूनच केला जात आहे. आज जगात जवळ जवळ सर्वच कार्यांची पूर्तता ही पैशाच्या अस्तित्वामुळे पूर्णत्वाला जात असते. अर्थव्यवस्थेच्या गरजेनुसार व आवश्यकतेनुसार त्याचा पुरवठा करण्याचे काम हे त्या देशातील मध्यवर्ती बँक व शासनामार्फत केला जात असतो.

पैशाच्या पुरवठ्याच्या परंपरागत दृष्टीकोना पेक्षा आधुनिक दृष्टीकोन हा अधिक व्यापक आहे. त्यामुळे या अंतर्गत येणारे घटक अधिक महत्त्वपूर्ण ठरतात. पैशाचा पुरवठा निर्धारित करणारे घटकच देशाचे एकूण आर्थिक चित्र निश्चित करित असतात तसेच या पैशाचा प्रवेगसुद्धा देशांचे आर्थिक चित्र स्पष्ट करीत असतो. एकूणच पैशाची भुमिका ही आर्थिक जीवनात महत्त्वाची असली तरी पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम करणारे घटक अर्थव्यवस्थेत अनेक बदल घडवून आणतात.

## ५.८ प्रश्न

१. पैशाचा पुरवठा म्हणजे काय ? त्याचे घटक स्पष्ट करा.
२. पैशाचा पुरवठा निर्धारित करणारे घटक कोणते.
३. पैशाचा भ्रमणवेग ही संकल्पना स्पष्ट करुन त्यावर परिणाम करणारे घटक विषद करा.
४. पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या घटकांची चर्चा करा.

❖❖❖❖

# ६

# पैशाची मागणी

**घटक रचना :**

६.० उद्दिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२ पैशाची मागणी
६.३ पैशाच्या मागणीबाबत केन्सचा दृष्टिकोण
६.४ पैशाच्या मागणीबाबत परंपरागत / सनातनवादी दृष्टीकोन
६.५ पैशाच्या मागणीबाबत फ्रिडमन यांचा दृष्टीकोन
६.६ सारांश
६.७ प्रश्न

## ६.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- पैशाच्या मागणीची संकल्पना सविस्तरपणे अभ्यासणे.
- पैशाच्या मागणीचा केन्सचा दृष्टिकोण अभ्यासणे.
- पैशाच्या मागणीच्या सनातनवादी दृष्टिकोणाचे विवेचन करणे.
- पैशाच्या मागणीचा फ्रिडमन यांचा दृष्टिकोन अभ्यासणे.

## ६.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

पैशाच्या मागणीचे विवेचन अनेक अर्थशास्त्र ज्ञानी केलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने -

१) पैशाच्या मागणीबाबत सनातनवादी दृष्टीकोन
२) पैशाच्या मागणीबाबत नवसनातनवादी दृष्टीकोण
३) पैशाच्या मागणीबाबत केन्सचा दृष्टीकोन
४) पैशाच्या मागणीबाबत फ्रिडमन यांचा दृष्टीकोन

इत्यादी दृष्टीकोनांचा समावेश होतो.

प्रस्तुत प्रकरणात आपण वरील दृष्टीकोनाचा अभ्यास करणार आहोत.

पैसा हा अर्थशास्त्रातील सर्वात मोठा शोध होय. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना पैसा हवा हवासा असतो. कारण मानवाचे बहुतेक व्यवहार हे पैशाच्या सहाय्याने पूर्ण केले जातात. म्हणून

समाजातील सर्व नागरिकांकडून पैशासाठी मागणी असते तर पैशाचा पुरवठा किंवा निर्मिती करण्याचे अधिकार मात्र मध्यवर्ती शासन व मध्यवर्ती बँकेला RBI असतात. विशेषतः मध्यवर्ती बँक शासनाच्या सल्ल्यानुसार व मौद्रीक धोरणाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी पैशाच्या पुरवठ्यात वाढ किंवा घट करत असते.


वस्तूच्या मागणी प्रमाणाचे पैशाला देखील मागणी असते. फरक एवढाच की वस्तू स्वतः उपयोगी असते तर पैशाची उपयोगी वस्तूची खरेदी करण्यासाठी मागणी केली जाते. पैसा ही स्वतःउपयोगी वस्तू नसून उपयोगी वस्तूंच्या खरेदी साठी पैशाची मागणी केली जाते. म्हणून असे म्हटले जाते की पैसा आपण खाऊ शकत नाही. परंतु पैशाशिवाय वस्तू व सेवांची खरेदी करु शकत नाही. यास्तव पैशाच्या मागणी बाबतचे विविध दृष्टीकोन पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

## ६.२ पैशाची मागणी (DEMAND FOR MONEY)

प्रत्येक शास्त्रामध्ये जसे काही महत्त्वाचे शोध लागलेले आहेत तसाच पैशाचा शोध हा अर्थशास्त्रातील एक महत्वाचा शोध मानला जातो. पैशाद्वारे सर्वच देवाण घेवाणी चे व्यवहार होत असल्याने सर्वाकडून पैशासाठी मागणी केली जाते. वस्तूप्रमाणेच पैशालासुध्द मागणी असते. परंतू फरक एवढाच की वस्तू स्वतः उपयोगी असते तर पैसा मात्र उपयोगी वस्तूंच्या खरेदीसाठी पैशाला मागणी केली जाते. पैशाच्या या वैशिष्टयामुळेच असे म्हटले जाते की ‘We can not eat money but we can not eat without money’ म्हणजेच आपण पैसा खाऊ शकत नाही परंतू पैसा नसेल तर इतर काहीच खाऊ शकत नाही. यावरुन पैशाचे महत्व दिसून येते.

म्हणूनच पैशाच्या मागणीविषयीचे वेगवेगळे दृष्टीकोन पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**पैशाच्या मागणीचे दृष्टीकोन**




**A) पैशाच्या मागणीचा सनातनी दृष्टीकोन :-**

सनातनी अर्थतज्ञांच्या मते पैसा हा केवळ एक विनिमयाचे माध्यम आहे. म्हणजेच पैसा ही स्वतः उपभोग्य वस्तू नसून पैसा उपभोग्य वस्तूंच्या खरेदीचे साधन आहे. म्हणूनच सनातनवादी अर्थतज्ञांच्या मते पैशाला वस्तू - सेवांप्रमाणे प्रत्यक्ष मागणी नसून ती अप्रत्यक्ष स्वरुपाची असते. सनातनवादयांच्या मते अर्थव्यवस्थेतील पैशाची मागणी ही त्या देशातील विशिष्ट कालखंडातील वस्तू-सेवांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारांवरुन समजू शकते. परंतू सनातन वादी अर्थतज्ञांनी पैशाच्या मागणीचा विचार व्यक्तीगत न करता संपूर्ण समाजाच्या मागणीचा विचार केल्याने हे विश्लेषण एकतर्फी व अपूर्ण स्वरुपाचे आहे.

munotes.in

**B) पैशाच्या मागणीचा आधूनिक दृष्टीकोन :-**

आधुनिक अर्थशास्त्राचे जनक प्रा. जे. एम. केन्स यांनी १९३६ मध्ये लिहिलेल्या आपल्या 'The General Theory of Employment, Interest and Money' या ग्रंथात पैशाच्या मागणीविषयीचे आपले विचार मांडले. त्यांच्या मते पैशामध्ये सर्वाधिक रोखता असल्याने लोक पैशाला मागणी करतात. म्हणजेच लोकांना पैसा रोख स्वरुपात जवळ बाळगणे अधिक पसंत असते कारण या रोखतेच्या आधारे ते कोणत्याही वस्तू-सेवांची केव्हाही खरेदी करु शकतात. या रोकड पसंती मूळेच लोकांमार्फत पैशाला मागणी केली जाते.

प्रा. लॉर्ड केन्स यांच्या मते लोक आपल्याजवळ पैसा रोख स्वरुपात जवळ बाळगतात ते पूढील तीन हेतूंमूळे.

१) व्यवहार हेतू.
२) भविष्यकालीन तरतूदीचा हेतू.
३) सैबिंजीचा हेतू.

**C) मिल्टन फ्रिडमनचा पैशाच्या मागणीचा दृष्टीकोन :-**

लॉर्ड केन्स नंतर आलेल्या प्रा. मिल्टन फ्रिडमन, प्रा. बाऊमोल यासारख्या अर्थतंज्ञांना केन्सचे पैशाच्या मागणीचे वरील ३ हेतू अवास्तव वाटत होते. कारण वरील तीनही हेतूने पैशाला केली जाणारी मागणी ही उत्पन्नपातळी आणि व्याजदराने प्रेरीत झालेली आहे. परंतू आधूनिक अर्थतज्ञांच्या मते अर्थव्यवस्थेतील पैशाची मागणी ही अर्थव्यवस्थेतील पैशाच्या साठ्यावर अवलंबून असते.

प्रा. मिल्टन फ्रिडमन यांच्या मते पैशाच्या मागणीवर किंमत पातळी हा घटक परिणाम करतो. म्हणजेच किंमत पातळी व पैशाची मागणी यामध्ये प्रत्यक्ष व प्रमाणशीर संबंध असल्याने या दोघांमध्ये समान दिशेने बदल होतात. म्हणजेच किंमत पातळी वाढल्यास पैशाची मागणी वाढते व किमंत पातळी घटल्यास पैशाच्या मागणीत घट होते.

## ६.३ पैशाच्या मागणीबाबत केन्सचा दृष्टीकोण (KEYNESIAN APPROACH TO DEMAND FOR MONEY)

जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड केन्स यांनी "The General Theory of Employment Interest and Money" या १९३६ मध्ये लिहिलेल्या ग्रंथात पैशाच्या मागणीविषयी आपले विचार मांडले. त्यांच्या मते पैशांमध्ये १००टक्के रोखता असते म्हणून पैशाला मागणी येते. प्रा. केन्स यांच्या मते लोकांना रोख पैसा जवळ बाळगण्यांचे नैसर्गिक आकर्षण असते. म्हणून ते आपली बचत जास्तीत जास्त प्रमाणात रोख स्वरूपात जवळ बाळगतात. कारण पैशाच्या सहाय्याने कोणत्याही वस्तू व सेवेची खरेदी केंव्हाही करता येते. भविष्यकाळ अनिश्चित असल्याने प्रत्येक व्यक्ती रोख पैसा जवळ बाळगते. ही रोख रक्कम जवळ बाळगण्याची इच्छा म्हणजेच रोकड पसंती (Liquidity Preference) होय. ही रोकड पसंती म्हणजे पैशाची मागणी होय.

लॉर्ड केन्स च्या मते लोकांना मिळणारे उत्पन्न हे विशिष्ट कालावधीनंतर प्राप्त होत असते मात्र त्यांना दैनंदिन गरजा भागविण्यासाठी खर्च दररोज करावा लागतो हा खर्च भागविण्यासाठी लोक पैसा जवळ बाळगतात. लोकांप्रमाणेच विविध संस्था व शासनालाही रोख रक्कम जवळ बाळगावी लागते. केन्स यांच्या मते पैशाची मागणी म्हणजेच लोकांनी रोख स्वरुपात जवळ बाळगलेली रक्कम होय.

प्रा. केन्स यांनी पैसा जवळ बाळगण्याचे प्रमुख तीन उद्देश/हेतू सांगीतले आहेत ते पुढील प्रमाणे.

१) व्यवहार हेतू

२) तरतुदीचा हेतू

३) परिकल्पना हेतू.

### १) व्यवहार हेतू /खरेदी हेतू (Transaction Motive):

प्रत्येक व्यक्ती अगर संस्थेला आपले दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी रोख रक्कमेची अवाश्यकता असते. व्यक्तीला खर्च दररोज करावा लागतो. मात्र त्याला उत्पन्न दररोज न मिळता कालांतराने मिळत असते. म्हणून व्यक्ति किंवा संस्थाना उत्पन्न मिळाले की ते उत्पन्नाचा काही भाग रोख स्वरुपात जवळ बाळगतात व आपले दैनंदिन खर्च पूर्ण करतात. यालाच खरेदी हेतूंसाठी असलेली पैशाची मागणी असे म्हणतात. उदा. नोकरदारांना मिळणारे वेतन मासिक असते तर ठेकेदाराना मिळणारे उत्पन्न ठेका पूर्ण केल्यानंतर मिळते तर शेतकऱ्यांना शेतमाल विक्री केल्यानंतर उत्पन्न मिळते. मात्र खर्च दररोज करावा लागतो. कारखानदारांना मजूरी खर्च, जाहीरात खर्च करावा लागतो. तसेच कच्चा माल खरेदी खर्च, वाहतूक खर्च, अशा प्रकारचा खर्च करावा लागतो. व्यापाऱ्यांनाही मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. या सर्वांना आपले दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी रोख पैसा जवळ बाळगावा लागतो. अर्थात व्यक्ती दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी रोख रक्कम किती जवळ बाळगेल हे त्याच्या उत्पन्न पातळीवर अवलंबून असते. ज्यांची उत्पन्न पातळी जास्त त्यांची खरेदी हेतुसाठी असणारी पैशाची मागणी जास्त असते तर उत्पन्नाची पातळी कमी करणाऱ्यांची खरेदी हेतुसाठी असणारी पैशाची मागणी कमी असते. म्हणजे खरेदी हेतूसाठी असणारी पैशाची मागणी ही उत्पन्न पातळीवर अवलंबून असते.

हेच आपण समीकरणाच्या सहाय्याने पुढील प्रमाणे दाखवुन

$Mt = F(y)$ येथे


$Mt$ = व्यवहार हेतूसाठी पैशाची मागणी

(Demand of Money for Transaction Motive)

$Y$ = उत्पन्न पातळी (Level of income)

$F$ = फलन (Function)

वरिल समीकरणावरुन हे स्पष्ट होते की व्यवहार हेतूसाठी असणारी पैशाची मागणी ही उत्पन्न पातळीवर अवलंबून असते. याचा अर्थ असा की उत्पन्न पातळीत वाढ झाल्यास या हेतूने असणारी पैशाची मागणी वाढते. व उत्पन्न पातळीत घट झाल्यास या हेतूने असणारी पैशाची मागणीत घट होते. म्हणजेच उत्पन्न पातळी व पैशाची मागणी यांच्यातील संबंध धनात्मक स्वरुपाचा असून या हेतुसाठी असणारी पैशाची मागणी व्याज अलवचिक असते. हेच आपण पुढील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करु.




**आकृती क्र. ६.२**

वरिल आकृतीमध्ये OX अक्षावर उत्पन्नाची पातळी दर्शविली असून OY अक्षावर व्यवहार हेतूसाठी असणारी पैशाची मागणी दर्शविली आहे. आकृतीवरुन हे स्पष्ट होते की उत्पन्नपातळी १०० कोटी रुपयांवरु ३०० कोटी रुपये झाल्यास पैशाची मागणी ही १०० कोटी रुपयांवरुन ३०० कोटी रुपये होते. म्हणजेच उत्पन्नपातळीत वाढ होत असताना पैशाच्या मागणीत वाढ होत असते हेच Mt = F (Y) या वक्राने दर्शविले आहे.

**२) तरतूदी हेतु किंवा दक्षता हेतू (Precautionary Motive):**


मनुष्याचा भविष्यकाळ निश्चत नसतो. भविष्य काळात मानववर कोणते संकट किंवा आपत्ती येईल याची त्याला माहीती नसते. म्हणून तो आपल्या एकूण उत्पन्नाचा काही भाग भविष्काळात येणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी रोख स्वरुपात जवळ बाळगतो. यालाच तरतूद हेतूसाठी असणारी पैशाची मागणी असे म्हणतात. उदा. म्हातारपण, आजारपण, अपघात, कौटुंबिक जबाबदारी, बेकारी, मृत्यू, व्यवसाय, मुलामुलीचे लग्न शिक्षण या सारख्या घटना घडल्या तर त्या संकटांना तोंड देण्यासाठी विशिष्ट रक्कमेची तरतूद करुन ठेवली जाते. व्यक्तिप्रमाणे व्यापारी व उद्योजकांनाही भविष्यातील आपत्तीनां तोंड देण्यासाठी काही रकमेची तरतूद करुन ठेवावी लागते. भविष्यकालीन संकटांना तोंड देण्यासाठी व्यक्तिकडून जी रोख पैशाची मागणी केली जाते त्यालाच तरतूद हेतूसाठी असणारी पैशाची मागणी असे म्हणतात.

अर्थात ही पैशाची मागणी व्यक्तिच्या उत्पन्न पातळीवर अवलंबून असते. उत्पन्नाची पातळी जास्त असल्यास या हेतूने असणारी पैशाची मागणी जास्त असते. तर उत्पन्न पातळी कमी असल्यास या हेतूने असणारी पैशाची मागणी ही कमी असते. हे आपण समीकरणाच्या सहाय्याने पुढील प्रमाणे पाहू

Mp -= F (Y) येथे
MP = तरतूद हेतूसाठी असलेली पैशाची मागणी
Y = उत्पन्न पातळी
F = फलन

munotes.in

वरिल समीकरणाने हे स्पष्ट होते की उत्पन्नपातळी व तरतुद हेतूसाठी असणारी पैशाची मागणी यांच्यामध्ये धनात्मक संबंध असतो. म्हणजे उत्पन्नपातळीत वाढ झाल्यास या हेतूने असणारी पैशाची मागणी वाढते व उत्पन्नपातळी घटल्यास पैशाची मागणी घटते. अर्थात या हेतूने असणारी पैशाची मागणी हे व्याज अलवचीक असते. हेच आपण आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करु.




वरिल आकृती मध्ये OX अक्षावर उत्पन्न पातळी OY अक्षावर तरतूद हेतूसाठी असणारी पैशाची मागणी दर्शविलेली आहे. उत्पन्न पातळी १०० कोटी रुपयावरुन २०० कोटी रुपये झाल्यास तरतूद हेतूसाठी असणारी पैशाची मागणी १०० कोटी रुपयावरुन १५० कोटी रुपये होते याचा अर्थ असा की उत्पन्न पातळीत वाढ होत असताना तरतूद हेतूसाठी असणारी पैशाची मागणी देखील वाढते.

**३) परिकल्पन किंवा सट्टेबाजीचा हेतू (Speculative Motive):**

अर्थव्यवस्थेत भांडवल बाजारातील शेअर्स व रोख्यांच्या किंमतीत सतत बदल होत असतात. या बदलांचा फायदा घेण्याच्या उद्देशाने काही व्यक्ती स्वत:जवळ रोख पैसा बाळगतात व भांडवल बाजारातील चढ उतारांचा फायदा घेतात. यालाच सैंबिंजीच्या हेतूसाठी असणारी पैशाची मागणी असे म्हणतात.

अर्थात या सट्टेबाजीच्या हेतूसाठी असणारी पैशाची मागणी ही व्याज लवचिक असते. म्हणजे व्याजदरात वाढ झाल्यास या हेतूने केली जाणारी पैशाची मागणी घटते व व्याजदरात घट झाल्यास या हेतूने केली जाणारी पैशाची मागणी वाढते. हेच आपण समीकरणाच्या सहाय्याने पुढील प्रमाणे पाहू

Ms = F(R) येथे

Ms = परिकल्पन हेतूसाठी असणारी पैशाची मागणी


R = व्याजाचा दर

F = फलन

याचा अर्थ असा की सट्टेबाजीच्या हेतूसाठी असणारी पैशाची मागणी ही व्याजदरावर अवलंबून असेत व त्यामध्ये ऋणात्मक स्वरुपाचा संबंध असतो. जेव्हा व्याजदर कमी होतो तेव्हा

munotes.in

सट्टेबाजीच्या हेतूसाठी असणारी पैशाची मागणी वाढते व व्याजदर वाढल्यास या हेतूने असणारी पैशाची मागणी घटते. हेच आपण आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करु.




**सट्टेबाजीच्या हेतुसाठी पैशाची मागणी**

वरिल आकृतीमध्ये OX अक्षावर सट्टेबाजीच्या हेतूसाठी पैशाची मागणी दर्शविलेली आहे तर OY अक्षावर व्याजदर दर्शविला आहे. PLT या वक्रावरुन पैशाची मागणी आणि व्याजदर यातील संबंध स्पष्ट होतो. व्याजाचा दर OR4 असा जास्तीचा असल्यास पैशाची मागणी फक्त OM4 एवढी असते. व्याजाच्या दरात घट होत गेल्यास पैशाच्या मागणीत वाढ होत जाते. समजा व्याज दर घटून OR1 झाल्यास पैशाची मागणी वाढून OM1 होते.

आकृती PLT हा वक्र रोकड प्राधान्य वक्र होय. हा वक्र डावीकडून उजवीकडे खाली उतरत जातो. या वक्राचे एक खास वैशिष्ट असे की व्याचाजा दर एका विशिष्ट पातळीपर्यंत कमी झाल्यास हा वक्र पुढे सरकत न जाता OX अक्षाला समांतर होतो. आकृतीमध्ये PT हा वक्र L बिंदूनंतर (LT) x अक्षाला समांतर झालेला आहे. कारण व्याज दर एका विशिष्ट मर्यादेनंतर कमी झाला तरी रोख रक्कमेची इच्छा मर्यादीत राहते. याला लॉर्ड केन्स यांनी रोखतेचा सापळा म्हटले आहे. (Liquidity Trap) आकृतीमध्ये L बिंदूने रोखतेचा सापळा दर्शविला आहे.

## ६.४ पैशाच्या मागणीबाबत परंपरागत / सनातनवादी दृष्टीकोन (CLASSICAL APPROACH TO DEMAND FOR MONEY)

परंपरागत अर्थशास्त्रज्ञांनी पैशाला महत्त्व दिलेले नव्हते. त्यांच्या मते पैशाला प्रत्यक्ष मागणी नसून पैसाही स्वतः उपभोगाची वस्तु नाही. परंतु उपयोगी वस्तु प्राप्त करुन देण्याची शक्ती पैशामध्ये आहे. पैशाला फक्त विनिमयाचे साधन म्हणून मागणी असते. पैशाच्या साहाय्याने इतर वस्तु व सेवा खरेदी करण्यासाठी पैशाला मागणी असते. पैसा पूर्णतः तटस्थ असतो. त्याला स्वतः साठी मागणी नसते. इतर वस्तु व सेवांची खरेदी करण्यासाठी पैशाला मागणी असल्यामुळे एखाद्या देशात एका वर्षात पैशाची मागणी किती आहे ते त्या देशात पैशाच्या साहाय्याने केल्या जाणाऱ्या व्यवहारावरुन ठरते. पैशामध्ये जेवढे जास्त व्यवहार केले जातील तेवढी पैशाला मागणी जास्त असते असे पारंपारीक अर्थशास्त्रज्ञांचे मत होय.

परंपरागत अर्थशास्त्रज्ञांच्या मतानुसार पैशाच्या मागणीचे परिणाम व्यक्तीनिष्ठ घटकांवर अवलंबून नसुन ते वस्तुनिष्ठ घटकांवर अवलंबून आहेत. परंपरागत अर्थशास्त्रानी पैशाच्या मागणीचा विचार व्यक्तीगत न करता संपूर्ण समाजाच्या मागणीचा विचार केल्यामुळे हे विश्लेषण एकतर्फी आणि अपूर्ण स्वरुपाचे आहे.

### १) सनातनवादी दृष्टीकोन (Classical approaches):

**पैशाचे मूल्य :**

पैशाचे मूल्य ही संकल्पना पैशाच्या खरेदी शक्तीशी संबंधित असते. म्हणजेच पैशाच्या एका परिमाणात जेवढ्यावस्तु व सेवांचे नग खरेदी करता येतात ती नग संख्या म्हणजे पैशाचे मूल्य होय. पैशाची खरेदी शक्ती ही किंमत पातळीवर अवलंबून असते.

किंमत पातळी जास्त असल्यास पैशाची खरेदी शक्ती कमी असते व किंमत पातळी कमी झाल्यास पैशाची खरेदी शक्ती जास्त असते. म्हणजेच पैशाचे मूल्य हे किंमत पातळीच्या व्यस्त प्रमाणात बदलते. हे आपण सुत्र रुपाने पुढील प्रमाणे पाहू.

सूत्र

$$VM = \frac{1}{P}(\text{Value of Money})$$

येथे $V_M$ = पैशाचे मूल्य (Value of Money)

P = किंमत पातळी (Price Level)

वरील सूत्राच्या साहाय्याने पैशाचे मूल्य काढता येते.

### ६.४.१ चलन संख्यामान सिद्धांत (The Quantity Theory of Money):

यालाच विनिमय दृष्टीकोन किंवा व्यवहार दृष्टीकोन (Transaction approach) असे म्हणतात.

पैशाचे मूल्य कसे ठरते याचे स्पष्टीकरण करण्यासाठी विविध सिद्धांत मांडले गेले. त्यामध्ये फिशर यांचा विनिमय दृष्टीकोन महत्त्वाच मानला गेला. आयार्व्हिग फिशर यांनी १९११ मध्ये The Purchasing Power of Money हा ग्रंथ प्रसिद्ध करुन त्यामध्ये चलन संख्यामान सिद्धांत स्पष्ट करण्यासाठी विनिमय समिकरण मांडले. पैशाच्या विनिमय माध्यम या कार्यावर विशेष भर देऊन चलन संख्या आणि वस्तुंची संख्या यामधील संबंध स्पष्ट केले. त्यांच्या मते पैशाचे मूल्य म्हणजे पैशाची खरेदी शक्ती होय. पैशाच्या साहाय्याने जेवढ्या वस्तु व सेवा खरेदी करता येतात. त्यालाच पैशाची खरेदी शक्ती म्हणतात. पैशाचे मूल्य वस्तुंच्या किंमत पातळीवर अवलंबून असते. त्यांच्या मते पैशाचा साठा वाढेल तशी किंमत पातळी वाढेल आणि पैशाचे मूल्य कमी होईल म्हणजेच पैशाचा साठा व किंमत पातळी एकाच दिशेने बदलतात तर पैशाचे मूल्य आणि किंमत पातळी व्यस्त प्रमाणात बदलतात. इतर परिस्थिती कायम असताना पैशाची संख्या दुप्पट केली असता वस्तुच्या किंमती दुप्पट होतात व पैशाचे मूल्य निमपट होते.

**सिद्धांताची परिभाषा:**

१) जे.एस. मिल : ''इतर परिस्थिती कायम असतांना पैशाचे मूल्य हे पैशाच्या परीमाणाच्या विरुद्ध दिशेने बदलते. त्यामुळे पैशाच्या परिमाणातील प्रत्येक वाढीबरोबर पैशाचे मूल्य तेवढेच घटते व पैशाच्या परिमाणातील प्रत्येक घटीमुळे पैशाचे मूल्य त्याच प्रमाणात वाढते.''

munotes.in

२) प्रा. फिशर - ''इतर परिस्थिती कायम असताना पैशाच्या परिमाणात होणाऱ्या प्रत्येक बदलामुळे मूल्य पातळीत प्रत्यक्षपणे बदल होतात.''

**सिद्धांताचे स्पष्टीकरण:**

प्रा. फिशर यांच्या मते पैशाचे मूल्य हे पैशाच्या मागणी व पुरवठ्यावर अवलंबून असते. परंतु पैशाची मागणी अल्पकाळात स्थिर असते. म्हणून पैशाच्या पुरवठ्याचाच पैशाच्या मूल्यावर परिणाम होतो म्हणून पैशाची मागणी व पुरवठा यांचे थोडक्यात स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

**अ) पैशाची मागणी (Demand for Money) :**

फिशरच्या सिद्धांतांत पैशाची मागणी PT ने दर्शविली जाते. फिशरच्या मते पैशाला मागणी ही फक्त विनिमय व्यवहारासाठी असते. इतर वस्तु व सेवांची खरेदी करण्यासाठी आपण पैशाला मागणी करतो. म्हणजे पैशाला प्रत्यक्ष मागणी नसते. यास्तव एखाद्या देशात पैशाला असणारी मागणी किती हे त्या देशातील सर्व वस्तु सेवा यांच्या परिमाणाला त्यांच्या किंमतीने गुणले म्हणजे समजते. सूत्र रुपाने हे आपणास पुढील प्रमाणे दाखविता येईल.

पैशाची मागणी = PT

P.T. येथे

P = किंमत पातळी

T = वस्तु व सेवा यांचे परिमाण

P आणि T चा गुणाकार केल्यास आपणास पैशाची मागणी किती हे कळून येते.

**ब) पैशाचा पुरवठा (Supply of Money) :**

फिशरच्या सिद्धांतात पैशाचा पुरवठा MV ने दर्शविला जातो. भारतात पैशाचा पुरवठा करण्याचे कार्य केंद्र सरकार व मध्यवर्ती बँक करते. हा पैशाच्या पुरवठा किती करावयाचा या बाबत निर्णय केंद्र सरकारच्या मौद्रिक धोरणावर अवलंबून असतो. या धोरणानुसार केल्या जाणाऱ्या पुरवठ्याला M द्वारे दर्शविण्यात येते. येथे सरकार व मध्यवर्ती बँकेने निर्माण केलेल्या कायदेशीर पैशाच्या पुरवठ्याचा भ्रमणवेग लक्षात घेणे आवश्यक असते. पैशाला भ्रमणवेग म्हणजे पैशाचे एक परिमाण एका दिवसात किती वेळा हस्तांतरीत होते. उदा. एक रुपया एका दिवसात दहा वेळा हस्तांतरीत झाला तर त्या रुपयाचा भ्रमण १० होय. हा भ्रमणवेग व कायदेशीर पैसा यांच्या गुणाकारास पैशाचा एकूण पुरवठा असे संबोधले आहे. सुत्ररुपाने

पैशाचा पुरवठा = MV असे मांडले जाते.

M = पैशाचे एकूण परिमाण (Quantity of Money)

V = पैशाचा भ्रमण वेग (Velocity of Money)

वरीलप्रमाणे पैशाच्या मागणी पुरवठ्याचा विचार करुन फिशरने पुढील प्रमाणे समिकरण मांडले आहे.

सूत्र MV = PT = पैशाचा पुरवठा = पैशाची मागणी, हे समीकरण पुढीलप्रमाणे मांडता येईल.

$$P = \frac{Mv}{T}$$

वरील समिकरणात फिशरने पत पैशाचा विचार केलेला नव्हता फक्त कायदेशीर पैशाचाच विचार केलेला होता. अलीकडील काळात पतपैशाला अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे. म्हणून फिशरने आपल्या समीकरणात सुधारणा करुन नवीन समीकरण पुढील प्रमाणे मांडले.

$$P=\frac{MV+M^1V^1}{T}$$

जेथे,

$M^1$ = पत पैसा

$V^1$= पत पैशाचा भ्रमणवेग

M = पैशाचा पुरवठा

V = पैशाचा भ्रमणवेग

T = वस्तु व सेवा यांचे परिमाण

P = किंमत पातळी

वरिल समिकरणात P ची किंमत $M,V,M^1,V^1,T$ या घटकांवर अवलंबून असते मात्र फिशरने $V,M^1,V^1,T$ हे सर्व घटक अल्पकाळात स्थिर मानले असुन फक्त M या घटकांमुळेच किंमत किंमत पातळी बदलते असे म्हटले आहे. त्यांच्या मते पैशाचा पुरवठ्यात दुप्पट झाल्यास किंमत पातळी दुप्पट होते व पैशाचे मूल्य निमपट होते व पैशाचा पुरवठा निमपट झाल्यास किंमत पातळी निमपट होते व पैशाचे मूल्य दुप्पट होते. फिशरच्या समीकरणात किंमत घालून पैशाच्या मुल्यात होणारे बदल आपणास स्पष्ट करता येतील.

उदाहरणार्थ :-

समजा

M = २० को. रु.

V = ४

M1 = ४० को. रु.

V1 = १०

T = ६० को.रु.

तर किंमत पातळी व पैशाचे मूल्य काय राहिल ?

$$P=\frac{MV+M'V'}{T}$$

$$P=\frac{20\times4+40\times10}{60}$$

$$P=\frac{80+400}{60}$$

$$P=\frac{480}{60}$$

$P=8$ ही किंमत पातळी होय

यावरुन आपणास पैशाचे मूल्य काढता येईल

$$पैशाचे\ मूल्य = \frac{1}{किंमत\ पातळी} = \frac{T}{MV + M'V'}$$

$$पैशाचे\ मूल्य = \frac{60}{60 \times 4 + 40 \times 10}$$

$$= \frac{60}{80 + 400}$$

$$= \frac{60}{480}$$

$$= \frac{1}{8}$$ हे पैशाचे मूल्य होय.

II) समजा आपण M आणि M1 चे परिणाम दुप्पट केल्यास आणि V,V1 व T स्थिर मानल्यास किंमत पातळी P दुप्पट होऊन पैशाचे मूल्य निमपट होईल.

समजा M = ४० को रु.

M' = ८० को. रु.

V = ४

V' = १०

T = ६० को.रु.

तर

$$P = \frac{MV + M'V'}{T}$$

$$P = \frac{40 \times 4 + 80 \times 10}{60}$$

$$P = \frac{160 + 800}{60}$$

$$P = \frac{960}{60}$$

$P = 16$ रुपये ही किंमत पातळी होय. यावरून पैशाचे मुल्य काढता येईल.

$$पैशाचे\ मूल्य = \frac{1}{किंमत\ पातळी}$$

$$= \frac{T}{MV + M'V'}$$

$$पैशाचे\ मूल्य = \frac{60}{60 \times 4 + 80 \times 10}$$

$$= \frac{60}{160 + 800}$$


$$= \frac{60}{960}$$

$$= \frac{1}{16}$$ हे पैशाचे मूल्य होय.

munotes.in

अशा रीतीने पैशाचे परिमाण दुप्पट झाल्यास किंमत पातळी दुप्पट होते व पैशाचे मूल्य निम्मे होते वरील उदाहरणांच्या साह्याने स्पष्ट केले आहे.

पैशाचे परिमाण २० कोटी रुपये वरुन ४० कोटी रुपये झाल्यामुळे P ची किंमत ८ रुपयावरुन १६ रुपये व पैशाचे मूल्य १/८ वरुन १/१६ झाले.




**आकृती क्रमांक ७.१**

हे फिशरचे समीकरण आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करता येते. वरील आकृती मध्ये OX अक्षावर पैशाचा पुरवठा व OY अक्षावर किंमतपातळी दर्शविलेली आहे व D हा वक्र M व P या मधील कार्यात्मक संबंध दर्शवितो.

पैशाचा पुरवठ्यात M1 वरुन M2 पर्यंत म्हणजे दुप्पट वाढ केल्यास किंमत पातळी ही P1 वरुन P2 पर्यंत दुप्पट होते. हे स्पष्ट होते.

**गृहिते :**

फिशरचा चलनसंख्यामान सिद्धांत पुढील गृहितांवर आधारित आहे.

१) पैशाचा भ्रमणवेग स्थिर आहे.
२) कायदेशीर पैसा व पत पैसा यांचे प्रमाण कायम आहे.
३) वस्तु व सेवा (T) यांचे प्रमाण कायम असते
४) वस्तु विनिमयाची संख्या कायम आहे.
५) पूर्ण रोजगाराची परिस्थिती असते.
६) पैशाला असणारी मागणी कायम असते
७) इतर परिस्थिती कायम असते.

फिशरच्या सिद्धांतावर केल्या जाणाऱ्या टीका

**१) इतर परिस्थिती स्थिर नसते:**

फिशर यांनी सिद्धांताची मांडणी करताना इतर परिस्थिती स्थिर मानली आहे. पण हे चूक आहे कारण आजच्या गतीशील अर्थव्यवस्थेत इतर परिस्थितीत सतत बदल होत असतात असे प्रा. हाम यांचे मत आहे.

munotes.in

**२) पूर्ण रोजगाराची चुकीची गृहिते:**

अर्थव्यवस्थेत पुर्णरोजगारी असते असे फिशर यांनी गृहीत धरले आहे. परंतु पूर्ण रोजगारीची परिस्थिती अभावानेच आढळते. त्यामुळे व्यवहारात यांचा उपयोग होत नाही.

**३) सर्वच्या सर्व उत्पन्न खर्च केले जात नाही:**

या सिद्धांतात लोकांचे सर्व उत्पन्न खर्च केले जाते असे गृहीत धरले आहे. पण ते चुकीचे आहे. कारण समाज आपल्या उत्पन्नाचा काही भाग भविष्य काळातील तरतुदीसाठी राखून ठेवतो.

**४) व्याजदराचा विचार नाही:**

फिशरने आपल्या सिद्धांतात व्याजदराचा अजिबात विचार केलेला नाही. त्यामुळे हा सिद्धांत अपूर्ण वाटतो.

**५) पैशाचा भ्रमण वेग स्थिर नसतो:**

फिशरने आपल्या सिद्धांतात पैशाचा भ्रमण स्थिर आहे असे गृहीत धरले आहे. परंतु ते चुक आहे. कारण १९२३ मध्ये जर्मनीत पैशाचा भ्रमणवेग वाढल्यामुळे भाववाढ झाली होती.

**६) स्थितीशील सिद्धांत:**

फिशरचे विनियम समीकरण स्थितीशील असल्याने गतीशील अर्थव्यवस्थेतील बदलांचा अभ्यास करण्यास हे समीकरण उपयोगी पडत नाही.

**७) पैशाचे परिमाण व किंमत पातळीतील प्रत्यक्ष व प्रमाणशीर संबंध चुकीचा:**

मागणीतील वाढ, मक्तेदारी व साठेबाजी यामुळे ही वस्तुंच्या किंमतीत वाढ घडून येत असते याकडे मात्र फिशरने दुर्लक्ष केले आहे.

**८) वस्तु व सेवा यांचे परिमाण स्थिर नसते:**

लोकांच्या वास्तव उत्पन्न पातळीत वाढ झाल्यास लोकांचा उपभोग वाढतो. त्यामुळे लोकांचे खरेदी व्यवहार वाढतात. शिवाय पैशाच्या पुरवठ्यात वाढ झाल्यासही असे होते. परंतु वस्तु व सेवांचे प्रमाण स्थिर असते असे गृहीत धरणे चुकीचे आहे.

९) फिशरने पैशाच्या पुरवठ्यावर अवास्तव भरदेऊन पैशाच्या मागणीकडे दुर्लक्ष केले आहे.
१०) सर्वसाधारण मागणी व पुरवठा सिद्धांत पैशालाही लागू करण्यात आल्यामुळे नवीन असे काही या सिद्धांताने सांगितले नाही.
११) सर्वच व्यवहार रोख पैशात चालतातच असे गृहीत धरुन चुक केली आहे.
१२) या सिद्धांताने तेजी मंदी व वस्तुची किंमत पातळी यातील संबंध विचारात घेतलेला नाही.
१३) पैशाच्या मूल्यावर उत्पन्न बचत, राष्ट्रीय उत्पन्न, लोकसंख्या उपभोग इ. घटकांचा परिणाम होत असतो. हे फिशरने विचारत घेतले नाही.

## ६.५ पैशाच्या मागणीबाबत फ्रिडमन यांचा दृष्टीकोन (FRIEDMAN'S APPROACH DEMAND FOR MONEY)

शिकागो पंथीय अर्थशास्त्रज्ञ मिल्टन फ्रिडमन यांनी पैशाच्या मागणीविषयी जो सिद्धांत मांडला आहे. तो पैशाची मागणी ठरवताना पैशाच्या भुमिकडे विशेष लक्ष देतो. पैशाची एकूण

मागणी ठरवताना पैशाची भूमिका महत्त्वाची असते व त्यामुळे एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असते.

फ्रिडमनच्या मतानुसार पैशाच्या मागणीची उत्पन्न लवचिता ही एकापेक्षा जास्त असते. म्हणजेच उत्पन्न पातळीत ज्या दराने वाढ किंवा घट होते त्याचा परिणाम म्हणून पैशाची मागणी त्यापेक्षा जास्त दराने वाढते किंवा घटते. पैसा हा एक संपत्तीचा प्रकार असून त्याचे इतर कोणत्याही प्रकारच्या संपत्तीत रुपांतर करता येते. म्हणून देशाची मागणी ही भांडवली वस्तुंच्या मागणीचाच एक प्रकार आहे.

पैशाच्या मागणीवर परिणाम करणारे घटकः फ्रिडमन यांच्या मते पैशाच्या मागणीवर पुढील घटक परिणाम करतात.

**१) किंमत पातळीः**

फ्रिडमन यांच्या मते किमंत पातळी व पैशाची मागणी यात प्रत्यक्ष व प्रमाणशीर संबंध असल्यामुळे या दोहोत समान दिशेने बदल होतात. म्हणजेच किंमतीची पातळी वाढल्यास पैशाची मागणी वाढते व किंमत पातळीत घट झाल्यास पैशाच्या मागणीत देखील घटक होते.

**२) अर्थव्यवस्थेतील वास्तव उत्पादन व उत्पन्न पातळीः**

फ्रिडमन यांच्या मतानुसार वास्तव उत्पन्न पातळी व पैशाची मागणी यात एकाच दिशेने बदल होतात. म्हणजेच उत्पादनात वाढ झाल्यास पैशाच्या मागणीतही वाढ होते. व उत्पादन घट झाल्यास पैशाच्या मागणीत ही घट होते वास्तव उत्पन्न वाढले की पैशाची मागणी वाढते. कारण वास्तव उत्पन्न वाढीबरोबर लोकांचे राहणीमान वाढते व राहणीमान वाढीचा परिणांम पैशाची मागणी अधिक वाढते.

**३) व्याज दरः**

मिल्टन फ्रिडमन यांच्या मते व्याजदर व पैशाची मागणी यामध्ये व्यस्त स्वरुपाचा संबंध असतो. म्हणजे व्याजदरात वाढ झाल्यास पैशाची मागणी घटते व व्याजदरात घट झाल्यास पैशाची मागणी वाढते.

**४) सामान्य किंमत पातळीच्या दरातील बदलः**

फ्रिडमन यांच्या मते सामान्य किंमतीच्या पातळीतील बदल आणि पैशाचे मूल्य यांच्यातील संबंध व्यस्त स्वरुपाचा असतो कारण भाव वाढीच्या काळात पैशाचे मूल्य घटत असते. फ्रिडमनच्या मते वरील सुरुवातीच्या दोन घटकात आणि पैशाच्या मागणीत सम दिशेने बदल होतात. तर नंतर दोन घटकात आणि पैशाच्या मागणीत व्यस्त दिशेने बदल होतात.

सांराश फ्रिडमनच्या मते संपत्ती विविध स्वरुपात धारण करता येते. उदा. पैसा, रोखे, शेअर्स, भौतिक वस्तू आणि मानवी भांडवल इत्यादि. व्यक्ती वरील प्रकारात आपल्या संपत्तीचे विभाजन करुन जास्तीत जास्त समाधान मिळविण्याचा प्रयत्न करते.

फ्रिडमन यांचे पैशाच्या मागणीचे फलन पुढीलप्रमाणेः-

$$Md = F\left(P, rb, re, \frac{1}{P}, \frac{dp}{dt}, w, y, u\right)$$

येथे

md = पैशाची मागणी

P = सामान्य किंमत पातळी

rb = रोख्यापासून मिळणारे उत्पन्न

re = शेअर्स वरील बाजार व्याज दर.

$\left[\frac{1}{P}, \frac{dp}{dt}\right]$ भौतिक संपत्तीवरील मानवी भांडवलाशी गुणोत्तर

P, dt

Y = एकूण संपत्ती

U = संपत्ती धारण करणाऱ्याच्या आवडीनिवडीवर परिणाम करणारे, उपयोगिता निर्धारीत करणारे चल.

F = फलन

फ्रिडमन यांच्या मते पैशाची मागणी ही वास्तव शिलकीसाठी असते. त्यांची ही पैशाची मागणी फलनाची संकल्पना अनुभवजन्य पुराव्यावर आधारलेली आहे. पैशाची मागणी ही कायम उत्पान्नावर आधारलेली असून व्यक्तीचे उत्पन्न जसजसे वाढत जाते. तसतशी पैशांची मागणी वाढत जाते. असे फ्रिडमल यांचे मत आहे.

## ६.६ सारांश (SUMMARY)

अर्थव्यवस्थेतील सर्व गरजांची पूर्तता ही पैशामुळेच होत असल्याने पैशाची मागणी केली जाते. परंपरागत अर्थशास्त्रज्ञाच्या मते पैसा हे एक व्यवहार पुर्ततेचे साधन असल्याने विनिमयाच्या हेतूने त्याला मागणी केली जाते. नवसनातवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते पैशाच्या मूल्य संग्रह या गुणधर्मामुळे पैशाला मागणी असते. केन्स सारख्या अर्थशास्त्रज्ञाने पैशाच्या मागणीचे प्रामुख्याने तीन महत्त्वाचे हेतू विचारात घेतले. तर फ्रिडमन सारख्या अर्थशास्त्रज्ञाने पैशाच्या मार्गाचा विचार करताना पैशाच्या भूमिकेला महत्त्व दिले आहे.

## ६.७ प्रश्न (QUESTIONS)

१) पैशाच्या मागणीचा केन्सचा दृष्टिकोन स्पष्ट करा.
२) पैशाच्या मागणीचा परंपरागत दृष्टिकोन विशद करा.
३) पैशाच्या मागणीचा फ्रिडमन यांचा दृष्टिकोन स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ७

# व्यापारी बँका

**घटक रचना :**

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ व्यापारी बँकेचा अर्थ
७.३ व्यापारी बँकाची कार्ये
७.४ पतपैशाची निर्मिती
७.५ रोखता व लाभदायिता
७.६ १९९०-१९९१ पासूनच्या बँकीग क्षेत्रातील सुधारणा
७.६ सारांश
७.७ प्रश्न

## ७.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- व्यापारी बँकांचा अर्थ माहीत करुन घेणे.
- व्यापारी बँकांची कार्ये समजून घेणे.
- पतपैशाच्या निर्मितीची प्रक्रिया स्पष्ट करा.
- बँकिंग क्षेत्रातील १९९०-९१ पासूनच्या सुधारणांचा आढावा घेणे.


## ७.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

बँक म्हणजे पैशाच्या व्यवहारांशी निगडीत असलेली संस्था. बँका लोकांजवळ पडून असलेला किंवा उपयोगात नसलेला पैसा गोळा करुन जे लोक हा पैसा वापरु शकतात अशा लोकांना देऊन तो उत्पादक कारणासाठी वापरायला लावतात. भारतात आधुनिक बँकांची सुरुवात १८व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. सुरवातीला या बँका बँकांच्या कार्याबरोबरच व्यापार पण करत असत. भारतातली पहिली बँक 'बँक ऑफ हिंदूस्तान'कलकत्यात १७७० मध्ये स्थापन झाली ही बँक मेसर्स ॲलेक्झांडर आणि कंपनीने स्थापन केली होती. खऱ्या अर्थाने भारतीयांच्या मालकीची आधुनिक बँक १८८१ मध्ये 'द आँध कमर्शियल बँक' स्थापन झाली. आणि त्या नंतर १८९४ मध्ये पंजाब नॅशनल बँकेची स्थापना झाली.

ंविसाव्या शतकाच्या अखेरीस बँकाचे विशेषीकरण झालेले दिसू येते. बँका एखाद्या विशिष्ट अर्थिक क्षेत्रात कार्यरत झालेल्या दिसून येतात.

डॉ. एच.एल. हार्ट यांची व्याख्या : ''बँक म्हणजे अशी व्यक्ती की जी आजच्या दैनंदिन व्यवहारात लोकांकडून चालू खात्यावर पैसे स्वीकारते व ज्या व्यक्तींनी असा पैसा ठेवलेला आहे त्यांचे चेक्स स्वीकारते.''

वॉल्टर लिफ यांची व्याख्या : ''बँक म्हणजे अशी व्यक्ती किंवा संस्था की लोकांच्या ठेवी स्वीकारते व त्या त्यांनी चेकद्वारे मागितल्या असता त्यांना परत देते.''




## ७.२ व्यापारी बँकेचा अर्थ

व्यापारी बँक ही एक वित्तीय संस्था असून ती ठेवी स्विकारते, खाते सेवा पुरविते, विविध कर्जे उपलब्ध करुन देते. व्यापारी बँकांची सामान्य भूमिका म्हणजे सर्वसामान्यांना आणि व्यवसायांना आर्थिक सेवा प्रदान करणे, आर्थिक आणि सामाजिक स्थिरता आणि अर्थव्यवस्थेची शाश्वत वाढ सुनिश्चित करणे. यासंदर्भात पतनिर्मिती करणे हे व्यापारी बँकांचे सर्वात महत्त्वपूर्ण कार्य आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) ही भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक आहे.

## ७.३ व्यापारी बँकाची कार्ये (FUNCTIONS OF COMMERCIAL BANKS)

### १. ठेवी स्वीकारणे :

व्यापारी बँका पुढील तीन प्रकारच्या ठेवी स्विकारतात

### अ) चालू ठेवी :

ठेंवीदाराला या खात्यावर दिवसातून वाटेल तितक्या वेळा पैसे भरता येतात व काढता येतात. अशी सोय असल्याने या खात्यावरील पैशाचा बँकेला कर्ज देण्यासाठी फारसा उपयोग होत नाही. कारण या खात्यातील पैसे खातेदार केव्हा व किती काढून घेईल याचा नेम नसतो.

munotes.in

त्यामुळे बँकेला या खात्यातील पैसे दीर्घ मुदतीची कर्जे देण्यास उपयुक्त ठरत नाही. म्हणून या खात्यावर काही बँका मुळीच व्याज देत नाहीत.

**ब) बचत ठेवी:**

ठेवीदारास या खात्यातील पैसे दिवसातून वाटेल तितक्या वेळा काढता येत नाहीत. आठवड्यातून एक किंवा दोन वेळा या खात्यातील पैसे काढण्यास मुभा असते. तसेच एका वेळी जास्तीत जास्त किती रक्कम काढावयाची यावरही बंधने असतात. तसेच या खात्यातून जास्त पैसे काढावयाचे असतील तर बँकांना तसे आधी कळवावे लागते. या खात्यातील ठेवीचा बँकाना फार उपयोग होतो. कारण वाटेल तितक्या वेळा वाटेल तितकी रक्कम काढण्यास परवानगी नसल्याने या खात्यातील बरीच मोठी रक्कम बँकेच्या ताब्यात राहू शकते. त्यामुळे बँकेला ही रक्कम दिर्घ मुदतीची कर्जे देण्यास उपयुक्त ठरते. म्हणून या ठेवीवर बँका चालू खात्यावरील व्याजापेक्षा जास्त व्याज देतात. सर्वसाधारणपणे तीन ते साडेतीन टक्के व्याज दिले जाते.

**क) मुदत ठेवी :**

या ठेवी बँका विशिष्ट मुदतीसाठी स्विकारतात. सर्वसाधारणपणे १ महिना ते ५ वर्षे पर्यंतच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात. एखाद्या विशिष्ट मुदतीसाठी ठेवी ठेवल्या की खातेदाराला मुदत संपल्यापूर्वी त्यातील पैसे काढता येत नाहीत किंवा भरता येत नाहीत. मुदती प्रमाणे व्याज दिले जाते. जर ठेव कमी मुदतीसाठी ठेवली असेल तर कमी व्याज व जास्त मुदतीसाठी ठेवली असेल तर जास्त व्याज दिले जाते. विशिष्ट मुदत पूर्ण झाल्याशिवाय ठेवीदाराला यातील पैसा परत करावयाचा नसल्याने या ठेवीवरील सर्वच पैसा बँकांकडे विशिष्ट मुदती पर्यंतनिश्चितपणे राहतो. त्यामुळे बँकाना या ठेवीतला पैसा दीर्घ मुदतीसाठी कर्ज देण्यास खात्रीने उपयुक्त ठरतो. अर्थात त्यावेळी याठेवीवर वरील दोन ठेवी पेक्षा जास्त व्याज मिळते.

**२. कर्ज देणे:**

वरील तीन प्रकाराच्या ठेवीत ठेवलेला पैसा बँका कर्ज रुपाने देते. तो कर्जरुपाने इतरांना देणे आवश्यक असते. कारण बँका या ठेवीवर व्याज देतात. त्याचप्रमाणे बँकेच्या जागेचे भाडे, पत्रव्यवहार यासारखे खर्च पण असतात. त्यामुळे बँकेला प्राप्तीचे साधन शोधावे लागते. बँकांच्या प्राप्तीचे महत्त्वाचे साधन म्हणजे पैसे कर्ज देऊन व्याज मिळविणे.

**अ) कर्ज:**

व्यापारी बँक व्यापाऱ्यांना विशिष्ट मुदतीकरिता पैसे कर्जाऊ देते. अशी मुदत तीन महिन्यापासून ते दीड दोन वर्षापर्यंत असते कर्ज देताना बँक तारण घेते. मालमत्ता, जमीन-जुमला, शेअर्स, कर्जरोखे, इत्यादीच्या तारणावर कर्ज दिले जाते.

**ब) रोख कर्ज:**

रोख कर्ज या प्रकाराची सुरुवात प्रथम स्कॉटलँड मध्ये झाली. तेथे हा प्रकार फारच लोक प्रिय झाला आहे. भारतातही या कर्जाचा प्रकार लोकप्रिय आहे. बँक आपल्या खातेदाराला आवश्यक असेल तेव्हा ठराविक रोख रक्कम कर्ज म्हणून देते. त्यालाच रोख कर्ज असे म्हणतात. असे कर्ज दिल्यावर बँक कर्ज दाराकडून वचनचिठ्ठी लिहून घेते. त्याशिवाय शेअर्स, कर्जरोखे, वस्तू, दागिने यासारखे एखादे तारण पण घेते. रोख कर्ज म्हणून जेवढी रक्कम कर्जदाराला मंजूर केलेली असते ती त्याला प्रत्यक्षात रोख स्वरुपात न देता त्यांच्या खात्यावर

जमा केली जाते. कर्जदार त्यातील पाहिजे तेव्हा पाहिजे तेवढी रक्कम नंतर चेकने काढू शकतो. या कर्जाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कर्जदार मंजूर झालेल्या रक्कमेपैकी जेवढी रक्कम उचलतो तेवढ्यावरच व्याज आकारले जाते.

### क) शिलकीपेक्षा ज्यादा रक्कम काढण्याची सवलत :

याला अधिकर्ष किंवा बँक विकर्ज असेही म्हणतात. हा पण एक कर्जाचाच प्रकार आहे. ज्या लोकांची बँकेत अगोदर खाती असतात. त्यांनाच ही कर्जे दिली जातात. खातेदाराला, त्याच्या खात्यात जेवढी रक्कम शिल्लक असते त्यापेक्षा जास्त रक्कम सदरची सवलत कर्ज मंजूर झाल्यास काढता येते. अशी जादा रक्कम काढण्यास बँकेची परवानगी लागते. व बँक योग्य असे तारण घेऊन ती देते.

### ३. हुंडी वटवणे :

व्यापाऱ्यांच्या हुंड्या वटवुन बँका अप्रत्यक्षरीत्या एक प्रकारे कर्जच देतात. मोठे व्यवहार हे पत पाहून केले जातात. अशा वेळी पत पाहून केलेल्या व्यवहारात धनकोला हुंडी काढता येते. विशिष्ट तारखेला धनको ने विशिष्ट रक्कम द्यावी असे बंधन असते. अशा हुंड्या बँका स्विकारतात हुंड्यांची रक्कम पाहून त्याच्या काही टक्के रक्कम बँक कर्जाऊ स्वरुपात देत असते.

### ४. पतपैशाची निर्मिती:

बँका त्यांच्याजवळ जमा होणाऱ्या ठेवीच्या माध्यमातून कर्जे वाटप करतात. देवघेवीचे व्यवहार पतपैशाच्या आधारे होत असल्याने मोठ्या प्रमाणावर पतनिर्मिती होते. बँका पत पैशाची निर्मिती खालील दोन मार्गानी करतात.

१) कर्ज देऊन

२) रोख्याची खरेदी करुन

### ५. खातेदारांची हस्तक म्हणून कार्ये

बँक खातेदारांच्या हस्तक म्हणून त्यांच्या वतीने काही कार्ये पार पाडतात, त्यातील काही पुढीलप्रमाणे आहेत.

### अ) चेकने पैसे पाठविणे:

व्यापारात किंवा इतर व्यवहारात अलीकडे फार मोठ्या प्रमाणावर उलाढाली होतात. त्यासाठी मोठमोठ्या रकमा एका गावाहून दुसऱ्या गावाला पाठविण्याची आवश्यकता भासते

### ब) ड्राफ्टने पैसे पाठविणे:

मनि ऑर्डरने पैसे पाठविण्याच्या सर्व गैरसोयी चेक प्रमाणे ड्राफ्टने पैसे पाठविण्यानेही दूर होतात. परंतु चेकपेक्षा ड्राफ्टने पेसे पाठविणाऱ्याचे बँक खाते नसेल तरी चालते. एखाद्या बँकेत पैसे भरले की ती बँक तेवढ्या रकमेचा ड्राफ्ट देते व ड्राफ्ट ज्या गावी पैसे पाठवायचे असतात तेथील शाखेवर देते. ड्राफ्ट म्हणजे एका बँकेने आपल्या दुसऱ्या बँकेवर ड्राफ्टमध्ये नमुद केलेले पैसे देण्याविषयीचा दिलेला आदेशच होय.

**क) पत्राने पैसे पाठविणे:**

चेक व ड्राफ्ट प्रमाणे पत्राद्वारे देखील पेसे एका गावाहून दुसऱ्या गावाला पाठवितात.

**ड) तारेने पैसे पाठविणे:**

ज्याला पैसे पाठवायचे ते त्याला ताबडतोब मिळावेत असे आपणास वाटत असेल तर बँका तशी व्यवस्था तारेने पैसे पाठवून करतात. अर्थात अमुक अमुक व्यक्तीला इतके इतके पैसे द्या. असे तारेने कळवताना सांकेतिक भाषेत कळवतात.

**इ) विश्वस्त म्हणून काम करणे :**

बँकानी विश्वस्त म्हणून काम करणे हे अनेकांना लाभदायक व उपयुक्त ठरले आहे. एखाद्या खातेदारात ह्यात तर त्याच्या मृत्यु पत्रानुसार त्यांच्या संपत्तीचे व्यवहार करणे.

**फ) कर्ज रोखे, शेअर्स, सोने-चांदी इत्यादींची खरेदी विक्री करणे:**

बँका आपल्या खातेदारांच्या वतीने सरकारी कर्ज रोख्यांची खरेदी करतात. तसेच खातेदारांना जेव्हा आपले कर्जरोखे विकून टाकावयाचे असतात, तेव्हा बँका त्या विकून देतात. त्याप्रमाणे बँका आपल्या खातेदारांसाठी विविध कंपन्यांचे शेअर्स खरेदी करतात किंवा त्यांची विक्री करुन देतात, तसेच सोने-चांदी यासारख्या धातूंची देखील खरेदी-विक्री आपल्या खातेदारांच्या वतीने बँका करतात.

**म) व्याज व लाभांश (डिव्हिंडंड) गोळा करणे:**

जे लोक सरकारी कर्जरोखे, विविध कंपन्यांचे शेअर्स खरेदी करतात, त्यांना सरकारी कर्जरोख्यावर व्याज व शेअर्स वर लाभांश मिळतो. परंतु प्रत्येक वर्षी सरकारी ट्रेझरीत जाऊन व्याज घेऊन येणे किंवा विविध कंपन्यांकडे जाऊन लाभांश आणणे हे कटकटीचे वेळखाऊ काम असते. मग असे लोक आपला त्रास वाचविण्यासाठी आपल्या बँकांना व्याज व लाभांश गोळा करण्यास सांगतात. मग बँका आपल्या खातेदारांसाठी ही कामे करतात.

**न) खातेदारांसाठी इतर कामे :**

बँका खातेदारांसाठी बरीच इतर कामे करतात. उदा. खातेदाराचे विम्याचे हप्ते भरणे, त्यांचे कर भरणे, त्यांच्या मुलांच्या शाळा कॉलेजची फी भरणे, तसेच आपल्या खातेदारांना परदेशी जाण्यासाठी पासपोर्ट मिळवून देणे, तसेच परदेशी प्रवासाची तिकीटे देखील मिळवून देणे इत्यादी अनेक कामे बँका आपल्या खातेदारांसाठी करीत असतात. अशी कामे करण्यासाठी काही बँका थोडासा आकार घेतात.

**उपयुक्त कार्ये:**

**अ) सेफ डिपॉढिट व्हॉल्ट :**

अनेकांजवळ सोने, हिरे, माणिक, मोती इ. दागीने असतात. तसेच काही अत्यंत महत्त्वाची कागदपत्रे पण असतात. अशी मौल्यवान वस्तू व कागदपत्रे घरी सुरक्षित ठेवणे अशक्य असते. तेव्हा सोय म्हणून बँका अशा वस्तू आपल्याकडे सुरक्षित ठेवण्याची हमी देतात. अशा वस्तू व कागदपत्रे बँकेतील सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्ये (सुरक्षित ठेवीचे खण) ठेवल्या असता सुरक्षित राहतात.

**ब) प्रवासी चेक:**

प्रवासात रोख रक्कम नेणे धोक्याचे असते. तसेच रक्कम फारच मोठी असेल तर धोक्या बरोबर गैरसोय पण होते. हे टाळण्यासाठी बँकांचे प्रवासी चेक्स उपयुक्त ठरतात. असे चेक्स कोणालाही मिळतात. असे चेक्स लहान-मोठ्या रक्कम्मांचे मिळू शकतात. हे चेक्सच्या बँकेतून घेतलेले असतात. ती बँक आपल्या इतर शाखेवर किंवा मोठमोठी हॉटेल्स, विमानतळ या ठिकाणी बँकेचे प्रतिनिधी म्हणून कार्ये करण्यांवर जरी दिले असले तरी ते इतरत्र पण वटवून पैसे मिळू शकतात.

**क) आंतरराष्ट्रीय व्यापार व परकीय चलन :**

बँका आंतरराष्ट्रीय व्यापारात मदत करतात. एखाद्याने परदेशातून माल आयात केला असेल तर त्याचे कागदपत्रे त्याचेकडे पोहचविणे, त्याच्याकडून पैसे वसूल करुन परदेशी पाठविणे अशी कामे करतात. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी लागणारे परकीय चलन व्यापाऱ्यांना उपलब्ध करुन देतात. त्याचप्रमाणे परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना व प्रवासी लोकांना परकीय चलन मिळवून देतात. ज्या बँकांच्या परदेशात शाखा असतात त्यांच्याकडून ही कामे जास्त चांगल्या तऱ्हेने पार पाडली जातात.

**५) हमी पत्रे देणे:**

व्यापारी बँका आपल्या खातेदारांना हमी पत्रे (Letter of Credit) देण्याचे काम करतात. म्हणजे बँकेत आपल्या खातेदारांच्या चांगल्या व्यवहाराविषयी व पती (Credit) विषयी केलेली शिफारच होय.

## ७.४ पतपैशाची निर्मिती (CREDIT CREATION)

पतपैशाची निर्मिती हे व्यापारी बँकाचे एक महत्त्वपूर्ण कार्य आहे. बँकाना पत पैशाचा कारखाना म्हणूनही काहीवेळा ओळखले जाते. आता आपण व्यापारी बँका पत पैशाची निर्मिती कशी करतात त्याच्या या कार्यावर काही मर्यादा आहेत का असल्यास या मर्यादा कोणत्या, एकच बँक असेल तर ती पतपैसा निर्माण करु शकते का ? बँक व्यवसाय पद्धतीत पत पैशाची निर्मिती होऊ शकते. इ. मुद्यांचा विचार करु बँका पत पैसा कसा निर्माण करतात ?

अ) कर्ज देऊन
ब) रोख्यांची खरेदी करुन

बँका गोळा झालेल्या ठेवीपैकी सर्वच्या सर्व ठेवी स्वत:जवळ रोख रकमेच्या रुपात ठेवत नाहीत. बँका म्हणजे गुदामे नाहीत की ज्या मध्ये नोटा किंवा चलनी नाणी आपण ठेऊ शकतो आणि इच्छा असेल तेव्हा काढून घेऊ शकतो. इथे पैसे ठेवण्यासाठी आपल्याला भाडे द्यावे लागत नाही. सर्वसाधारणतः हे मान्य केले जाते. की बँका आपल्या जवळ गोळा झालेल्या ठेवी कर्ज मागायला येणाऱ्यांना कर्जाऊ देतात. ठेवीदार आपल्या ठेवी बँकांजवळ ठेवताना बँकांनी ठेवीदार परत मागतील तेव्हा ठेवी परत करण्याच्या आश्वासनावर विश्वासावर ठेवतात. बँका जवळच्या ठेवी परत होताना ठेवीदार आपण ठेवलेल्याच नोटा किंवा नाणी परत मागत नाहीत. ठेवीदार एकाच वेळी आपल्या सर्व ठेवी काढून घेत नाहीत किंवा सर्वच ठेवीदार एकाच वेळी आपल्या ठेवी परत घ्यायला येत नाहीत. बँकांना अनुभवावरुन लक्षात येते की, किती ठेवी परत मागितल्या

जातात. या अनुभवाच्या आधारे बँका किती ठेवी स्वतः जवळ रोख रकमेच्या स्वरुपात ठेवायच्या आणि किती कर्जाऊ द्याच्या हे ठरवतात उदा. बँकेचा अनुभव असेल की जमा झालेल्या ठेवी पैकी दहा टक्के ठेवी ठेवीदार काढून घेतात. तर बँक जमा झालेल्या शंभर रुपयांपैकी दहा रुपये रोख ठेवेल व उरलेले नव्वद रुपये बँक कर्जाऊ देईल. हे नव्वद रुपये बँक रोख रक्कमेच्या स्वरुपात न देता कर्जदाराच्या नावे ठेव निर्माण करते याठेवी पैकी एक दशांश रक्कम रोख रकमेच्या स्वरुपात ठेऊन उरलेली रक्कम कर्जाऊ देते. अशा प्रकारे बँका जमा झालेल्या लहानशा ठेवींच्या आधारावर मोठी कर्जे देतात.

मध्यवर्ती बँकेने एक लाख रुपयांच्या रोख्यांची खरेदी केली असे आपण गृहीत धरु. मध्यवर्ती बँकेने दिलेला एक लाख रुपयांचा चेक व्यापारी बँकेत जमा केला. बँकेत जमा होणाऱ्या या ठेवी प्राथमिक ठेवी म्हणून ओळखल्या जातात. आपण असे गृहित धरु की बँकांना ठेवीच्या दहा टक्के रक्कम रोख दायित्त्व निधीच्या रुपात ठेवावी लागते. आता ही बँक एक लाख रुपयांपैकी दहा हजार रुपये रोख दयित्व निधी म्हणून ठेवते. आणि उरलेले नव्वद हजार रुपये कर्जाऊ देईल. कर्ज देताना बँक व्याजदराला नव्वद हजार रुपयांचा चेक देईल किंवा बँकेत खाते उघडून त्यांच्या नावे नव्वद हजार रुपये जमा करेल. कर्जदार कर्जाचे नव्वद हजार रुपये त्या अथवा अन्य बँकेत जमा करेल. या ठेवी अनुवात ठेवी म्हणून ओळखल्या जातात. बँक या ठेवी पैकी हजार रुपये रोख दायित्व निधी ठेवले व उरलेले एक्यांऐशी हजार रुपये कर्जाऊ देईल हे अेक्याऐशी हजार रुपये तिसऱ्या बँकेत जमा केले जाईल. ही बँक पण या पैकी दहा टक्के रक्कम रोखदायित्त्व निधी ठेऊन उरलेली रक्कम कर्जाऊ देईल हे चक्र असेच चालू राहिल्यास अंतिमतः दहा लाखाच्या ठेवी निर्माण होतील. या पैकी एक लाखाचा रोखदायित्व निधी असेल व नऊ लाखाची कर्जे दिली जातील.

**पत पैशाची निर्मिती**

| बँक | जादा ठेवी | ठेवण्यात आलेला अदा रोखदायित्त्व निधी १०टक्के | देण्यात आलेली कर्जे ठेवीच्या ९०टक्के |
|---|---|---|---|
| १ली | १००००० | १०००० | ९०००० |
| २री | ९०००० | ९००० | ८१००० |
| ३री | ८१००० | ८१०० | ७२९०० |
| ४ थी | ७२९०० | ७२९० | ६५६१० |
| ५ वी | ६५६१० | ६५६१ | ५९०४९ |
| ६ वी | ५९०४९ | ५९०४ | ५३१४९.१ |
| ७ वी | ५३१४९.१ | ५३१४ | ४७८२९.७ |
| ८ वी | ४७८२९.७ | ४७८२ | ४३०४६.७ |
| ९ वी | ४३०४६.७ | ४३०४ | ३८७३.९७ |
| १०वी | ३८७३९.७ | ३८७४ | ३४८६.५७ |
| एकूण दहा बँका | ६५१३२१.५ | ६५१३२.१५ | ५८६१८९.३५ |
| इतर बँका | ३४८६७८.५ | ३४८६७.८५ | ३१३८१०.६५ |
| **एकूण** | **१००००००** | **१०००००** | **९०००००** |

**पतपैशाच्या मर्यादा (Limitations of Creit Creation)**

**१) रोखतेची अभिलाषा:**

समाजातील लोकांना रोख पैशाचे आकर्षण किती आहे यावर पतपैशाची निर्मिती अवलंबून असते. तर लोक दैनंदीन व्यवहार पारंपारिक पद्धतीने पार पाडत असतील किंवा चेक किंवा धनादेशा ऐवजी रोखेने व्यवहार करत असतील तर मात्र – ठेवीचे प्रमाण कमी होऊन पतनिर्मीतीला मर्यादा येईल.

**२) देशान्तर्गत आर्थिक स्थिती:**

देशातील अर्थव्यवस्थेचे चित्र जर आशावादी व विकासास पोषक असेल . तर कृषी उद्योग, व्यापार इ. क्षेत्रांची उलाढाल वाढेल. परिणामी बँकाकडे कर्जाची मागणी वाढेल पतनिर्मितीचा वेग वाढेल या उलट देशात मंदीची परिस्थिती असेल तर मात्र पतनिर्मीती मोठ्या प्रमाणावर होणार नाही.

**३) उपलब्ध बँकींग सुविधा:**

देशात बँकांच्या विस्तार व शाखा यांची संख्या जेवढी जास्त तेवढे आर्थिक–व्यवहार जास्त होतात. तेवढी पतनिर्मिती जास्त होते उलट बँकाच्या शाखा कमी असतीतर पतनिर्मितीला मर्यादा येते.

**४) गुंतवणुक सुविधा:**

अल्पकालीन गुंतवणूक साधनांचा विकास कितपत झाला आहे. यावर पतनिर्मीती अवलंबून असते. अनेकदा अशी अल्पकालीन गुंतवणूकीची साधने उपलब्ध असल्याने बँकांना राखीव निधी मोठ्या प्रमाणावर बाळगावा लागतो. परिणामी पतनिर्मीती अल्प होते.

**५) रोख राखीव निधीचे प्रमाण:**

व्यापारी बँकांना आपल्या जवळील प्राथमीक ठेवीपैकी किती रक्कम एकूण राखीव स्वरुपात जवळ बाळगावी लागते. यावरही पतनिर्मितीचे प्रमाण अवलंबून असते. जर बँकेस अधिक राखीव निधी जवळ बाळगणे आवश्यक असेल तर पतनिर्मीती मोठ्या प्रारणावर होणार नाही.

**६) प्राथमिक ठेवीचे प्रमाण:**

बँकांना पतनिर्मीतीसाठी जनतेकडून ठेवीच्या स्वरुपात पैसे मिळणे आवश्यक असते. प्राथिक ठेवीच्या प्रमाणावर बँकांची पतनिर्मिती क्षमता अवलंबून असते जर प्रार्थमिक ठेवीचे प्रमाण अल्प असेल तर पतनिर्मिती अल्प प्रमाणात होते.

## ७.५ रोखता व लाभदायिता (LIQUIDITY & PROFITABILITY)

आपण यापूर्वी पाहिले की बँका ग्राहकांच्या ठेवी गोळा करतात. पण बँक ही पैशाची गोदामे नसतात. बँका जमा झालेल्या ठीवींवर व्याज देतात. हे व्याज देण्यासाठी बँकांना काही पैसा कमवावा लागतो. आपण हे पाहिले की बँका जमा झालेल्या ठेवींच्या आधारे पत पैसा निर्माण करतात आणि ग्राहकांना कर्जे देतात.

ग्राहक आपल्या ठेवी बँकेला पूर्ण सूचना न देता काढून घेऊ शकतात. ग्राहकांनी परत मागितल्यावर त्यांच्या ठेवी परत करणे ही बँकेची जबाबदारी असते. एखाद्या ठेवीदाराला बँकेन परत पाठवले, त्यांच्या ठेवी पर करायला असमर्थता दाखवली तर संपूर्ण बँक व्यवसाय धोक्यात येऊ शकतो. अर्थात सर्वच ठेवीदार एकाच वेळी आपल्या ठेवी परत मागायला येत नाहीत. या ठेवीदारांची मागणी पूर्ण करण्यासाठी बँकाना स्वत:जवळ पुरेशा ठेवी ठेवाव्या लागतात.

बँकाना ठेवीदारांच्या ठेवीवर व्याज द्यावे लागते. यासाठी पुरेशी रोखता स्वतः जवळ ठेवल्यानंतर उरलेल्या ठेवी लाभदायितेसाठी गुंतवल्या जातात. बँकाना रोखता आणि लाभऊदायित्व या मध्ये समतोल साधावा लागतो. बँकांचे यश लाभता आणि रोखता यांच्यातील योग्य समतोलावरच अवलंबून असते. बँकानी रोखतेवर भर दिला तर लाभता कमी होते. बँकांना आपला खर्च भागण्या इतकाही नफा न मिळाल्यामुळे बँका संकटात येतात. या विरुद्ध नफ्यावर किंवा लाभतेवर भर दिला व सर्व ठेवी गुंतवल्यावर रोखता कमी होऊन ठेवीदारांची मागणी पूर्ण न करता आल्यामुळे धोक्यात येतात. बँकानी दिलेल्या अविवेकी कर्जामुळे बँकांची सुरक्षितता धोक्यात येते.

रोखता आणि लाभदायिता ही दोन्ही परस्पर विरोधी तत्त्वे आहे. या दोन्ही तत्त्वाचा समन्वय साधणे आवश्यक असते. बँकानी कोणत्याही स्वरुपात आणि कितीही रोखता ठेवलेली असली तरी सर्वसाधारण परिस्थितीत ही रोखता अनावश्यक वाटते आणि जेव्हा ठेवीदारांच्या विश्वासाला धक्का बसलेला असतो तेव्हा ही रोखता अपूरी वाटते.

बँका किती रोखता ठेवतील हे खालील घटकांवर अवलंबून असते.

१. बँकांच्या ठेवीतील दैनंदिन चढउतार

२. ग्राहकांच्या कर्जाच्या गरजातील परिवर्तनशीलता आणि

३. दुय्यम ठेवींचे स्वरुप

सर्वसाधारतः बँका आपल्या जिंदगी रोखतेच्या उतरत्या क्रमाने ठेवतात. किंवा दुसऱ्या शब्दात ज्या जिंदगीचे रुपांतर रोखे पैशात ताबडतोब करता येते अशा गुंतवणुका प्रथम आणि त्यानंतर कमी कमी रोखता असलेल्या गुंतवणुका दाखवल्या जातात. उदा. बँका आपल्याजवळ नाणी व नोटांच्या स्वरुपात रोख रक्कम ठेवतात किंवा मध्यवर्ती बँकेजवळ ठेवी ठेवतात. मध्यवर्ती बँकजवळच्या ठेवी कधीही रोख रकमेच्या रुपात काढून घेता येतात. बँका या ठेवी म्हणजे रोख पैसा हातात असणे असे मानतात. सर्व व्यापारी बँकाना संकेतानुसार किंवा कायद्यानुसार काही ठेवी मध्यवर्ती बँकेजवळ ठेवाव्या लागतात. व्यापारी बँकांवर असलेल्या ठेवी ठेवायच्या बंधनामुळे मध्यवर्ती बँकेला पतनिर्मीतीवर नियंत्रण ठेवण्याच्या अधिकाराचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करुन घेता येतो. या जिंदगी पासून लाभदायिता मिळत नाही.

बँका अत्यंत अल्पकाळासाठी कर्जे देतात. सुरक्षिततेची ही दुसरी रेखा असते. इंग्लंड मध्ये ही कर्जे Money at call and Short notice म्हणू ओळखली जातात. ही कर्जे प्रामुख्याने हुंडी गृहे, रोखे, दलाल, लहान दलाल इ. कडून घेतली जातात. ही कर्जे कांही तासापासून एक दोन दिवसाच्या मुदतीची असतात. बँका गरज भासेल तेव्हा ही कर्जे परत घेऊ शकते. या कर्जाची लाभदायिता कमी असते. पण पहिल्या प्रकारच्या किंवा रोख रक्कम जवळ ठेवण्यापासून मिळणाऱ्या लाभदायिते पेक्षा जास्त असते.

हुंड्या वटविणे ही तिसऱ्या क्रमांची जिंदगी आहे. मुदत भरल्यानंतर हुंड्या वाटवल्या जातात आणि बँकांच्या गुंतवणुका मुक्त होतात. यामध्ये राजकोषिय पत्रे आणि व्यापारी हुंड्या यांचा समावेश होतो. या प्रकारच्या गुंतवणुकांमध्ये लाभदायिता जास्त असली तरी रोखता कमी असते.

बँकांच्या गुंतवणुकांचा क्रम यानंतर येतो. या गुंतवणुका प्रामुख्याने सरकारी रोख्यातून केल्या जातात. या गुंतवणुकांपासून निश्चित उत्पन्न मिळते. म्हणून हे रोखे उत्तम रोखे म्हणून ओळखले जातात. या गुंतवणुका सुरक्षित असतात. या गुंतवणुकांमध्ये धोका नसतो. म्हणून या गुंतवणुका अनेक देशातील बँकेत प्रीय असलेल्या दिसून येतात. भारतासारख्या देशात जिथे गुंतवणुकीचे अन्य मार्ग उपलब्ध नाहीत तिथे बँका आपल्या गुंतवणुकांचा मोठाभाग सरकारी रोख्यात गुंतवतात या रोख्यांची रोखता या पूर्वीच्या जिंदगीपेक्षा कमी असली तरी लाभदायिता जास्त असते.

बँका आपल्या ग्राहकांना वेगवेगळ्या कारणांसाठी कर्जे देतात. ही कर्जे अधिकर्ज स्वरुपाची ही असतात. या प्रकारच्या गुंतवणुकांपासून उत्पन्न अधिक मिळते. पण रोखता मात्र अत्यंत कमी असते. या गुंतवणुकांतला धोका जास्त असतो.

बँकांच्या ताळे बंदात दायित्व आणि जिंदगीची बाजू खालील प्रमाणे दाखवलेली असते.

| दायित्त्व | जिंदगी |
|---|---|
| अ) भांडवल | अ) रोख रक्कम व मध्यवर्ती बँकेकडे असलेली रोख रक्कम |
| ब) राखिव निधी | ब) अती अल्पकालीन कर्जे |
| क) ठेवी | क) वटवलेल्या हुंड्या |
| ड) ग्राहकांसाठी स्विकारलेली दायित्व | ड) गुंतवणुका |
| | इ) ग्राहकांसाठी स्विकारलेले दायित्त्व |
| | प) फर्निचर व फिक्शचर लेखा |
| | फ) इमारती व परिसर |

बँकेच्या ताळेबंदात गुंतवणुकानंतर दाखवलेल्या दोन मत्ता फर्निचर व फिक्शचर लेखा आणि इमारती व परिसर यातील गुंतवणुकीची रोखता अत्यंत कमी असते.

बँकांच्या जिंदगीच्या बाजूकडे पाहिल्यास लक्षात येईल की अ प्रकारच्या गुंतवणुकांकडून फ प्रकारच्या गुंतवणूकांकडे जात असताना गुंतवणूकापासून मिळणारे उत्पन्न क्रमा क्रमाने वाढत गेलेले दिसते. या विरुद्ध फ पासून अ कडे जाताना रोखता वाढत गेलेली दिसून येते. बँकांना रोखता आणि लाभदायिता यांच्यात समतोल साधावा लागतो. याचा अर्थ बँकांना आपला व्यवस्थापन खर्च भागेल, ठेवीवर व्याज देता येईल व भागधारकांना लाभांश देता येईल येवढे उत्त्पन्न त्यांनी केलेल्या गुंतवणुकांपासून मिळते हे पहावे लागते आणि याच बरोबर आपल्या ठेवी परत मागायला आलेले ठेवीदार विन्मुख जाणार नाहीत. इतकी रोखता ठेवावी लागते.

munotes.in

रोखतेचे महत्त्व बँकांनी आपली जिंदगी वेगवेगळ्या प्रकारात किती ऋणात ठेवावी या बाबतीत प्रत्येक देशात आणि बँका बँका भिन्नता असू शकते. इतकेच नव्हे तर उद्योगाच्या स्थितीनुसार हे ऋण बदलते. बँकाजवळ – जास्त असेल तर बँकाचा आत्मविश्वास वाढतो पण नफा मात्र कमी होतो. बँका आपल्या जिंदगीचा काही भाग तरल किंवा रोखता असलेला तर ठेवतेच पण त्या बरोबर लोकावर विश्वासाला धक्का पोहचणार नाही व विश्वास दृढ होईल याची काळजी घेतात. बँकाना ठेवीदाराच्या कल लक्षात घेणे महत्त्वाचे असते ठेवीदारांची जेव्हा खात्री असते की आपल्या ठेवी परत मिळतील तेव्हा ते ठेवी परत मागण्यासाठी येत नाही. ठेवीदाराच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी बँकांना मुक्तपणे कर्ज देणे योग्य ठरते. बँका संकटात येतात तेव्हा मध्यवर्ती बँक मदतीसाठी येते. ठेवीच्या विमा उतरवला असेल तर ठेवीदारांच्या मनात बँकांवर विश्वास वाढायला मदत होते.

## ७.६ १९९० - १९९१ पासूनच्या बँकीग क्षेत्रातील सुधारणा (BANKING SECTOR REFORMS SINCE 1990-1991)

राष्ट्रीयीकरण हा भारतीय बँकाच्या विकासातील एक ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण टप्पा आहे. भारतातील बँकीग व्यवस्थेचा विकास व्हावा या दृष्टीने राष्ट्रीयीकरण करण्यात आले. बँकीगक्षेत्रातील सुधारणा यामध्ये प्रमुख दोन भिन्न टप्पे आहेत. पहिला टप्पा म्हणजे १९९१ च्या नरसिंहम समितीच्या अहवाल आणि दुसरा टप्पा म्हणजे १९९८ च्या नरसिंहम समितीच्या शिफारशी अर्थात बँकीग क्षेत्रातील स्थैर्य आणि कार्यक्षमता (Stability and Effliciency) सुधारण्याचा दृष्टीने नरसिंहम समिती अहवाल १९९१ आणि १९९८ महत्त्वपूर्ण आणि आवश्यक आहे.

### अ) १९९१ चा नरसिंहम समिती अहवाल - बँकीग क्षेत्रातील सुधारणाचा पहिला टप्पाः

भारतीय बँकीगक्षेत्रात आमुलाग्र बदल घडवण्यासाठी पुढील काही मुद्द्यांवर नरसिंहम समितीने शिफारशी सादर केल्या.

१) बँकाची उत्पादकता आणि कार्यक्षमता वाढवणे.
२) व्याजावरील नियंत्रणे दूर करणे.
३) भांडवलाची पर्याप्ता वाढवणे.
४) बँकीग व्यवस्थेचे सक्षमीकरण करणे.
५) भांडवलबाजारांचे शिथीलिकरण.
६) नवीन वित्तीय संस्थावर नियंत्रण ठेवणे.

वरिल समितीतील शिफारशींचा सरकारने काही अंशी स्विकार केला. या शिफारशीनुसार सरकारने ज्या काही सुधारणा केल्या त्या पुढीलप्रमाणे.

### १) रोखीव निधी आणि वैद्यानिक रोखता निधीच्या प्रमाणात बदल.

१९९१ मध्ये वैधानिक रोखता निधीचे प्रमाण ३८.५ टक्के होते ते १९९७ मध्ये २५ टक्के इतके कमी करण्यात आले. त्याचप्रमाणे रोखे राखीव विधीचे प्रमाण १५ टक्के वरुन ५ टक्के पर्यंत कमी करण्यात आले. त्यामुळे बँकाकडे अतिरिक्त निधी उपलब्ध झाला, साहजीकच त्यामुळे व्यापारी बँकाची रोखता व लाभता वाढली.

**२) स्पर्धात्मकता:**

बँकींग क्षेत्रात कर्जपुरवठा करणे, ठेवी गोळा करणे या बाबत स्पर्धा निर्माण व्हावी यासाठी खाजगी व्यापारी बँकाना सार्वजनिक क्षेत्रातील बँका बरोबर स्पर्धा करण्यास परवानगी देण्यात आली. तसेच व्याजावरील नियंत्रणेही सरकारने दूर केली.

**३) भांडवली आणि मजबूतीकरण:**

व्यापार बँकानी आपल्या भांडवलाचा आर्थिक पाया मजबूत करावा यासाठी आपल्या किमान आवश्यक भांडवलप्रमाण निधीत वाढ करण्यासाठी खुल्या बाजारात भाग भांडवलाची विक्री करुन निधी उभारण्याची परवानगी देण्यात आली.

**४) प्रधान्य क्षेत्राला होणारा कर्जपुरवठा:**

सरकार व मध्यवर्ती बँकेकडून होणाऱ्या आदेशात्मक कर्जपुरवठ्यामुळे अनेक व्यापारी बँकांच्या उत्पन्न न देणाऱ्या जिंदगीत NPA वाढ होते. तसेच त्यांचे नफ्याचे प्रमाणही कमी होते. म्हणून आदेशात्मक कर्जपूरवठा हे धोरण बदलून प्राधान्य क्षेत्राच्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण ४० टक्के वरुन टप्प्याटप्प्याने १० टक्के पर्यंत कमी करण्यात आले. तसेच त्यासाठी लवचिक व्याजदर धोरणही स्विकारण्यात आले.

**५) दुर्बल बँकाची पुनबांधणी आणि पुनजीवन:**

ज्या व्यापारी बँका तोट्यात आहेत आणि त्यांची उत्पन्न देण्यात जिंदगी २४.७ टक्के पेक्षा अधिक आहे. अशा बँकाची १९९४ मध्ये पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला. अशा बँकासाठी जिंदगी पुर्नरचना निधीची स्थापना करण्यात आली. तसेच त्यांान अंदाजपत्रकातून मदत निधी देण्याचा निर्णय सरकारने घेतला.

**६) व्यापारी बँकांवर पर्यवेक्षण करणारे मंडळ:**

व्यापारी बँकाची प्रगती आणि त्यांनी पुरविलेल्या सुविधा (इंटनेटबँकीग, इलेक्ट्रानिक बँकिंग सेवा) यावर पुर्णपणे नियंत्रण ठेवण्यासाठी पर्यवेक्षक मंडळाची स्थापना करण्यात नियंत्रण ठेवण्यासाठी पर्यवेक्षक मंडळाची स्थापना करण्यात आली.

वरिल सुधारणांशिवाय व्याजावरील नियंत्रण, न वसूल होणारी कर्जे उत्पन्न न देणारी जिंदगी (NPA) इत्यादीमध्ये आमुलाग्र सुधारणा घडून आल्या.

**ब) १९९८ चा नरसिंहम समिती अहवाल - बँकीग क्षेत्रातील सुधारणांचा दुसरा टप्पा:**

१९९१ नंतरच्या वर्षातील बँकींग क्षेत्रातील बदलाचा आढावा घेऊन १९९८ मध्ये नरसिंहम सामितीने दुसरा अहवाल सादर केला या अहवालात समितीने ही महत्त्वपुर्ण निरीक्षणांची नोंद केली. जागतिक वित्तीय बदलांच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी एक प्रबळ व कार्यक्षम वित्तीय प्रणाली भारतात असणे गरजेचे आहे, म्हणूनच बँकींग व वित्तीय क्षेत्रात सातत्याने सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने समितीने पूढील शिफारसी केल्या.

१. संस्थात्मक संबंधीकरणासाठी उत्पन्न न देण्याऱ्या जिंदगीचे Non Performing Assets कमी करणे आणि जिंदगी पुनर्रचना निधीला चालना देणे.

२. बँक जिंदगी आणि कर्जविभागणी यांचा दर्जा वाढविणे.

३. खाजगी व सार्वजनिक बँकामध्ये स्पर्धात्मकता असावी.

४. बँकीग क्षेत्रातील पहिल्या टप्प्यातील सुधारणा अहवालात सुचवल्याप्रमाणे वित्तीय व्यवस्थेशी रचना सुव्यवस्थित असावयास पाहिजे की जेणेकरुन आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या व्यापारी राष्ट्रीय बँका आणि भौगोलिक विभागानुसार उर्वरित लहान बँका असाव्यात मात्र भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने मोठ्या बँका आणि लहान बँका यांच्या कार्यप्रमाणलीमध्ये परस्पर असा घनिष्ठ संबंध असला पाहिजे.

५. बँकीग व्यवस्थेची वित्तीयक्षमता आणि लाभता वाढवण्यासाठी प्रयत्न करणे.

६. केंद्रिय कार्यलय व शाखा कार्यलयातील तंत्रिक विकासास प्राधान्य देणे त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढवणे तसेच बँकाच्या संगणकीकरणाचा वेग वाढवण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. त्यासाठी कार्यक्षम आणि व्यवसायिक व्यक्तींची नेमणूक करणे, शिक्षण प्रशिक्षण, नेमणूक आणि मोबदला यावर पुनर्विचार होणे आवश्यक आहे.

७. बँक कार्यप्रमणालीत लवचिकता आणि स्वायत्ता वाढवण्यावर लक्ष दिले पाहिजे. तसेच राजकीय हस्तक्षेप नसावा. या दृष्टीने बँकाच्या कार्यप्रणाली आणि व्यवस्थापना मध्ये बदल होणे आवश्यक आहे.

८. दिवाळखोरीला प्रतिबंध घालवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

९. सुधारणाकार्यक्रमातंर्गत ग्रामिण आणि नागरी भागातील भांडवली आणि कर्जबाजारांच्या विक्रेतीकरणाला प्राधान्य दिले पाहिजे. विकेंद्रीकरण हा पर्याय खाजगी अल्पाधिकार आणि शासकीय एकाधिकार या दोषोपेक्षा अधिक श्रेष्ठ आहे.

थोडक्यात, दुसऱ्या टप्प्यातील वित्तीय क्षेत्रातील सुधारणा, बँकाचे सवलीकरण, बँकीग कार्यप्रणालीचे सुलभीकरण तांत्रिक विकास व मानवी साधनांचा विकास यावर भर देतात. याशिवाय पद्धतीरपणे मूल्ये आणि वित्तीय संस्कृतीचे संवर्धन केल्याशिवाय तसेच लोकांना जास्त वित्ताऐवजी योग्य वित्त हे कसे श्रेयस्कर आहे. याबाबत प्रतिक्षण दिल्याशिवाय वित्तीय क्षेत्रातील सुधारणा अपुऱ्यांच राहतील.

### १९९८ नरसिंहम समितीच्या अहवालाची अंमलबजावणी (Implimentation of Narsimhan Committee Recommendation)

१. व्यावसायिक विविधता साधली गेली. (व्यावसायिक विस्तार गुंतवणूक सेवा, क्रेडीट कार्ड, पायाभूत उद्योगांना पुरवठा इ.)

२. तंत्रज्ञान विषयक व्यापारात सुधारणा घडवून आली. (इंटरनेट बँकींग, संगणकीय व्यवस्था, मोबाईल बँकीग इ.)

३. व्यावसायिक गतिशिलतेमुळे जागतिक दर्जा गाठता आला.

४. बँकाचे विलीनीकरण (Bank Merger's) प्रस्ताव २००५ मध्ये अमलात आणला गेला. (सार्वजनिक क्षेत्रातील बँक ऑफ इंदोर आणि बँक ऑफ सौराष्ट्र या भारतीय स्टेट बँकेत विलीन करण्यात आल्या आहेत)

५. बँकींग क्षेत्रातील स्पर्धात्मकता वाढवण्याच्या उद्देशाने बँकातील विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण (FDI 7.4%) वाढवण्यात आले.

munotes.in

६. बँकाचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने धोका व्यवस्थापन (Risk Management) धोरणाची अमंलबजावणी प्रभावीपणे होताना दिसून येत आहे.

थोडक्यात नरसिंहम समीती अहवाल १९९१ व १९९८ यातील शिफारशीनुसार सुधारणा घडून आल्या त्यामुळे बँकीग क्षेत्रात अनुकूल असे आमूलाग्र बदल घडून आले आहेत.

## ७.६ सारांश (SUMMARY)

प्रस्तुत प्रकरणामध्ये, व्यापारी बँकांचा अर्थ, व्यापारी बँकांची कार्ये, ठेवीचे प्रकार (बचत ठेवी, चालू ठेवी व मुदत ठेवी), पतपैशाच्या निर्मितीची प्रक्रिया, पतपैशाच्या मर्यादा, रोखता व लाभदायिता, दायित्व व जिंदगी यांमधील फरक आणि १९९०-९१ पासूनच्या बँकिंग क्षेत्रातील सुधारणा यांचा अभ्यास आपण केला आहे.

## ७.७ प्रश्न (QUESTIONS)

१) व्यापारी बँक म्हणजे काय ? व्यापारी बँकेची कार्ये सांगा.
२) पतपैशाच्या निर्मितीची प्रक्रिया स्पष्ट करा.
३) १९९०-९१ पासूनच्या बँकिंग क्षेत्रातील सुधारणांचा आढावा घ्या.

❖❖❖❖

# ८

# मध्यवर्ती बँक
# (CENTRAL BANKING)

**घटक रचना :**


८.० उद्दिष्ट्ये

८.१ मध्यवर्ती बँकेचा अर्थ

८.२ मध्यवर्ती बँकेची कार्ये

८.३ सारांश

८.४ प्रश्न


## ८.० उद्दिष्ट्ये

- मध्यवर्ती बँकेची संकल्पना समजून घेणे.
- मध्यवर्ती बँकेची कार्ये समजून घेणे.

## ८.१ मध्यवर्ती बँकेचा अर्थ

देशाच्या चलनीविषक व बँकींग रचनेत मध्यवर्ती बँकेचे महत्त्व अन्यन्य साधारण आहे. मध्यवर्ती बँकेकडे नाणेबाजाराचे निर्विवाद नेतृत्व आहे. ही बँक सलग्न असलेल्या व्यापारी बँकाच्या व्यवहारावर देखरेख ठेवण्याचे व त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करते. मध्यवर्ती बँक ही देशातील सर्वोच्च चलनविषयक संस्था असून तिच्याकडे सरकारने तयार केलेले चलनविषयक धोरण राबवण्याचे कार्य व जबाबदारी सोपवली आहे. भारतात मध्यवर्ती बँक म्हणून रिझर्व्ह बँक १ एप्रिल १९३५ पासून कार्य पहाते आहे. मध्यवर्ती बँक ही कोणत्याही देशातील शिखर बँक असते. संपूर्ण देशाच्या वित्तव्यवस्थेवर नियंत्रण ठेवणारी मध्यवर्ती संस्था आहे.

मध्यवर्ती बँक ही अर्थव्यवस्थेतली एक महत्त्वाची संस्था असते. या संस्थेद्वारे अर्थवस्थेतील चलनविषयक व्यवहार नियंत्रित केले जातात. मध्यवर्ती बँक आर्थिक सार्वभौमत्त्वाचे प्रतिक असते. मध्यवर्ती बँक देशाच्या वित्तीय स्थैर्याची जबाबदारी घेते. मध्यवर्ती बँक चलनपुरवठा करते आणि सरकारची बँक म्हणूनही कार्य करते.

गेल्या काही वर्षात मध्यवर्ती बँकेचे महत्त्व वाढले आहे. गेल्या काही वर्षात देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक अवलंबित्व वाढते आहे. गेल्या काही वर्षात चलन व्यवस्थापन आणि चलन नियंत्रण याला महत्त्व प्राप्त झाले आहे. चक्रीय चढउतार रोखण्यासाठी महामंदीवर पैशाच्या



munotes.in

पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याची निर्माण झालेली गरज आणि अनेक देशांच्या अर्थपद्धीतीत नियोजनाला प्राप्त झालेले महत्त्व या कारणांमुळे मध्यवर्ती बँकांचे महत्त्व वाढले आहे.

''ज्या चलन संस्थेवर बँकाची बँक म्हणून कार्य करण्याची सरकारचा चलन विषय प्रतिनिधी म्हणून कार्य करण्याची आणि चलन व्यवस्थेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी सोपवलेली असते व या संस्था बँकिंगचा व्यवसाय करत नाहीत अशा संस्था मध्यवर्ती बँक म्हणून ओळखल्या जातात.''

स्मिथ यांनी मांडलेल्या मध्यवर्ती बँकेच्या व्याख्येत ते म्हणतात ''मध्यवर्ती बँक म्हणजे बँक व्यवसायाची अशी पद्धत की ज्यामध्ये एकाच बँकेची चलन निर्मितीत पूर्ण अथवा अवाशिष्ट मक्तेदारी असते.

## ८.२ मध्यवर्ती बँकेची कार्ये

### १) चलन निर्मिती करणे:

जगातल्या सर्व देशात कागदी नोटांची छपाई तेथील मध्यवर्ती बँकेमार्फतच होते. आज सर्वत्र मध्यवर्ती बँका आपल्या सरकारच्या वतीने कागदी नोटा छापतात व चलनात आणतात. त्यामुळे कागदी नोटांची निर्मिती ही मध्यववर्ती बँकाची आज मक्तेदारी बनली आहे.

### २) सरकारी बँक, एजंट व सल्लागार:

सर्व मध्यवर्ती बँका ह्या सरकारची बँक, एजंट व सल्लागार म्हणून कार्य करतात. मध्यवर्ती बँकेत देशाचे मध्यवर्ती सरकार व राज्य सरकारे यांची खाती असतात. व्यापारी ज्या प्रमाणे लोकांची बॅन्कविषयक कामे करतात, तद्वतच मध्यवर्ती बँक सरकारची बँक विषयक कामे करते. उदा. सरकारची शिल्लक सांभाळणे, सरकारसाठी कर्जे उभारणे, ते फेडणे, सरकारला अडचणीच्या वेळी स्वतः कर्जे देणे इ. तसेच सरकारची एजंट म्हणून मध्यवर्ती बँक सरकारच्या वतीने इतरांची येणी स्विकारणे व देणी देणे हे कार्य करीत असते.

### ३) बँकांची बँक:

देशातल्या विविध बँका या जनतेच्या बँका असतात. परंतु मध्यवर्ती बँक ही देशातल्या सर्व बँकांची बँक असते. ज्याप्रमाणे देशातल्या विविध बँका लोकांसाठी कामे करतात. तद्वतच मध्यवर्ती बँक देशातल्या बँकांसाठी कामे करते. उदा. देशातील बँका आपल्या जवळील शिलकीचा काही भाग मध्यवर्ती बँकेत ठेव म्हणून ठेवतात. व ही ठेव मध्यवर्ती बँका सांभाळते काही वेळा देशातल्या बँकांनी आपल्या जवळच्या ठेवींचा काही भाग मध्यवर्ती बँकेत ठेवला पाहिजे. असे त्यांच्यावर कायदेशीर बंधन असते.

तसेच देशातल्या बँकांना अडीअडचणीच्या वेळी मध्यवर्ती बँक कर्जे देते. त्याचप्रमाणे देशातल्या बँकांच्या हुंड्या वटवते. तसेच व्यापारी बँकांनी आपल्या ग्राहकांच्या हुंड्या एकदा वटवल्या असतील तर त्या पुन्हा वटविणे हे कार्य पण मध्यवर्ती बँक करते. थोडक्यात मध्यवर्ती बँक, बँकांची बँक म्हणून कार्य करते.

### ४) परदेशी चलन सांभाळणे:

पूर्वी जेव्हा अनेक देशात सुवर्ण परिमाण होते तेव्हा कागदी चलन छापताना त्याला तारण म्हणून सोने ठेवले जात असे. परंतु सुवर्ण परिमाणाच्या अस्तानंतर आज कागदी चलन छापण्यासाठी सोन व परकीय चलन यांचे तारण ठेवले जाते. परंतु कागदी चलन छापण्याची मक्तेदारी मध्यवर्ती बँकेची असल्याने अशा नोटांच्या छपाईसाठी परदेशी चलनाचे ठेवावे लागणारे तारण मध्यवर्ती बँक स्वतःजवळ ठेवते. तसेच देशातल्या परराष्ट्रीय व्यापारातून देशाला जर काही परकीय चलन मिळाले असले तरी ते सर्व मध्यवर्ती बँक सांभाळते, त्याच प्रमाणे दुसऱ्या देशातून काही माल आयात केल्यामुळे आपल्या देशाचे दुसऱ्या देशाला देणे निर्माण झाले असेल तर ते स्वतः जवळ असलेल्या परकीय चलनातून मध्यवर्ती बँक भागवते. त्याचप्रमाणे सरकारने हुंडणावळीचा जो दर ठरविला असेल तो टिकवून धरणे हे पण मध्यवर्ती बँकेचे काम आहे.

### ५) शेवटचा त्राता म्हणून कार्य करणे:

मध्यवर्ती बँक ही बँकांची बँक असते. त्यावेळी देशातल्या बँका अडचणीत सापडतील तेव्हा शेवटचा त्राता म्हणून मध्यवर्ती बँक त्यांच्या मदतीला धावून जाते. काहीवेळा लोकांच्या कडून पैशाची मोठ्या प्रमाणावर मागणी येते. अशी विशेषतः हंगामात लोकांची व व्यापाऱ्यांची फार मोठ्या प्रमाणावर पैशाला मागणी येत असते. अशा वेळी ते बँकेत ठेवलेल्या ठेवी काढतात. काही वेळा तर लोकांनी ठेवलेल्या ठेवींना इतक्या मोठ्या प्रमाणावर मागणी येते की बँकाना अशी मागणी पुरी करता येत नाही. कारण बँकांनी स्वतः जवळ जमलेल्या लोकांच्या ठेवी कर्जरुपाने केव्हाच देऊन टाकलेल्या असतात. अशावेळी मध्यवर्ती बँक देशातल्या बँकांच्या मदतीला धावून येते आणि त्यांना रोख पैशाची मदत करते.

### ६) निरसन केन्द्र :

मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांसाठी निरसन केन्द्र किंवा समाशोधन गृह म्हणून कार्य करते.

### ७) पतचलनाचे नियंत्रण:

अनेक अर्थशास्त्रज्ञ पतचलनाच्या निर्मितीचे नियंत्रण करणे हे एक मध्यवर्ती बँकेचे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे असे मानतात. व्यापारी बँका पतचलनाची निर्मितीकरतात. त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करावे लागते.

### ८) संशोधन :

काही देशातल्या केंद्रीय बंका संशोधन केंद्राचे कार्य करतात. अशा बँकेमार्फत देशातील औद्योगिक उत्पादनाविषयी माहिती जमावली जाते. तसेच देशातील शेती, उद्योगधंदे, व्यापार इत्यादी क्षेत्रात किती भांडवलाची गुंतवणुक झाली आहे. कुठल्या क्षेत्रात कोणत्या व्याजाच्या दराने पैसे गुंतवले जातात, कोणत्या क्षेत्रात भांडवलाचा पुरवठा अपुरा किंवा जास्त व्याजाच्या दराचा आहे. इत्यादी बाबीविषयी संशोधन केले जाते. तसेच देशातील भाववाढ, चलन वाढ, राष्ट्रीय उत्पन्न इत्यादी बाबींचे पण संशोधन करुन माहिती जमवली जाते.

### ९) शेतीला कर्जपुरवठा:

देशातील केंद्रीय बँक शेतकऱ्यांना स्वस्त दरात कर्जपुरवठा करण्याचे काम करते. अर्थात केंद्रीय बँक प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कर्ज देत नाही. तर देशातल्या सहकारी बँका किंवा इतर लोकांना कर्जपुरवठा करते व त्यांच्या तर्फे शेतकऱ्यांना कर्जपुरवठा होतो.

**१०) जागतिक संघटनांचे प्रतिनिधीत्व :**

देशाची मध्यवर्ती बँका जागतिक बँक किंवा आंतरराष्ट्रीय चलननिधी यासारख्या जागतिक संघटनांचे प्रतिनिधित्व करीत असतात.

## ८.३ सारांश (SUMMARY)

भारतीय रिर्झव्ह बँक (RBI) ही भारतातील मध्यवर्ती किंवा केंद्रिय बँक असून ती मध्यवर्ती बँक या नात्याने तीच्या सर्व जबाबदाऱ्या व कार्ये पार पाडीत असते ज्यांचा अभ्यास आपण प्रस्तुत प्रकरणामध्ये केला आहे.

## ८.४ प्रश्न (QUESTIONS)

१) 'मध्यवर्ती बँक' यावर थोडक्यात टिपा लिहा.

२) मध्यवर्ती बँकेची सरल व्याख्या देवून मध्यवर्ती बँकेची विविध कार्ये स्पष्ट करा.

❖❖❖❖

munotes.in